# वाद-विवेचन-माला

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. २२५

पुष्प १ लें

# सोशॅलिझम

अर्थात्

# सुलभ समाजवाद

संपादक व लेखक
श्री. पां. वा. गाडगीळ,
वाङ्मयविशारद

किंमत ८ आणे




REFBK-0005698

६२३।१५ सदाशिव, पुणें २.

वाद-विवेचन-माला

कि. ६८०

वाद-विवेचन-माला : : : पुष्प १ लें

# सोशॅलिझम

अर्थात्

## सुलभ समाजवाद

लेखक

पां. वा. गाडगीळ,

वाङ्मयविशारद.

REFBK-0005698

प्रथमावृत्ति
१५-१०-३८.

किंमत ८ आणे

प्रकाशक :
**यशवंत गोपाळ जोशी,**
६२३।१५ सदाशिव पेठ, पुणें २.

[ सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन. ]

मुद्रक :
**श्रीपाद रघुनाथ राजगुरु,**
'राजगुरु प्रेस', कॉमनवेल्थ कॉलनी,
४०५ नारायण पेठ, पुणें २.

# वादविवेचन-माला

## प्रस्तावना

प्रस्तुत वादविवेचनमालेचा हेतु त्या त्या पुस्तकांतील विषय पक्षाभिनिवेश धारण न करितां यथातथ्य मांडणें हा आहे. निर-निराळ्या वेळीं उपस्थित होणाऱ्या वादग्रस्त प्रश्नांनीं जे लोकक्षोभ व ज्या चळवळी होतात त्या वेळीं त्या त्या प्रश्नांचें तात्त्विक स्वरूप काय याची माहिती सामान्य जनतेस होऊं शकत नाहीं. अशामुळें समाजांत अनेक भ्रम, गैरसमजुती व दुर्विकार माजून समाजाच्या प्रगतीस एकंदरीनें अपाय होतो. याऐवजीं कोणत्याही वादग्रस्त प्रश्नांची मूळ भूमिका समजून घेण्याचें साधन जिज्ञासु वाचकांपुढें ठेवलेलें असल्यास त्या त्या चळवळींची वैचारिक पार्श्व-भूमि जनतेच्या समोर येऊन समाजांत अधिकांत अधिक लोक त्या त्या प्रश्नांवर स्वतः विचार करूं लागतात. अशा विचारी लोकांची संख्या जितकी जास्त असेल तितकी समाजप्रगतीस अनुकूलता अधिक उत्पन्न होते. या हेतूनें ही तत्त्वविवेचनमाला प्रसिद्ध करण्याचें योजिलें आहे.

या मालेंतील पुस्तकांच्या लेखकांचीं स्वतःचीं मतें कशींही असलीं तरी पुस्तकांतील विवेचन हें त्यांच्या मताचा प्रसार करणारें नसून प्रतिपाद्य विषयाची भूमिका कोणती हें वाचकांना निर्विकारपणें समजून द्यावें असें लेखकावर व संपादकावरही प्रकाशकांचें बंधन आहे.

पां. वा. गाडगीळ,

संपादक, वादविवेचनमाला.

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| प्रकरण | १ लें | माणसाचें सनातन दारिद्र्य | १ |
| ,, | २ रें | संपत्तीची अवाढव्य वाढ | ११ |
| ,, | ३ रें | संपत्तीच्या समुद्रांत दारिद्र्याचा वणवा | १६ |
| ,, | ४ थें | आर्थिक अनर्थांची उपपत्ति | २४ |
| ,, | ५ वें | काटकसरीनें अनर्थ टळेल ? | ३५ |
| ,, | ६ वें | धनिकांच्या धनाचा अपव्यय, अ-भोग व अ-व्यय | ४० |
| ,, | ७ वें | व्यक्तिस्वातंत्र्य आणि भांडवलशाही | ४५ |
| ,, | ८ वें | ‘बळी तो कान पिळी’ हा रूढ न्याय | ५४ |
| ,, | ९ वें | भांडवलशाहींतील राष्ट्रीय मालकी | ६६ |
| ,, | १० वें | सर्वांस सारखी संपत्ति | ६९ |
| ,, | ११ वें | श्रमाची सक्ति ही हवीच | ८० |
| ,, | १२ वें | उपसंहार | ८४ |


---

## साधनग्रंथांची यादी


1 Progress and Poverty — *Henry George*

2 A Simple Case for Socialism — *G. D. H. Cole*

3 Work, Wealth and Happiness of Mankind — *H. G. Wells*

4 An Intelligent Woman's Guide to Socialism and Capitalism — *G. B. Shaw*

5 Socialism — *MacDonald*

# सोशॅलिझम

अर्थात्

# सुलभ समाजवाद

मराठी ग्रंथ संग्रहालय
मराठी ग्रंथ प्रकाशन
ग्रं. क्र. ५६८८

## माणसाचें सनातन दारिद्र्य : : : १

### दारिद्र्यांतहि सुख मिळूं शकतें

तसें म्हटलें तर संपत्ति असली म्हणजे सुख लागतेंच असें नाहीं. पैसा असला म्हणजे त्याच्या साहाय्यानें तहानभूक निवारतां येते, थंडीवाऱ्याचें निवारण करतां येतें; पण तेवढ्यामुळें माणूस सुखी होईलच असा निर्वाळा देतां येणार नाहीं. 'पैशानें भूक निवेल पण दुःख निवणार नाहीं; शरीराची भूक निवेल पण आत्म्याची भूक निवणार नाहीं.' आणि ही आत्म्याची भूक निवण्यासाठीं म्हणजेच सुखासाठीं सगळ्या श्रीमंत-गरीबांची खटपट चाललेली असते. गरीबांना मोठमोठे वाडे, बगीचे आणि सुखविलासाचीं साधनें नको असतात असें नव्हे; तीं प्राप्त झाल्यास आपण अधिक सुखी होऊं असें त्यांना वाटत असतेंच. पण साधारण तहानभूक-निवारणाची शाश्वती असली, निवारा व सुरक्षितता असली,

तर एवढ्यावर जें सुख गरीबांना अनुभवतां येतें त्यांत गरीब लोक एकदां रंगून गेले म्हणजे सामान्यतः उच्च वैभवासाठीं खटा-टोप करणार नाहींत. पिंपळाच्या पारावर अंगाला राख फासून आणि गांजाची चिलीम पोटभर ओढून 'समाधीं'त अथवा निशेंत लोळणाऱ्या बैराग्याला द्रव्यार्जनासाठीं तें समाधिसुख सोडावेंसें वाटणें मुष्कील आहे.

गरीब लोक सहसा आपल्या गरीबीविरुद्ध बंड करायला तयार होत नाहींत याचें कारण, जें कांहीं थोडेंसें धन त्यांना मिळतें तेवढ्यावर गुजारा करून, अधिक मिळविण्याचे कष्ट करण्यापेक्षां, मिळालेल्या थोड्या वस्तूंपासून अवीट सुख अनुभवण्यास ते अधिक आतुर असतात, हें होय. त्यांचा हा प्रकृतिधर्म झालेला असतो. एरवीं पडक्या विहिरींतलें पाणी ओंजळीनें पिऊन आणि प्रवासभर पुरण्या-इतक्या एकदांच बांधून घेतलेल्या शिळ्या भाकरीचे तुकडे चावून झाडाच्या बुंध्याशीं शेंकडों– हजारों माणसें जीं रानावनांत गाढ झोपीं जातात तें त्यांना शक्य झालें नसतें. साधारण तहानभूक शांत झाली, थंडी, वारा, ऊन निवारलें गेलें– अथवा सहन झालें, प्रेमाचीं माणसें सहवासाला असलीं आणि पुरेसें आरोग्य असलें तर चित्ताला समाधानाचें सुख भरपूर मिळूं शकतें असा लक्षावधि लोकांचा अनुभव आहे.

उलट, संपत्ति आणि सत्ता यांच्यामुळें सुखप्राप्ति कमी झाल्याचीं उदाहरणें कांहीं थोडींथोडकीं नाहींत. सर्व दुःखाचें मूळ संपत्ति आहे असें साधुसंत नेहमीं सांगत आले आहेत आणि 'ज्याचे डोक्यावर मुकुट असतो त्याला शांत झोप येत नाहीं' हें शेक्स-पीअरच्या किंग लीरअचें वाक्य तर सुप्रसिद्धच आहे. एशू ख्रिस्ता-पासून तुकारामापर्यंत जगांतल्या सर्व साधुसंतांनीं दारिद्र्याचे गोडवे

गाइलेले आहेत आणि श्रीमंतीचीं दुःखें अमर्याद भडकपणें रंगविलेलीं आहेत.

सारांश, मन सुखी राहण्यास, चित्ताला शांतता लाभण्यास अथवा ( पुष्कळच गरीबांच्या बाबतींत खरी गोष्ट म्हणजे ) मनाला निष्काळजीपणा आणि सुखदायक सुस्ती येण्यास गरीबीची फारशी अडचण नसते आणि संपत्तीचा फारसा उपयोग नसतो हें कांहीं खोटें नाहीं. आणि म्हणून सोशॅलिस्ट पुढारी जेव्हां गरीब जनतेला 'श्रीमंत होण्यासाठीं झटा', 'समाजवादी अथवा सोशॅलिस्ट समाजरचना स्थापण्याकरितां झटा' म्हणून सांगत असतात तेव्हां गरीबांची कींव करण्यास उत्सुक असलेले किती तरी धनिक लोक 'गरीबांना त्यांच्या गरजा वाढवायला सांगून, त्यांच्या मनांत असमाधान उत्पन्न करून, संपत्तीच्या नादाला गरीबांना लावून, हे समाजवादी पुढारी गरीबांच्या सुखाची होळी करीत आहेत' असा समाजवाद्यांवर आरोप करीत असतात. खुद्द पुष्कळशा गरीबांचेंहि समाजवाद्यांसंबंधीं हेंच मत असतें. ज्या गरीबांना गरीबीनें चरितार्थ चालवितां येऊन त्याबद्दल थोडीशी निश्चिती मिळालेली असते ते समाजवाद्यांच्या उपदेशास मान देऊन आपला निद्राभंग अथवा सुस्तीभंग करून घेण्यास तयार होत नाहींत. पालथ्या घड्यावर पाणी ओतावें अथवा दगडावर कांच आपटावी त्याप्रमाणें समाजवाद्यांचा उपदेश अशा गरीबांचे बाबतींत वायांच जातो. गरीब लोक गरीबीविरुद्ध बंडास प्रवृत्त झाल्याचीं जीं उदाहरणें इतिहासांत दिसून येतात त्या सर्व वेळीं लक्षावधि गरीबांना अगदीं कदन्न खाण्याचीही ददात पडूं लागली, राज्यकर्त्यांकडून व वरिष्ठ वर्गाकडून दुःसह छळ झाला, आणि राज्यसंस्था व समाजव्यवस्था यांत बेबंदशाही माजली; तेव्हां सुस्तीचें सुखही अशक्य झाल्यामुळेंच गरीब लोक बंडास प्रवृत्त झाले.

इतिहासांत हे प्रसंग अपवाद मानण्याइतके थोडे असतात. एरवींच्या काळीं क्रांतिकारकांची व समाजवाद्यांची धनिकांकडून जेवढी उपेक्षा व विटंबना होते तेवढीच अथवा त्यापेक्षांहि गरीबांकडून अधिक होत असते.

## पण दारिद्र्य हा सामाजिक रोग आहे

पण दारिद्र्याचा जो खरोखर तिटकारा करावयाचा असतो तो त्यांत सुख नसतें म्हणून नव्हे, त्यानें नैतिक अधःपात होतो म्हणून; आणि या नैतिक अधःपातास कधींच मर्यादा राहत नाहीं. दरिद्री माणसें जेव्हां गोगलगाय झालेलीं दिसतात, तेव्हां ती त्यांची नम्रता नसून दीनपणा व लाचारी असते. मान-अपमानाची चाड दरिद्र्यां-च्या ठिकाणीं उत्पन्नच झालेली नसतें व पूर्वी सधन असून मागाहून निर्धन झालेल्यांची मानापमानाची भावना कालांतरानें करपून जाते. क्षुद्र फायद्यासाठीं कोणताही गुन्हा करण्याची लाज दरिद्र्याला राहूं शकत नाहीं. मनोनिग्रहाची व दूरदृष्टीची संवय दारिद्र्यांत अशक्यच होते.

दारिद्र्याच्या बाबतींतला नैतिक अधःपाताचा अनुभव सर्व धनिक व निर्धन माणसांना इतका परिचयाचा असतो कीं, त्याची फारशी तपशीलवार चर्चा करण्याचेंही कारण नाहीं. पण जी एक गोष्ट पुष्कळ धनिकांच्या लक्षांत येत नाहीं ती ही कीं, दरिद्री माणसांचें दारिद्र्य हें जितकें त्यांचें त्यांना वाईट आहे तितकेंच अथवा त्याहूनही अधिक वाईट तें धनिकांच्या व एकंदर समाजाच्याही दृष्टीनें आहे. दारिद्र्याचे परिणाम सांथीच्या रोगासारखे असतात. सांथीचे रोग जसे गांवाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत, देशाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत आणि जगाच्या एका टोकापासून

दुसऱ्या टोकापर्यंत पसरतात त्याचप्रमाणें तसेच दारिद्याचे दुष्परिणामही पसरत जातात. प्लेग, इन्फ्लुएंझा, देवी यांसारख्या भयंकर सांथींची धाड प्रथम गरीबांवर पडते हें खरें, पण गरिबांपासून श्रीमंतांनाही त्यांचा संसर्ग होतोच. गरीबीनें माजणाऱ्या गुन्हेगारीस मुख्यतः श्रीमंतच बळी पडतात आणि या गुन्हेगारीपासून संरक्षण करून घेण्यांत पोलीसखर्च सोसून जें यश येतें त्यापेक्षां दारिद्यनाशाचे उपाय योजून, गुन्हेगारीच्या प्रवृत्तीचें हें कारणच नाहींसें करून अधिक यश येतें असा सर्व सुधारलेल्या जगाचा अनुभव आहे. "दरिद्री मुलांच्या घाणेरड्या संवयी, शिव्यागाळींची प्रवृत्ति यांचा संसर्ग श्रीमंतांच्या मुलांना लागण्याचा फार संभव असतो. दरिद्री पण सुंदर स्त्रियांना प्रामाणिकपणें कष्ट करण्यापेक्षां वाईट वाटेनें चालून अधिक पैसा मिळतो असा अनुभव आला म्हणजे त्या श्रीमंतांच्या शरीरास विषारी संसर्ग करूं शकतात. तो संसर्ग पुढें त्या श्रीमंतांच्या स्त्रियांना होऊन त्यांच्या मुलाबाळांतहि पसरतो. ........जग हें एक कुटुंब आहे असें जे धर्मगुरु सांगत असतात तें केवळ एक निरर्थक धार्मिक वचन नसून तो शब्दशः सर्वांना येणारा अनुभव आहे. ....शिवाय दारिद्य जोंपर्यंत समाजांत राहूं शकतें व निर्माण होऊं शकतें तोंपर्यंत श्रीमंतांनाही आपण दरिद्री होऊं ही भीति आहेच. दुसऱ्यांना ढकलण्यासाठीं आपण खड्डा खणल्यास त्यांत आपणच केव्हां पडूं याचा नेम नाहीं; एखाद्या उंच कड्याला कठडा घातला नाहीं तर खेळतां खेळतां आपलीं मुलेंच त्यावरून केव्हां कोलमडतील हें कोण सांगणार ? दारिद्याच्या खड्ड्याला कुंपण नसल्यानें रोजच्या रोज किती तरी सन्मान्य आणि सधन कुटुंबें त्यांत पडलेलीं आपण पाहतों. आतां त्यांत पडण्याची पुढली पाळी आपली नव्हे असें छातीठोकपणें कोण सांगूं शकेल? अमुक एक तो

सोम्या दरिद्री झाला तो आपल्या कर्मानें झाला, त्याच्या दुष्कर्मानें त्याला शिक्षा दिली असें आपण मोठ्या बेफिकीरपणें म्हणत असतों. पण हें चूक आहे; आत्मघातकी आहे. कारण दारिद्र्याची शिक्षा दिल्यानें माणूस सुधारेल हें शक्य नाहीं. वर म्हटल्याप्रमाणें त्याचा अधिकाधिक अध:पातच होत जाईल; आणि त्याचे परिणाम शेवटीं त्याला व एकंदर समाजालाही भोगावे लागतील. एकादा मोटार-ड्रायव्हर दारू प्याला असला व बेफामपणें मोटार चालवीत असला तर त्याच्या या दुर्गुणाचें प्रायश्चित्त त्याचें तो सोशील म्हणून स्वस्थ बसून सोय नाहीं. एका दहा मिनिटांचे अवधींत दहावीसजणांचे तो जीव घेईल, पांचपन्नासांचे हातपाय मोडील आणि हजारों रुपयांची मालमत्ता धुळीस मिळवील. मलेरिया वाढविणारी दलदल, घाणीनें भरलेला उकिरडा, दारू पिऊन रस्त्यांत धावणारा दारुडा अथवा हातांत सुऱ्या फिरवीत गर्दींतून हिंडणारा गुंड हे जसे 'सार्वजनिक उपद्रव' मानण्यांत येऊन त्यांचा कायद्यानें बंदोबस्त केला जातो तसाच दारिद्र्याचाही बंदोबस्त केला पाहिजे. समाजांत दारिद्र्य येईल अशी परिस्थिति नष्ट केली पाहिजे; इतकेंच नव्हे तर दरिद्री होण्यास सर्वांस मज्जाव असला पाहिजे."

## दारिद्र्याचें प्राचीनत्व

दारिद्र्य हें अतिप्राचीन आहे. हें दारिद्र्य जीवसृष्टीच्या पांचवीला पुजलेलें आहे. 'जुनें तें सोनें' म्हणायचें असेल तर दारिद्र्य हें अगदीं बावनकशी सोनें म्हणून जतन करावें लागेल. 'आमचे प्राचीन पूर्वज वैभवसंपन्न होते' असें आपण म्हणतों त्या वेळीं कोणत्या एखाद्या वैभवाच्या प्राचीन काळास उद्देशून आपण असें म्हणूं शकतों कुणास कळे! पण होऊन गेलेल्या लक्षावधि वर्षांच्या काळांत दारिद्र्य व

तज्जन्य आपत्तींचा काळ हाच बहुतेक आहे असें आपणांस आढळून येतें. या जगावर कुडींत प्राण राहूं शकेल व त्याचें पोषण होऊं शकेल अशी परिस्थिति उत्पन्न झाल्यानंतरच ज़ीवसृष्टि जगावर नांदूं लागली असेल हें अगदींच खरें आहे. आणि जितकीं जीवपोषक द्रव्यें मुबलक अथवा तुरळक असतील तितकीच जीवसृष्टिही मुबलक व तुरळक असणार हें सयुक्तिक वाटतें. पण वस्तुस्थिति केवळ अशीच घडत आलेली नाहीं. जीवपोषक द्रव्यांची प्राप्ति आणि वाढ ज्या प्रमाणांत होईल त्याहून फारच अधिक प्रमाणांत जीवकोटीची वाढ जगावर झाली आहे आणि पोषक द्रव्यांपेक्षां जीवकोटीची संख्या नेहमीं वाढती राहिल्यामुळें दारिद्र्य हें प्राण्यांचा निरंतरचा सोबती राहिलें आहे. महापूर, वणवे, भूकंप, ज्वालामुखींचे स्फोट यांनीं जीवकोटीचा संहार अगणित प्रमाणांत चालू ठेवला असला तरी दारिद्र्य आणि उपासमार यांनीं मरण्यास असंख्य जीव शिल्लक राहिलेच आहेत. नवे नवे जीव प्रत्यहीं उत्पन्न होत आहेत आणि ते स्वतः भुकेनें तडफडून मेले आहेत; इतकेंच नव्हे तर मोठा मासा लहान माशास भूक शमविण्यासाठीं खाऊन टाकतो, चिमण्या-कावळे किड्यांना खातात, हिंस्र पशु इतर जनावरांना खातात आणि माणूस सर्वच पशुपक्ष्यांची शिकार करून त्यांना भक्षण करतो; यामुळेंच एका बाजूनें पोषक द्रव्यांचा पुरवठा वाढला आहे व दुसऱ्या बाजूनें पोषक द्रव्यांच्यापेक्षां जीव-जंतूंची जी फारच अधिक निपज होऊं शकते तिलाही आळा बसला आहे. पण एवढ्यानें ही जीवसंख्या पोषक द्रव्यांच्या आटोक्यांत कधींही राहिलेली नाहीं. जे प्राणी इतर खादाड प्राण्यांच्या भक्ष्यस्थानीं पडले नाहींत, रोगराई, वणवा, महापूर, धरणीकंप, ज्वालामुखी यांपैकीं कशानेंही मेले नाहींत, त्यांना पोषक द्रव्यांची टंचाई पडून

उपासमार भोगावी लागलीच आहे. वाघसिंहांसारख्या प्राक्रमी जनावरांसही श्वापद मिळालें नाहीं म्हणून फाके पडले आहेत. आणि उन्हानें पीक भाजून गेलें अथवा पावसानें वाहून गेलें म्हणून लक्षावधि शेतकरी उपासमारीनें सालोसाल हजारों वर्षें प्राणांस मुकले आहेत. पीक-पाण्याची सुबत्ता झाली त्या वेळीं लोकसंख्याही इतकी वाढली आहे कीं पिकलेलें पुरलें नाहीं म्हणून माणसाला पुन्हा फाके पडले आहेत. सारांश, 'दरिद्री हे नेहमीं तुमच्याभोंवतीं असणारच' हा जो बायबलांत एक दु:खोद्‌गार आहे तो, इतिहासकालांत दारिद्र्य हें अटळ आहे हा जो हजारों वर्षें मोठा क्रूर अनुभव मानवजातीस आला त्यामुळें निघालेला कडेलोटीच्या दु:खाचा व निराशेचा उद्‌गार आहे.

### माणसाचा सृष्टीशीं झगडा

आजतागायताच्या हजारों वर्षांच्या काळांतील मानवजातीचें दारिद्र्य कांहीं अंशीं अपरिहार्य होतें असें म्हणावें लागेल. हवेंतला ऑक्सिजन, सूर्याचा प्रकाश वगैरे जीवनाला अवश्य अशा वस्तु अनायासें माणसाला मिळतात हें खरें. तथापि बाकीची सर्व सृष्टि आहे अशीच मनुष्यपोषणाला अनुकूल नाहीं. मनुष्येतर सृष्टींत वाघ, सिंह, अस्वल वगैरे जनावरांना, अथवा पक्ष्यांना थंडीवाऱ्यापासून आपलें रक्षण करण्यास अंगावर केस दिले आहेत; नखें, दाढा वगैरे अत्यंत तीव्र शस्त्रें त्यांच्या अंगावरच उगवलेलीं आहेत. त्यांमुळें सृष्टीपासून पोषक अन्न त्यांस मिळवितां येतें. जन्मत: या साधनांनीं सज्ज असूनही या सर्व प्राण्यांना दारिद्र्य, महापूर, वणवा यांसारख्या नैसर्गिक आपत्तींना बळी पडावें लागतेंच. माणसांस तर हीं संरक्षण व पोषण यांचीं साधनें फार अपुरीं आहेत. पूर्वीं एका काळीं

माणूस हा माकड व त्यापूर्वीं पशुपक्षी वगैरे सर्व कांहीं होता, पण त्या सर्व अवस्थांतून 'विकास' पावत पावत तो हल्लींचें मनुष्य-रूप पावला असें शास्त्रज्ञ मानतात. तें खरें असलें तरी या विकासा-वस्थेंत निसर्गापासून आपलें पोषण व रक्षण करून घेण्याची त्याची नैसर्गिक साधनें नष्टच होत गेलीं. अर्थात् याच काळांत बुद्धि या साधनाचा विकास विशेष प्रकारें होत गेला. शरीरावरच सृष्टीशीं झगडण्याचीं—केस, नखें, दाढा इत्यादि—शस्त्रें उगवण्याचीं जीं बंद झालीं त्याऐवजीं निसर्गांतून हीं शस्त्रें निर्माण करून मनुष्यानें बुद्धिबळानें सृष्टीस आपल्या लगामीं लावण्याचा उद्योग आरंभिला. दगड मारून फळ पाडावें, अथवा शिकार करावी, त्यासाठींच पुढें तिरकमठ्यास बाण जोडून त्याचा उपयोग करावा, झाडाची फांदी तोडून व तीस पोखरलेल्या दगडाचा परशु जोडून झाड तोडावें, झाडाच्या टाहळ्या एकमेकांस जोडून व त्यांचें छप्पर करून त्यापासून थंडी, वारा, ऊन यांचें निवारण करावें लाकडावर लाकूड घासून अग्नि होतो हें निरीक्षून घर्षणापासून अग्नि तयार करण्याची कला साध्य करून घ्यावी, त्याच्या साह्यानें थंडीचें निवारण करून भक्ष्य शिजवून भाजून खावें, लोखंड इत्यादि निरनिराळ्या धातु तापवून ठोकून त्यांना निरनिराळे आकार देऊन भांडीं हत्यारें वगैरे करावीं; या प्रकारें दारिद्र्यनाशासाठीं हत्यारें करून व त्यांच्या साह्यानें सृष्टीशीं झगडून माणूस हजारों वर्षें मोठ्या यशस्वितेनें विकसत आला आहे. माणसाचें हें वैशिष्ट्य दाखविण्यासाठीं 'मनुष्य हा हत्यार बनविणारा प्राणी आहे' असें डॉ. फ्रँकलिननें म्हटलें आहे.

## माणसाचें समाज-कर्तृत्व

पण हत्यार करण्यापेक्षांही अधिक महत्त्वाची माणसाची कर्तब-गारी म्हणजे त्यानें निर्माण केलेली सामुदायिक राहणी, श्रम-

विभागाच्या तत्त्वावर केलेली समाजसंस्थेची मांडणी ही होय. हत्ती, हरणें वगैरे समुदायानें राहतात. पण समाजघटना अशी माणसानेंच बनविली आहे. मूल जन्मल्यापासून सृष्टीशीं अहर्निश चालणाऱ्या झगड्यांत टिकून राहण्यास समर्थ होण्याइतकें सामर्थ्य त्याच्या अंगीं येण्यास त्याला पुष्कळ वर्षें पोसून वाढवावें लागतें. यामुळें प्रथम मातृप्रधान अशी कुटुंबसंस्था निर्माण होऊन तींत कालांतरानें वैवाहिक बंधन निर्माण झालें. कुटुंबांत श्रमविभाग झाला तसा पुढें समाजांतही झाला आणि सैन्याचे अनेक विभाग जसे युद्ध जिंकण्याचे कामीं एकमेकांच्या सामर्थ्यावर व साहाय्यावर अवलंबून राहतात तसा मनुष्यसमाज हा सृष्टीशीं चालू असलेल्या झगड्यांत श्रमविभागानें विभागल्या गेलेल्या निरनिराळ्या घटकांच्या परस्पर-साहाय्यानें सृष्टीशीं झगडण्याचें आपलें कार्य पुढें चालवूं लागला. आणि या झगड्यास अवश्य त्या प्रकारें नवीं हत्यारें बनवीत व नव्या नव्या समाजव्यवस्था बनवीत मनुष्य मोठ्या कष्टानें काल कंठीत आला आहे. अगदीं तीनशें वर्षांपूर्वींपर्यंत माणसाची जमीन नांगरण्याची, कापड विणण्याचीं, भांडीं व हत्यारें करण्याचीं, वाट-चालीचीं व युद्ध करण्याचीं साधनें इतकीं ओबडधोबड व दुर्बल होतीं कीं, लोकसंख्येची वाढ आजच्या मानानें बरीच कमी असतां आणि रोगराई, महापूर व युद्धें यांनीं लोकसंख्येचा एकसारखा संहार होत असतां ददातीचें दुःख नाहींसें करण्याइतकें धन माणसास कधींच निर्माण करतां आलें नाहीं आणि दारिद्र्यदुःख हें माणसास अंगीं मुरलेल्या आनुवंशिक रोगासारखेंच सतत भोगावें लागलें आहे.

---

## संपत्तीस अकस्मात् आलेला महापूर

मात्र गेल्या तीनशें वर्षांपूर्वींच्या हजारों वर्षांत मानवजातीची जी ही हलाखीची परिस्थिति होती ती वर पाहिल्याप्रमाणें अपरिहार्य होती हें खरें असलें तरी गेल्या दीड-दोनशें वर्षांपासून माणसाचें सृष्टीवरील प्रभुत्व आणि धनोत्पादनसामर्थ्य इतकें वाढलें आहे कीं मानवजातीस आतां संपत्तीची ददात पडण्याचें कारण वास्तविक कांहींच राहिलेलें नाहीं पृथ्वीचा घेर २५ हजार चौरस मैल असूनही अवघ्या कांहीं शतकांपूर्वींच्या हजारों वर्षांत माणूस बेडकासारखा आपापल्या विहिरीएवढ्या लहान लहान जगांत कोंडलेला होता. पायांनीं नाहीं तर बैलगाडीनें, घोड्याच्या गाडीनें अथवा घोड्यावरून थोड्याफार मैलांची मजल मोठ्या मुष्किलीनें जातां येई. खानदेशांतून पुण्याला धान्य यायचें म्हटलें, म्हणजे चांगली सडक नसल्यानें कित्येक दिवस बैलगाडीस प्रवास करावा लागून मालाच्या किंमतीपेक्षां वाहतुकीचें भाडेंच अधिक होई. यामुळें देशाच्या एका भागांत धान्य पिकलें आणि दुसऱ्या भागांत दुष्काळ पडला तर पिकलें तेथें खपलें नाहीं म्हणून वायां जाऊन दुष्काळ भागांतलीं माणसें अन्नवस्त्राविणें थंडी-वाऱ्यांत उपाशी मरत. आतां गेल्या शतक-दीड शतकांत जिकडे तिकडे सडका उत्तम झाल्या, नौकानयनशास्त्रांत अफाट प्रगति होऊन आकाशमार्गही माणसानें काबीज केले. भूमीवर उत्तम सडका जगभर तयार होऊन मोटारींनीं

देशाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जाणें दर आठवड्यासही शक्य होऊं लागलें आहे. चुलींत बिस्तव पेटविण्यासाठीं धुरानें डोळे फोडून फूं फूं करतां करतां, फुप्फुसाचा भाता फुटून जाण्याची वेळ जेथें येई व हजारों-लाखों घरांतून या यातना प्रत्येक गृहिणीस वेगवेगळ्या भोगाव्या लागत तेथें आतां एक बटन दाबलें कीं हजारों लाखों दिवे एकदम लागतात, हजारों मैलांचे प्रदेश भरमध्यरात्रीं सूर्योदय झाल्याप्रमाणें प्रकाशमान होतात, लक्षावधि घोड्यांची शक्ति ज्यांसाठीं अपुरी पडेल अशीं यंत्रें जिवंत झाल्याप्रमाणें आपोआप चालूं लागतात. जंगलांतील एक एक झाड कुऱ्हाडीनें तोडणें, त्यांचीं लाकडें करवतीनें कापणें, त्यांचे खांब, तुळवटें, फळ्या करणें वगैरे कामें किती तरी माणसांना कित्येक महिने हळूहळू करावीं लागत; तेथें आतां लहान मुलें भेंडाचे बंगले बांधतात तितक्या वेगानें प्रचंड इमारतींचे, आगगाड्यांचें—मोटारींचें लाकूडकाम तयार होऊन पडत आहे. आभाळांतून गारांचा पाऊस पडावा त्याप्रमाणें जोडे, बूट, वहाणा यांचा पाऊस हजारों वर्षें अनवाणी चाललेल्या जनतेच्या डोकीवर पडूं लागला आहे. झेकोस्लोव्हाकियांतील एकटा एक बूटकारखानदार सगळ्या युरोपला बूट पुरवीत असून सगळ्या जगाला बूट पुरवीन अशी त्याला धमक आहे, शेंकडों कोष्ट्यांना विणतां येणार नाहीं इतकें कापड एक तरुणी नुसती यंत्रावर नजर ठेवून विणीत आहे व इंग्लंड अथवा जपान यांतील एक एक कापडगिरणीवाला सगळ्या जगाला वस्त्र नेसविण्याची पैज मारतो आहे. पर्वत हातावर घेऊन भरारी मारणाऱ्या मारुतीच्या पौराणिक कथा या फक्त कल्पनेच्याच भराऱ्या होत. पण हत्तीच्या वजनाचे हातोडे वाफेच्या आणि विजेच्या शक्तीनें लीलेनें उचलले जाऊन, हजारों फूट लांबरुंद पत्रा ठोकून साफ करून टाकीत आहेत. हा चमत्कार

तोंडांत बोट घालायला लावणारा आहे. गांवाजवळच्या शेतांतलें धान्य जेथें घरीं येऊन पोटांत पडण्याची मुष्कील होती तेथें जपानांत अथवा जर्मनींत अथवा अमेरिकेंत झालेलें चॉकोलेट पुण्यांत आपल्या घरीं पाळण्यांत बसून खातखात मुलें डुकल्या घेत आहेत. कानडांतला टोमॅटो हजारों मैल अंतरावर येऊन इंग्रजांच्या पोटांत शिरत आहे. इंग्लंडांत अभ्यासाला गेलेला पति मुंबईतल्या आपल्या प्रियतमेस टेलिफोनवर बोलावून आपला विरहानल शमवीत आहे, आणि तान्हुल्याला टेलिफोनवरून चुंबनसंदेश पाठवीत आहे.

फार मोठ्या धनिकांनाच हे अनुभव चाखतां येत आहेत असें नव्हे. मानवजातीचें सृष्टीवरील प्रभुत्व आणि सुबत्ता निर्माण करण्याची शक्ति अफाट वाढल्याचा अनुभव अगदीं सामान्य माणसाला अगदीं भोंवतालच्या जगांतहि येत आहे. "पैशाची पिशवी घेऊन बाजारांत गेलें, कीं दूध स्वस्त, तूप स्वस्त, लोणी स्वस्त, धान्य स्वस्त, भाज्या स्वस्त, टांगा-मोटार स्वस्त, कापडचोपड स्वस्त, जिकडे तिकडे स्वस्ताईस नुसता पूर आला आहे. गिऱ्हाइकाच्या पदरांत माल टाकण्यास दुकानदार पुडे बांधून आतुरतेनें उभे आहेत—नव्हे, शिकारीमागें धावावें त्याप्रमाणें 'माल घ्या—माल घ्या' म्हणून गिऱ्हाइकाचा पाठलाग करीत आहेत. आगगाड्या-मोटारींची सोय झाल्यामुळें आजीबाईनीं सोवळ्या-ओवळ्याच्या कल्पना थोड्याशा व्यापक केल्या, कीं त्यांना गंगोत्रीपासून रामेश्वरापर्यंतच्या सर्व देवदेवतांच्या भेटी मोठ्या आरामानें घेतां येऊं लागल्या आहेत. शेतांत जा, बाजारांत जा, गिरणींत जा, स्वदेशांत पहा, परदेशांत पहा, जिकडे तिकडे भोग्य संपत्तीची नुसती गर्दी उसळली आहे. उलट अमेरिकेंत कापूस खपत नाहीं म्हणून तो कमी पिकवा अशी ओरड चालली आहे. इंग्लंड-जपान यांचें सुरेख कापड ज़गांत गोर-

गरिबांच्या अंगावर जुलमानें चाल करून येऊं पाहत आहे. कानडांतला गहूं युरोपांतल्या आणि ऑस्ट्रेलियांतला गहूं हिंदुस्तानांतल्या गरीबांच्या दाढेंत जाण्यासाठीं पळत येऊं लागला आहे. रोगराई नाहींशी करण्यासाठीं राष्ट्रसंघ जगभर कमिशनें धाडीत आहे." सुबत्तेची केवढी ही लयलूट !

## नाना फडणीस स्वर्गांत चकित होईल !

खरोखर शिवाजी अथवा नाना फडणवीस या ऐतिहासिक थोर पुरुषांना आजच्या जगाची ही नवलकथा कोणी स्वर्गांत जाऊन सांगितली तर ते आश्चर्यानें आणि आनंदानें वेडे होऊन नाचूं लागतील. यातायात, यातना, लुबाडणूक, जुलूम, दुखणीं आणि सृष्टिप्रकोप या सर्वांपासून शास्त्रीय शोधांच्या या प्रगतीमुळें मानवजात मुक्त झाली असेल, आणि स्वर्गांतल्या पूर्वी केवळ काल्पनिक मानलेल्या सुखांत मानवजात आज प्रत्यक्षपणें दंग झाली असेल, असेंच त्यांना वाटेल. ते म्हणतील, 'आतां इतकी सुबत्ता झालेली असेल, तर दारिद्र्य, उपासमार, रोगराई यांची पीडा असूं शकेल तरी कशी?' शूद्रक राजाच्या राज्यांत सुबत्ता व शांतता इतकी होती कीं, तेथें भांडणें नसल्यानें हत्यारांना गंज अथवा कलंक चढला होता आणि बाकी सर्व वस्तुजात निष्कलंक होतें; दुःख इतकें नाहींसें झालें होतें कीं, डोळ्यांतून आंसवें आणण्यासाठीं यज्ञ करून समिधांचा धूर करावा लागे; भांडण चालल्यासारखा वादविवाद कोठें चालला तर तो शास्त्रीपंडितांत शास्त्रविषयांसंबंधीं चाले; एरवीं सर्वत्र प्रेमालाप, गुजगोष्टी आणि पुष्पसुगंध यांनींच वातावरण दरवळून गेलेलें होतें; असें बाणभट्टानें शूद्रकाच्या राज्याचें कादंबरींत केलेलें वर्णन नानाफडणिसानें वाचलें होतें. ज्या इंग्रजांशीं आपण आयुष्यभर झुंझ

दिली त्यांनीं हिंदुस्तानांत हें शूद्रकाचें साम्राज्य आज स्थापन केलें असेल असें वाटून नाना फडणिसांचा आनंद स्वर्गांत मावणारही नाहीं. कारण, ते म्हणतील, ऐन तारुण्यांत पोषक अन्न नाहीं म्हणून माणसाची वाढ खुरटण्याचें आतां काय कारण ? सर्वांनाच भरपूर अन्न, वस्त्र व आश्रय असला आणि रोगराईवर नाना तऱ्हेचे तोडगे तयार झाले असले, तर माधवरावासारख्या उमद्या तरुणास ऐन तारुण्यांत लढायांची यातायात करून क्षयरोगानें मरण्याचें कारण काय ? सती रमाबाईस तारुण्यांतच अग्निकाष्ठें भक्षिण्याचा प्रसंग आतां कशाला ? आणि पुतण्याचा खून करण्याचें आततायी कृत्य करण्याची प्रेरणा आनंदीस येण्याचें आतां काय कारण ? जिकडे तिकडे सुबत्ता आणि सामुदायिक जीवन यांचे वारे वाहूं लागले असतां समाजांत स्पर्धा राहिलीच, तर सज्जन कोण आहे हें सिद्ध करण्यांतच राहील, असें नव्हे का ? म्हातारीं माणसें आतां कवडी-कवडी सांठविण्याचा धनलोभ कां धरतील ? सर्वांनाच भरपूर असेल तर एक दुसऱ्याचें कशाला घेईल ? मग चोरी करणार कोण आणि कशाची ? आणि मग भांडेल कोण आणि कां ? आणि मग शस्त्रें तरी कशाला ? हातकड्या, पायबेड्या आणि मास्तरच्या छड्या, घरांचीं कुलुपें आणि अडसर, बंदुका आणि तोफा आणि तरवारी, या सर्वांचा लोकांना तिटकारा आला असेल आणि जुन्या काळच्या या लाजिरवाण्या आठवणी समुद्रांत बुडवल्या गेल्या असतील असेंच नाना फडणविसांना वाटेल. श्रीकृष्ण, शिवाजी यांसारखे थोर मानले गेलेले पुरुष हे निव्वळ भांडकुदळ होते, क्रूर होते असें वाटून व त्यांची विस्मृति पडावी म्हणून मृत्युलोकांत खटाटोप चालला असेल आणि ज्या आम्हीं पूर्वजांनीं यथाशक्ति, यथामति झटून मानववंश पुढें चालविला त्याबद्दल मानवजात कृतघ्न झाली असेल, एवढ्या एकाच शंकेनें नाना

फडणिसांस स्वर्गात दुःख होईल. सेनापतीचें शौर्य, फडणिसांचीं मुत्सद्देगिरी आणि कारस्थानांचा पाताळयंत्रीपणा यांना हल्लींच्या मृत्युलोकांत रोजगारीही मिळणार नाहीं असें नानांना वाटेल; पण एकंदरीनें आपल्या मागून का होईना अखिल मानवजात सुखी, शांतिमय, उत्साही, आनंदी, कलानिपुण झाली असेल या कल्पनेनें त्या थोर मुत्सद्द्याचा जिवंतपणीं तापलेला व त्रासलेला आत्मा मृत्युलोक सुखी झाला या कल्पनेनें गारीगार होईल यांत शंकाच नाहीं.

---

## संपत्तीच्या समुद्रांत दारिद्र्याचा वणवा : : : ३

### धनवृद्धीचें लक्षण कोणतें ?

माणसाचें उत्पादनसामर्थ्य सर्व बाजूंनीं वाढलें व वाढत आहे. ही बातमी ऐकून येथील माणसांच्या सुखी जीवनाबद्दल नाना फडणीस स्वर्गात निव्वळ तर्काचें मनोराज्य कसें करूं लागेल हें वर सांगितलें; आणि तें सयुक्तिक नाहीं असें कोण म्हणेल ? पण प्रत्यक्ष मनुष्यसृष्टींत आज असा अनुभव कोठें येत आहे ? जें वैभव झगझगीत व म्हणून आकर्षक दिसलें व हर्षभरानें कवटाळलें ते पेटलेले निखारे आहेत, लोखंडाचे तापून लाल झालेले गोळे आहेत असा अनुभव मानवजातीस कां येत आहे ? माणसाची जी

धनोत्पादन शक्ति अफाट वाढली तिला त्यानें कवटाळलें तों ती आज त्यास राक्षसाप्रमाणें खायला टपल्यासारखी दिसते आहे, हा चमत्कार काय? नाना फडणिसाचा तर्क व आपला आजचा अनुभव यांमध्यें जमीन-अस्मानाची तफावत दिसत आहे; भोग्य संपत्तीस जिकडे तिकडे पूर आलेला दिसत असला तरी ज्या असंख्य मानवजातीनें ती संपत्ति भोगावी तिलाच नेमकी ती दुर्लभ झाली आहे. शीतल जलाशयाच्या मध्यभागीं बसून अंगाचा प्रखर दाह होत असावा त्याप्रमाणें अन्नवस्त्रांच्या राशींशेजारीं माणूस उपाशी व अर्धनग्न असा तळमळत आहे. कधीं नव्हे तें धान्य ज्याच्या शेतांत पिकलें तो शेतकरी कर्जाच्या भाराखालीं दडपून गेला असून पोटभर खाऊन धन शिल्लक उरण्याऐवजीं सर्व उत्पन्न सरकारास व सावकारास देऊन त्याचें ऋण शिल्लक राहत आहे. सुबत्तेच्या देशांतून दुष्काळी प्रदेशांत धान्य नेण्याची आज यंत्रयुगांत आगगाडीनें सोय केली, म्हणून माणूस आपल्या कर्तृत्वाचे धन्यवाद गातो, तोंच उपाशी कंगालांनीं दंगाधोपा करूं नये म्हणून त्यांना गोळ्या घालण्याकरितां त्याच आगगाडींतून सैनिक उतरलेले पाहून माणूस भयचकित झाला आहे. गांवकरी उपाशी असतां गांवांतल्या धनिकांचें धान्यही आगगाडी बाहेरगांवीं पळवून नेते हें दिसत असूनही बंदुकीच्या गोळ्यांच्या धाकानें माणूस मनगटें चावीत आहे. माणसाचे श्रम सुखाचे झाले, सोपे झाले, कमी झाले. कमी त्रासांत, कमी श्रमांत मुबलक व सुबक असे नानापदार्थ निर्माण होऊं लागले. पण आतांही लोकांना त्यांचा उपभोग मिळूं नये हें काय? पूर्वीं अवर्षण अथवा अतिवृष्टि होऊन पीकपाणी न होई त्या वेळीं दुष्काळ पडे व हजारों, लाखों आबालवृद्ध उन्हांत अथवा महापुरांत उपाशी तडफडून मरत हें स्वाभाविक व सहज समजण्याजोगें होतें. पण

आज सर्व प्रकारची संपत्ति विपुल होऊन उतूं चालली असतां लक्षावधि लोकांवर थंडी-वाऱ्यांत कुडकुडून उपाशी मरण्याचा प्रसंग कां यावा? जुन्या दारिद्र्यांत संपत्तिच नव्हती म्हणून भोगायलाही मिळत नसे; पण आज पाहावें तों डोळ्यांपुढें अन्नाचे ढीग पडून राहून ते भुकेलेल्यांच्या डोळ्यांत सलत आहेत, पण त्यांच्या पोटांत मात्र जात नाहींत. कांहीं मूठभर लोक या संपत्तीवर चैनही करतात. पण त्यांनीं चैनींत उधळल्यानंतर उरलेली संपत्तिही बाकीच्या उघड्या, नागड्या आणि भुकेल्या ज़गाला कां मिळूं शकत नाहीं? एखादा मोठा उडाणटप्पू केवळ श्रीमंत आईबापांच्या पोटीं जन्माला आला म्हणून मोटारी उडवितो, पण लक्षावधि इतरांना पायांत पायताणहि नाहीं हें काय? आधिभौतिक प्रगति झाली आहे, होत आहे असें म्हणतात. याचा पुरावा काय? प्रगतीचीं लक्षणें तरी कोणतीं? मोठमोठ्या भव्य इमारती, कारखाने, जहाजें, विमानें, उद्यानें, नाना प्रकारच्या सुखसोई हीं सारीं प्रगतीचीं लक्षणें म्हणावीं, तर प्रचंड तुरुंग, दडपशाहीचे कायदे, विमानांतून पडणारे बॉंब, विषारी वायु, हविट्झर तोफा, पाणबुड्या आणि टॉर्पेडो, पिस्तुलांच्या गोळ्या आणि मृत्यूची शिक्षा देणाऱ्या विजेच्या खुर्च्या, हींहीं या प्रगतीचींच लक्षणें म्हणावीं कीं काय? पहिल्या वस्तूंची यादी ही थोड्या धनिकांना आणि दुसऱ्या वस्तूंची यादी ही असंख्य गरीबांना मिळते. या गरीबांची संख्या धनिकांच्या कित्येकपट मोठी आहे. तेव्हां गरीबांच्या दृष्टीनें ही जगाची प्रगति चालू आहे कीं अधःपात चालू आहे? काय म्हणावें याला?

### समाजशरीराचा विच्छेद

जगाची संपत्ति पूर्वी १०० होतीं असें मानलें तर आज १००० झाली हें खरें असेल. ज्यांच्याजवळ पूर्वी ५ संपत्ति होती त्यांच्याजवळ

आतां १० झाली असेल व पूर्वी ज्यांजवळ ९५ होती त्यांजवळ आतां ९९० झाली असेल. पण यांत दोघांच्याही संपत्तीची वाढ झाली असली तरी विषमतेची वाढ त्याहीपेक्षां मोठी आहे. सुख-दुःख हें कांहीं मर्यादेपलीकडे सापेक्षच असतें. सर्वांना समान अशा दुःस्थितींतही जें एक सुख असतें तें आज अतिशय कमी झालें असून विषमतेच्या दुःखाची धार विषारी शस्त्रधारेसारखी तीक्ष्ण व दाहक झाली आहे. आणि जी थोडी सांपत्तिक वाढ झाली आहे ती तरी, विषम प्रमाणांत का होईना पण, सर्वांना कुठें मिळाली आहे? नव्या कारखान्यांपुढें ज्यांचे जुने धंदे बुडाले आणि नवी रोजगारी मिळाली नाहीं ते बेकारीच्या खाईत भाजत पडले आहेत. ज्यांना नोकरी आहे, धंदा आहे, त्यांना, फाशीची शिक्षा झालेल्या माणसाला जीविताबद्दल जशी क्षणोक्षणीं अनिश्चिती व निराशा वाटत असते तशी, आपल्या धंद्याबद्दल, नोकरीबद्दल वाटत आहे. मग हीच ती आधिभौतिक प्रगति कीं काय? खवळलेला तुफान दर्या पाहण्याला फारच मनोहर! कोणाही कवीला केवढी तरी मोठी काव्यस्फूर्ति होईल! पण ज्या खलाशाचें जहाज उपडें होऊन त्याच्या नाकातोंडांत तो खवळलेला खारा काव्यरस शिरूं लागेल त्यालाहि समुद्रदर्शनानें आनंदच व्हावा काय? एका बाजूस लक्ष्मीपूजनांत दुधाच्या चर्व्या एकसारख्या ओसंडून चालल्या आहेत आणि दुसऱ्या बाजूस तरुण आईच्या पोटांत अन्न नाहीं म्हणून स्तनांत दूध नाहीं, आणि तिचें अर्भक दुधाच्या आशेनें आईचा प्राण तोडीत आहे; हें असें कां? माणसाचें धनोत्पादन-सामर्थ्य वाढूं लागलें त्या वेळीं वाटलें कीं, आतां हें सामर्थ्य सर्व मानवसमाजास आपल्या खांद्यावर घेईल, सर्वांचीं डोकीं आकाशाला लागतील, मधल्या सुटींत स्वर्गातल्या नंदनवनांत फेरी मारून पटकन

परत भूलोकावर येतां यावें इतका स्वर्ग जवळ येईल; पण झाला आहे चमत्कार वेगळाच. माणसाचें वाढलेलें धनोत्पादन-सामर्थ्य समाजास खांद्यावर न घेतां अखिल मानवजातींत तिरपी पाचर ठोकून बसलें आहे. जसजसें हें धनोत्पादन-सामर्थ्य वाढतें आहे तसतशी ही पाचर अधिकाधिक आंत आंत घुसत असून, पाचर तिरपी असल्यानें, तिच्यावरचा भाग अधिकाधिक उन्नत पण अधिकाधिक लहान, व दुसरा पाचरीच्या खालचा अधिकाधिक मोठा पण अधिकाधिक नीच अवस्थेस चालला आहे. या उभयतांतील अंतर वाढत चाललें आहे. शिवाय ही पाचर लाकडाच्या निर्जीव ठोकळ्यांत ठोकलेली नसून जिवंत समाज-शरीरांत ती ठोकली जात आहे, हें पुष्कळ सुज्ञांना कळत आहे. समाजाच्या एका भागांत उत्पन्न होणारा रस दुसऱ्या भागास पोंचून शरीर जिवंत राखण्याचें व तें वाढविण्याचें कार्य या पाचरीनें खुंटणार असून दुभंगलेल्या समाजाचे हे दोन्हीही अवयव कालांतरानें मृत्युमुखीं पडणार हा धाक शहाण्या लोकांना आतां दिसूं लागला आहे. 'वाढतें धनोत्पादनसामर्थ्य' या नांवाची ही सोन्याची सुरी आपलें वैभव वाढविण्याऐवजीं आतां उरांत घुसून समाजाचें प्राणहरण करूं लागली आहे असा संशय विचारवंतांस वाटूं लागला आहे. पण हें असें कां होत आहे? कोणाचीही इच्छा असा अनर्थ घडून यावा अशी नाहीं; तरीही हा अनर्थ कां कोसळत आहे?

**जुना काळ व नवा काळ**

जुन्या काळापेक्षां हल्लीं धनोत्पादनाचीं आणि वाहतुकीचीं वगैरे साधनें वाढलीं खरींच; पण अनुभव असा दिसतो कीं, यापायींच बहुसंख्य समाजाचें दारिद्र्य वाढत असून उलट मूठभर लोकांची संपत्तिही जगांत वाढत आहे. प्रस्तुतच्या यंत्र-युगाकडे यंत्र-युगापूर्वी-च्या कालाच्या तुलनेनें पाहिल्यास ही गोष्ट सहज लक्षांत येते.

"महाराष्ट्रांतील एका खेड्याचें दोनशें वर्षांपूर्वींचें चित्र व आजचें चित्र यांची तुलना करतां काय दिसतें पहा. या खेड्याचें मुख्य पीक आंबे-मोहोर तांदूळ आहे असें समजूं. खेरीज नाचणी, वरई, सावा, तूर, मूग, ऊंस, मिरची, करडई, कापूस इत्यादिही पिकतें. सारांश, मिठा-खेरीज बहुतेक सर्व आवश्यक जिनसा या व आसपासच्या खेड्यांत पिकत असत. गांवांत एक, दोन, चार कांहीं तरी सावकार होते. हे शेतकऱ्यांना कर्जें देत व त्यांच्या जमिनी तारण लावून घेत. कर्जें न फिटलीं तर जमिनी विकल्या जात असतील व सावकार त्या घेत असेल. मग त्या जमिनीचें पीक सावकारच सगळें घेत असेल. पण तें सगळें पीक सावकारास संपविता येणार कसें? पेवांत ठेवलें तर दोन सालांत त्याची कुजून माती होणार! बैलाच्या खटाऱ्यांतून किती माल कोठवर पाठविणार? एतावता, अखेर गांवच्या शेतकऱ्यांनाच तो तांदूळ या नाहीं त्या रूपांत खावयास मिळे. कधीं कधीं गहाण पडलेल्या जमिनी कर्जसुटीनें अथवा सव-लतीनें शेतकऱ्यांना परतही मिळत. जमीन सावकाराची अथवा शेतकऱ्याची कोणाचीही असली तरी शेतकऱ्यांनीं पीक-पाणी काढल्यावांचून सावकार खाणार काय? म्हणून जमिनीची वहिवाट शेतकऱ्यांकडे कायमचीच राहत असे. यामुळें जमिनीचा मालक कोण हा प्रश्न आजच्या मानानें फारच कमी महत्त्वाचा मानला जाई. राज्यसंस्था दुर्बल असल्यानें बहुसंख्य शेतकऱ्यांच्या आनुकूल्यानें व खुषीनें सावकाराचा धंदा चालणें शक्य होई. ........यामुळें मालकी हक्काची विभागणी कशीही झाली तरी व्यवहारांत 'गांवानें पिकवावें व गांवानें खावें' असेंच घडे आणि ज्या सालीं खूप पिकें त्या सालीं सावकारापासून भिकाऱ्यापर्यंत सर्वांना आंबेमोहोर पोटभर खावयाला मिळे.

ग्रंथालय दा. क. ५६९८

परत भूलोकावर येतां यावें इतका स्वर्ग जवळ येईल; पण झाला आहे चमत्कार वेगळाच. माणसाचें वाढलेलें धनोत्पादन-सामर्थ्य समाजास खांद्यावर न घेतां अखिल मानवजातींत तिरपी पाचर ठोकून बसलें आहे. जसजसें हें धनोत्पादन-सामर्थ्य वाढतें आहे तसतशी ही पाचर अधिकाधिक आंत आंत घुसत असून, पाचर तिरपी असल्यानें, तिच्यावरचा भाग अधिकाधिक उन्नत पण अधिकाधिक लहान, व दुसरा पाचरीच्या खालचा अधिकाधिक मोठा पण अधिकाधिक नीच अवस्थेस चालला आहे. या उभयतांतील अंतर वाढत चाललें आहे. शिवाय ही पाचर लाकडाच्या निर्जीव :ठोकळ्यांत ठोकलेली नसून जिवंत समाज-शरीरांत ती ठोकली जात आहे, हें पुष्कळ सुज्ञांना कळत आहे. समाजाच्या एका भागांत उत्पन्न होणारा रस दुसऱ्या भागास पोंचून शरीर जिवंत राखण्याचें व तें वाढविण्याचें कार्य या पाचरीनें खुंटणार असून दुभंगलेल्या समाजाचे हे दोन्हीही अवयव कालांतरानें मृत्युमुखीं पडणार हा धाक शहाण्या लोकांना आतां दिसूं लागला आहे. 'वाढतें धनोत्पादनसामर्थ्य' या नांवाची ही सोन्याची सुरी आपलें वैभव वाढविण्याऐवजीं आतां उरांत घुसून समाजाचें प्राणहरण करूं लागली आहे असा संशय विचारवंतांस वाटूं लागला आहे. पण हें असें कां होत आहे? कोणाचीही इच्छा असा अनर्थ घडून यावा अशी नाहीं; तरीही हा अनर्थ कां कोसळत आहे?

## जुना काळ व नवा काळ

जुन्या काळापेक्षां हल्लीं धनोत्पादनाचीं आणि वाहतुकीचीं वगैरे साधनें वाढलीं खरींच; पण अनुभव असा दिसतो कीं, यापायींच बहुसंख्य समाजाचें दारिद्र्य वाढत असून उलट मूठभर लोकांची संपत्तिही जगांत वाढत आहे. प्रस्तुतच्या यंत्र-युगाकडे यंत्र-युगापूर्वीं-च्या कालाच्या तुलनेनें पाहिल्यास ही गोष्ट सहज लक्षांत येते.

"महाराष्ट्रांतील एका खेड्याचें दोनशें वर्षांपूर्वीचें चित्र व आजचें चित्र यांची तुलना करतां काय दिसतें पहा. या खेड्याचें मुख्य पीक आंबेमोहोर तांदूळ आहे असें समजूं. खेरीज नाचणी, वरई, सावा, तूर, मूग, ऊंस, मिरची, करडई, कापूस इत्यादिही पिकतें. सारांश, मिठाखेरीज बहुतेक सर्व आवश्यक जिनसा या व आसपासच्या खेड्यांत पिकत असत. गांवांत एक, दोन, चार कांहीं तरी सावकार होते. हे शेतकऱ्यांना कर्जें देत व त्यांच्या जमिनी तारण लावून घेत. कर्जें न फिटलीं तर जमिनी विकल्या जात असतील व सावकार त्या घेत असेल. मग त्या जमिनीचें पीक सावकारच सगळें घेत असेल. पण तें सगळें पीक सावकारास संपविता येणार कसें ? पेवांत ठेवलें तर दोन सालांत त्याची कुजून माती होणार ! बैलाच्या खटाऱ्यांतून किती माल कोठवर पाठविणार ? एतावता, अखेर गांवच्या शेतकऱ्यांनाच तो तांदूळ या नाहीं त्या रूपांत खावयास मिळे. कधीं कधीं गहाण पडलेल्या जमिनी कर्जसुटीनें अथवा सवलतीनें शेतकऱ्यांना परतही मिळत. जमीन सावकाराची अथवा शेतकऱ्याची कोणाचीही असली तरी शेतकऱ्यांनीं पीक-पाणी काढल्यावांचून सावकार खाणार काय ? म्हणून जमिनीची वहिवाट शेतकऱ्यांकडे कायमचीच राहत असे. यामुळें जमिनीचा मालक कोण हा प्रश्न आजच्या मानानें फारच कमी महत्त्वाचा मानला जाई. राज्यसंस्था दुर्बल असल्यानें बहुसंख्य शेतकऱ्यांच्या आनुकूल्यानें व खुषीनें सावकाराचा धंदा चालणें शक्य होई. ........यामुळें मालकी हक्काची विभागणी कशीही झाली तरी व्यवहारांत 'गांवानें पिकवावें व गांवानें खावें' असेंच घडे आणि ज्या सालीं खूप पिके त्या सालीं सावकारापासून भिकाऱ्यापर्यंत सर्वांना आंबेमोहोर पोटभर खावयाला मिळे.

ग्रंथालय
दा. क. ५६९८

उलट आजची स्थिति पहा. खेड्यांतील सावकारास कर्जाच्या तारणाच्या रूपानें जमिनी मिळूं लागल्या म्हणजे हलकें हलकें सावकाराचा जमीनमालक होतो. गांवांतल्या अधिकाधिक जमिनीचें धान्य त्याच्या मालकीचें होतें. पण आतां स्वत:स संपविणें शक्य नाहीं म्हणून कर्जाच्या, दानाच्या, जेवणावळींच्या इत्यादि रूपानें गांवाला देऊन टाकण्याची त्याला गरज राहत नाहीं. घरांतल्या पेवांत ठेवून कुजून वायां घालविण्याची आपत्तिही आतां राहिलेली नाहीं. साऱ्या गांवाच्या जमिनींतून उत्पन्न होऊन जमीनमालक-सावकाराच्या घरीं येणारा आंबेमोहोर आतां खेड्यांतून मोटारींत बसून घट्ट सडकेवरून आगगाडीवर येतो. तींत बसून आगबोटींत जातो व तेथून जगाच्या निरनिराळ्या भागांत जातो. आंबेमोहोराचा प्रतिनिधि जमीनदारास मिळतो. या प्रतिनिधीची मूर्ति लहान पण कीर्ति थोर ! हा चार बोटांच्या लहानशा खिशांत मावतो. नासत नाहीं, कुजत नाहीं. लगामानें घोडा खेचावा अथवा अंकुशानें हत्ती वांकवावा त्याप्रमाणें हा प्रतिनिधि जगांतली हवी ती उपभोग्य वस्तु अथवा व्यक्ति मालकाच्या सेवेस खेचून आणतो. असा हा अद्भुत सामर्थ्याचा प्रतिनिधि कोण ? पैसा ! केवळ कागदी नोट ! आतां जमीनमालकास शेतकऱ्याचे श्रम पूर्वीप्रमाणेंच हवे असले तरी त्याची मानसिक अनुकूलता, खुषी, स्नेहभाव यांची पर्वा करण्याचें कारण नाहीं. राज्यसंस्था, तिचे पोलीस, लष्कर इ. जोरकस असल्यामुळें शेतकऱ्याच्या नाखुषीपासून जमीनदारास भीति नाहीं. आंबेमोहोर स्वतां खाऊन उरलेल्या राशीचें काय करूं याची काळजी नाहीं. पण आतां गांवच्या शेतकऱ्यांस आंबेमोहोर खायला मिळत नाहीं. नाचणी आणि वरई त्याच्या नांवानें उरते. करडईची पेंड अथवा सरकी खाऊन गाईम्हशी मालकास कसदार दूध देतात; आणि

गाई-म्हशींच्या संगतींत राहणारा हा शेतकरी नाचणी, वरई खाऊन आंबेमोहोर जमीनदारास अर्पण करतो.

एवढ्यानेंच काय झालें? एक खेडें म्हटलें कीं, तेथें माणसाच्या गरजा भागविणारे अठरा कारखाने चाललेले असावयाचे; पण त्यांत होणाऱ्या मालापेक्षां किती तरी अधिक प्रकारचा व उंची माल आगबोटी, आगगाड्या दुरून दुरून आणतात. आणि त्याचे मोबदल्यांत सावकाराच्या खिशांतला आंबेमोहोराचा प्रतिनिधि घेऊन जातात. आणि गांवांतले अठरा कारखाने आपल्या मालाला गिऱ्हाईक नाहीं म्हणून बंद पडतात. या गांवांतल्या प्राचीन कारागिरांना—कोष्टी, लोहार, सुतार, शिंपी, यांना आता आंबेमोहोर नाहीं, त्याचा प्रतिनिधि नाहीं, नाचणी नाहीं, वरई नाहीं नी कांहींच नाहीं, अशी कफल्लक अवस्था प्राप्त होते. ....सारांश, दोनशें वर्षांपूर्वी गांवची सर्व जमीन सावकाराकडे गेली तरी गांवच्या संपत्तीचा उपभोग साऱ्या गांवाला मिळूं शके. पण यंत्रयुगानें सडका, आगगाड्या, मोटारी, आगबोटी यांची सोय करून राज्यसंस्था जबरदस्त केली. यामुळें सावकारानें कराराच्या जोरावर मिळविलेली जमिनीची मालकी खेड्यांतील जनतेच्या जीविताचा विध्वंस करीत आहे. गाईचें दूध माणसानें प्यावें व गाईनें करडईची पेंड खावी, तद्वत् आमच्या शेतकऱ्यानें नाचणी खावी, आणि त्यानें निर्मिलेला आंबेमोहोर परदेशांतल्या वस्तरे करणाऱ्या शिकलगारानें अथवा मोटारी आगगाड्या बनविणाऱ्या सुतारा-लोहारांनीं खावा अशी अव्यवस्था माजली आहे."

गेल्या पांच-सात वर्षांचा शेतजमिनींचा इतिहास कोणीही पाहिल्यास पाऊसपाणी होऊनही दुर्भिक्ष्य माजलें आहे हें त्यास दिसून येईल. येथल्या शेत-जमिनींच्या पिकांस बाजारांत

चढाओढ करावी लागून शेतकरी व जमीन-मालक यांचे अनुक्रमें श्रम व भांडवल आंत-बट्ट्यांत येऊं लागलें. यामुळें शेतकऱ्याचें कर्ज वाढलें व त्याची उपासमारही होऊं लागली. जमीन-मालक जमिनींत भांडवल न घालतां इतर धंद्यांत, नाहीं तर सरकारी रोख्यांत गुंतवूं लागले आणि भांडवलाविना जमिनी नापीक होऊन शेतकऱ्याच्या दारिद्र्याची वाढ जोरानें होऊं लागली. पाऊसपाणी ठीक असतांही आतां जमिनीस जणूं कांहीं पिकण्यास बंदीच करण्यांत आली आहे.

या सर्व अनर्थांची उपपत्ति लावण्याचा प्रयत्न पुढील प्रकरणांत करूं.

---

## आर्थिक अनर्थांची उपपत्ति : : : ४

### यंत्रापुढें हस्तव्यवसायाचा पराभव

यांत्रिक साधनांनीं संपत्तीचें उत्पादन होऊं लागलें तेव्हांपासून थोड्या श्रमांत व थोड्या खर्चांत सुबक माल निर्माण होऊं लागला व तो स्वस्त विकणें यंत्राच्या मालकांना परवडूं लागलें. तेव्हां या यंत्रोत्पन्न मालाची जुन्या हस्तव्यवसायी कारागिरांच्या मालाशीं बाजारभावांत चढाओढ होऊन हस्तव्यवसायी कारागिरांचा उणाख व महाग माल खपेनासा झाला व या कारागिरांचे हस्तव्यवसाय बुडाले. अर्थात् स्वतः यंत्रें उभारून कारखाने काढण्यास यांना कायद्याची बंदी नव्हती. पण त्यांना ती गोष्ट करणें शक्यच नव्हतें.

हस्तव्यवसायी वर्ग सगळा दरिद्री असून रोज हातावर मिळवावें व तेवढें खाऊन दुसरे दिवशींची मेहनत करावी असें आयुष्य कंठणारा होता. त्याच्या हस्तव्यवसायाचीं साधनें साधीं, कमी खर्चाचीं असत व तीं वापरण्याचें ज्ञान व कसब त्यास परंपराप्राप्त असे. पण यंत्रांची गोष्ट अशी नव्हती. त्यांच्या उत्पादनास फार खर्च पडे व तीं चालविण्यास विशेष ज्ञानाची व कसबाची गरज होती. यामुळें ज्या कारागिरांचे हस्तव्यवसाय यंत्रोत्पन्न मालाशीं चढाओढ करतांना बुडाले त्या कारागिरांजवळ स्वतांच्या हातापायांखेरीज चरितार्थ-संपादनाचें साधन कांहींच राहिलें नाहीं व ते रोजगार मागण्यास यंत्रवाल्या कारखानदाराच्या दारीं गेले. यंत्रवाल्याजवळ भांडवल भरपूर असून त्याला यंत्रावर काम करण्यास माणसें पुष्कळ लागत. कच्चा माल पुष्कळ व रोख खरेदी करणें, मजुरांना मजुरी देऊन टाकणें यासाठीं त्याला माल विकून पैसे येण्याचे आधींच खर्च करावा लागे, यामुळें कारखानदारीचा हा पसारा मांडणें फारच थोड्या भांडवलदार धनिकांना शक्य झालें. यंत्राच्या मालापुढें हस्तव्यवसाय नष्ट होऊन बेकार होणारांची संख्या या कारखानदारांना लागणाऱ्या मजुरसंख्येच्या मानानें नेहमींच अधिक असे; यामुळें कारखान-दाराच्या दारीं रोजगारीसाठीं येणारे मजूर आपसांत चढाओढ करून मजुरीचे दर इतके कमी करून घेत, कीं बैल, घोडा, गाढव वगैरे जनावरांना कष्ट करण्यासाठीं जरूर तेवढेंच खाऊं घालतात व कष्ट करणाऱ्या या जनावरांचा वंश कायम राहावा एवढीच तजवीज त्यांचा मालक करीत असतो, धनसंचयाचा प्रश्न या जनावरां-पुढें कधींच असत नाहीं, त्याप्रमाणें कारखानदाराच्या मजुराला अगदीं जगण्यापुरती व वंश टिकविण्यापुरतीच मजुरी पदरांत पडूं

लागली आणि एवढी रोजगारीही सर्वांनाच न मिळतां अनेकांना बेकारी भोगावी लागली.

रोजगारी मजुरांची अवस्था लोणाऱ्याच्या गाढवापेक्षांही एक प्रकारें अधिक वाईट होती. गाढवाला एकादे दिवशीं काम देतां आलें नाहीं तरी लोणाऱ्याला दुसरे दिवशींच्या कामासाठीं गाढव हवें असल्यानें त्याच्या पोटाची काळजी वाहावी लागे व त्यासाठीं एखादें कुरण अथवा उकिरडा स्वखर्चानें त्याला द्यावा लागे. पण भांडवलदारावर अशी कांहींच सक्ति नसे. बेकार मजूर हवे तेवढे असल्यानें मजूर नको झाल्यास त्यास हाकून लावावें व गरज वाटली म्हणजे बेकारांच्या बाजारांतले हवे तेवढे मजूर आणावे हें त्याला शक्य होई. मजुराच्या श्रमापासून जास्तींत जास्त नफा मिळविणें एवढीच भांडवलदाराची दृष्टि असल्यानें भांडवलशाहीच्या आरंभीच्या पन्नासपाऊणशें वर्षांच्या काळांत पुरुषच नव्हे तर स्त्रिया व मुलें यांनाही पंधरा पंधरा तास राबवून भांडवलशाहीचें मूलस्थान जें इंग्लंड तेथील भांडवलवाल्यांनीं शेंकडों, हजारों, लाखों कुटुंबेंच्या कुटुंबें नफा पिळून घेऊन चिपाडें करून टाकलीं.

## मजुरी वाढली, म्हणून यंत्रें वाढलीं, म्हणून बेकारी वाढली

पुढें कामगार-संघ होऊन मजुरांमजुरांतली चढाओढ थोडथोडी कमी होऊं लागली. सरकारनें कायदे करून मजुरांची राहणी चांगली करण्याबद्दल आणि कामाचे तास कमी करण्याबद्दल कार-खानदारांवर बंधनें घातलीं. यामुळें इंग्लंडच्या मजुरांची राहणी सुधारली खरी, पण त्याचे इतर परिणाम असे झाले कीं, मजुरांची बेकारी त्यामुळें कमी होण्याऐवजीं बेकारीचा रोग भयंकर सांथी-प्रमाणें जगभर पसरूं लागला. कारण मजुरांचे पगार वाढले व

त्यांची राहणी सुधारावी लागली; यामुळें कारखानदारांचा धनोत्पादन-खर्च वाढला. तेव्हां मजुरांना द्याव्या लागणाऱ्या मजुरीपेक्षां कमी खर्चांत मजुरांचीं कामें अधिक सुबकपणें व कमी वेळांत करणारीं यंत्रें भांडवलदारांनीं काढलीं. यामुळें एकीकडे स्वस्त आणि सुबक माल खूप निघूं लागला खरा, पण त्याबरोबरच मजुरांची मजुरी व रोजगारी कमी झाली, भांडवलशाही देशांतले हस्तव्यवसाय अधिकाधिक प्रमाणांत ठार झाले व दिवसानुदिवस अधिकाधिक जनता मजूरवर्गांत सामील होऊं लागली. ज्या मानानें मालाची निपज वाढली त्या मानानें देशांत रोजगारी न वाढल्यामुळें उत्पन्न झालेल्या मालास पुरेसें गिऱ्हाइक कधींच मिळालें नाहीं. आणि मालाची गरज आहे पण रोजगारी पुरेशी अथवा मुळींच नसल्यामुळें माल खरेदी करण्याची शक्ति नाहीं म्हणून शेंकडों माणसें ददातीचें दुःख :भोगीत असतां त्यांच्या डोळ्यांदेखत भांडवलशाही देशांतला माल परदेशांत बाजार शोधण्यासाठीं जाऊं लागला. क्रमाक्रमानें भांडवलशाही इंग्लंडखेरीज इतर परदेशांतही निर्माण झाली. या देशांच्या मालाशीं चढाओढ करणें आतां इंग्लंडला प्राप्त झालें. मालविक्रीच्या म्हणजे माल स्वस्त करण्याच्या या आंतरराष्ट्रीय चढाओढींत सर्वच देशांत यंत्रांत सुधारणा होऊन मजुरांपेक्षां त्यांना कमी खर्च येत असल्यामुळें मजुरांना यंत्राशीं चढाओढ करावी लागून मजुरांची मजुरी व रोजगारी घटली व बेकारी वाढली.

## जगावर साम्राज्यशाहीचें संकट

मजुरांचा असंतोष व राष्ट्राराष्ट्रांतील व्यापारी स्पर्धा यांचा सर्व राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकीय संघटनेवर फार वाईट परिणाम झाला. भांडवलदारांनीं पैशाचे जोरावर स्वदेशांतील राज्यसंस्थांवर आपलें प्रभुत्व

स्थापून मजूरचळवळीचें राजकीय स्वातंत्र्य संपुष्टांत आणलें. यांत्रिक कारखानदारीच्या उत्पादनास कच्च्या मालाची खरेदी करण्यासाठीं परदेश धुंडाळावे लागतात व पक्क्या मालाच्या विक्रीसाठीं विदेशी बाजार पाहावे लागतात आणि यासाठीं आंतरराष्ट्रीय चढाओढ चालते. राष्ट्राराष्ट्रांतील या आर्थिक चढाओढींत भांडवलवाल्यांच्या लगामीं असलेलीं त्या त्या देशांतील सरकारें सामील झालीं आणि कच्च्या व पक्क्या मालाचे बाजार काबीज करण्यासाठीं आर्थिक उत्पादनाचे बाबतींत मागें पडलेले देश भांडवलवाल्या राष्ट्रांनीं प्रतंत्र केले. मागासलेल्या या राष्ट्रांवर आलेल्या पारतंत्र्यामुळें त्यांचें आर्थिक व राजकीय जीवनही संपुष्टांत आलें. भांडलवशाही राष्ट्रांतील यंत्रोत्पन्न मालापुढें मागासलेल्या राष्ट्रांतील हस्तव्यवसायोत्पन्न माल पराभूत होऊन त्या राष्ट्रांचे हस्तव्यवसाय ठार झाले, आणि परदेशी माल देशांत घुसून देशांतील संपत्ति धुऊन नेऊं लागला. विदेशी डोईजड खर्चाच्या राज्यपद्धतीनेंही देशाची लूट चालविली. यंत्रोत्पन्न मालाशीं चढाओढींत हस्तव्यवसाय बुडून बेकारी वाढली व आर्थिक स्वातंत्र्य नष्ट झालें. त्याचप्रमाणें परकी राज्यसत्तेची ऊर्फ साम्राज्यशाहीची अवजड शिळा डोईवर बसून राजकीय विकासही खुंटला.

या जिंकून पराभूत व दु:खग्रस्त केलेल्या राष्ट्रांपायीं राज्यकर्त्या भांडवलशाही राष्ट्रांवरही एक नवेंच संकट आलें. मागसलेल्या अंकित राष्ट्रांतून येणाऱ्या संपत्तीचा ओघ भांडवलशाही राष्ट्रांत वाहत असल्यानें या राज्यकर्त्या भांडवलशाही राष्ट्रांतील जनतेचें—मजुरांचेंही—जीवन श्रीमंतीचें झालें खरें; पण त्यामुळेंच कारखानदारांचा खर्च तेथें वाढूं लागला. उलट मागासलेल्या राष्ट्रांतील मजूर दरिद्री, त्यांच्यांत बेकारीही पुष्कळ यामुळें त्यांना मजुरी कमी द्यावी लागून कच्चा माल तेथेंच उत्पन्न होणार व पक्का माल तेथेंच खपवावा

लागणार हें भांडवलवाल्यांना जेव्हां दिसूं लागलें तेव्हां त्यांनीं स्वदेशांत कारखाने उभारण्याचा नाद सोडून मागासलेल्या राष्ट्रांतच कारखाने उभारण्याची सुरुवात केली. यामुळें भांडवलशाही राष्ट्रांतल्या मजुरांची बेकारी वाढूं लागली. तसेंच मागासलेल्या राष्ट्रांतील लोकसंख्याही झपाट्यानें वाढत गेली व रोजगारीचें प्रमाण तितकें वाढलें नाहीं. यामुळें मागासलेल्या देशांतही बेकारी वाढली.

## या अनर्थाचें कारण

या जागतिक अनर्थाचें कारण वर दिलेल्या हकीकतींतच सूक्ष्मपणें पाहणारास दिसून येईल. हल्लींच्या जगभर पसरलेल्या समाजव्यवस्थेस सामान्यतः भांडवलशाही असें नांव आहे. याचें कारण असें कीं, जमीन, कारखाने, खाणी, आगगाड्या, आगबोटी वगैरे धनोत्पादनाचीं जीं प्रचंड साधनें तीं जगांतील फक्त मूठभर धनिकांच्या हातीं आहेत. या प्रचंड साधनांनीं निर्माण होऊन बाजारांत स्वस्त विकल्या जाणाऱ्या मालाशीं लहान साधनांनीं माल उत्पन्न करणारा हस्तव्यसायी जगूंच शकत नाहीं. त्याचा धंदा बुडतो, तो कफल्लक होतो व धनिक भांडवलदाराच्या दारीं त्यास रोजगारी मागण्यास जावें लागतें. यामुळें जगांतील बहुसंख्य समाजाच्या आर्थिक नाड्या भांडवलदारवर्गाच्या हातीं आल्या असून आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक वगैरे सर्वच दृष्टींनीं भांडवलदारवर्ग हा जगाचा स्वामी झाला आहे व साहजिकच या समाजव्यवस्थेस भांडवलशाही असें नांव मिळालें आहे.

जमीन, कारखाने, खाणी, दळणवळणाचीं साधनें वगैरे म्हणजे जगांतलें सर्व भांडवल बव्हंशीं खाजगी मालकांच्या स्वाधीन व वहिवाटीस राहूं देणें हें या समाजव्यवस्थेचें वैशिष्ट्य होय. पण या

तिच्या वैशिष्ट्यामुळेंच एकंदर मानवजातीवर आज संकट ओढवलें आहे. कसें तें पहा. 'धन' या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या सर्व वस्तूंचें 'भोग्यधन' व 'उत्पादक धन' असे दोन भाग करतां येतील. डाळ-तांदूळ, पुस्तकें, कपडे, सिनेमा वगैरे हें 'भोग्यधन' होय; कारण माणसाच्या भोगकार्याकडे त्याचा प्रत्यक्ष विनियोग होत असतो. पण शेतकरी पुढील सालीं पेरण्यासाठीं जें बीं-बियाणें बाजूस काढून ठेवतो तें, तसेंच त्याचे नांगर, बैल वगैरे, छापखान्याच्या मालकाचा छापखाना व इतर साहित्य, गिरणीवाल्यांचीं यंत्रें वगैरे हें सर्व धन माणसाच्या प्रत्यक्ष उपभोगांत येत नसून पुढील उत्पादनाचें तें साधन असतें. आगगाड्या वगैरे कांहीं प्रकारचें धन त्याचा जसा उपयोग करावा तदनुसार उभय प्रकारचेंही असूं शकेल. पण एकंदरीनें धनाचे वरीलप्रमाणें स्थूलतः दोन प्रकार कल्पिण्यास त्यामुळें मुळींच बाध येत नाहीं. यांपैकीं भोग्यधन हें नेहमीं भोगलें जाऊन संपत जाणार व उत्पादक धनाच्या साहाय्यानें नवें नवें भोग्यधन पुनःपुन्हा जन्मास येणार. उत्पादक धनही झिजून, खपून संपेल व नवीन निर्माण होत राहीलच. हें कार्य चालू असतां 'उत्पादक धन' म्हणजे 'उत्पादन-साधनें' यांची सुधारणा होऊं लागली म्हणजे त्यांचे साह्यानें दोन्ही प्रकारचें धन अधिक निर्माण करणें माणसास शक्य होतें. यालाच 'माणसाचें उत्पादन-सामर्थ्य वाढलें' असें म्हणतात. यामुळें मानवजातीस उपभोगासाठीं अधिकाधिक धन मिळूं लागतें. पण मानवजातीस उपभोगून संपवितां न येईल इतकें धन निर्माण होऊं लागलें तर जरूरीपुरतें धन निर्माण करवून तितक्या प्रमाणांत माणसांच्या कामाचे तास कमी करणें शक्य व सयुक्तिकही आहे. गेल्या वर्षी माझ्या शेतांत शंभर मण धान्य पिकलें पण यंदा मीं सुधारलेलीं खतें, यंत्रें वगैरे यांचा उपयोग केल्यानें

गेल्या सालापेक्षां दुप्पट म्हणजे २०० मण धान्य पिकलें, तर गेल्या वर्षापेक्षां सामान्यतः दुप्पट माणसें मला पोसतां येतील किंवा एक वर्षभर मी शेताची मशागत बंद ठेवून काम करणाऱ्या माणसांना त्याच रोजगारावर काम न करून घेतांच ठेवीन. हा युक्तिवाद खरा आहे असें मानलें तर गेल्या पंधरा-वीस वर्षांत माणसाचें उत्पादन-सामर्थ्य जें सरसकट दुपटीनें वाढलें आहे त्यामुळें माणसाची सुबत्ता दुप्पट वाढली तरी असली पाहिजे अथवा जगांत सरसकट कामाचे तास, मजुरी कमी न होतां अथवा बेकारी न वाढतां, निमे झाले असले पाहिजेत असें अनुमान काढावें लागतें. पण वस्तुस्थिति उलट-च दिसते; ती अशी कीं, कोटयवधि लोक रोजगारधंदा नाहीं म्हणून उपाशी आहेत असें आपणांस आढळून येतें. हें असें कां व्हावें? जगांत सरसकट सर्वच माणसांचे कामाचे तास कमी व्हावे पण मजुरी अथवा रोजगारी कमी होऊं नये, हें सयुक्तिक दिसत असतांही बेकारी जगभर एखाद्या रोगाप्रमाणें पसरली आहे याचें कारण काय? भांडवलवाले म्हणतात 'आहे हा माल खपत नाहीं म्हणून कारखाने बंद ठेवावे लागतात आणि त्यामुळें बेकारी वाढते.' ठीक, पण माल तरी कां खपत नाहीं? तर 'बेकारी व कमी रोजगारी यामुळें मालखरेदी करण्याचें सामर्थ्य लोकांजवळ उरलें नाहीं, म्हणून माल खपत नाहीं म्हणजे;' 'माल खपत नाहीं म्हणून बेकारी माजते व बेकारी माजते म्हणून माल खपत नाहीं' असें परस्परविसंगत उत्तर वरील प्रश्नास द्यावें लागतें. पण याच उत्तराचा अधिक उलगडा केल्यास त्यांतील विसंगति नाहींशी होईल. एकदां जो पैसा मजुरी, पगार वगैरे रूपानें काम करणाराच्या हातीं येतो तोच पुनः 'खरेदी-शक्ती'चें रूप घेऊन मजुरांच्या, कारकुनांच्या हातून माल निर्मिणाऱ्या

मालकांच्या हातीं जातो. दरम्यान अधलेमधले लोक पुष्कळ असतील. पण माल निर्माण करणारा मजूर, कारकून वगैरे वर्ग मालाच्या मालकापासून जी मजुरी मिळवितो तीच परत त्यास देऊन माल खरेदी करतो असें स्थूलमानानें म्हणण्यास हरकत नाहीं. मालाचा मालक निर्माण झालेला सर्वच माल विकावयास काढीत नाहीं. वर वर्गीकरण केल्याप्रमाणें मालाचा जो 'उत्पादक' प्रकार असेल तो पुढील उत्पादनासाठीं राखून ठेवून भोग्यप्रकार असेल तेवढाच गिऱ्हाइकापुढें मांडील. हा 'भोग्य' माल सगळा खपेल तरच नवीन माल निर्माण करणें मालाच्या मालकास शक्य होईल. पण सगळा माल खपण्यास उपाय कोणता? त्या भोग्य मालाच्या किंमतीइतका पगार, मजुरी वगैरे जगांतील मजूर, कारकून वगैरेंना मिळेल तरच ते सर्व भोग्य माल खरेदी करूं शकतील; पण भांडवलशाही समाजव्यवस्थेंत असें घडत नाहीं.

जगांतील मजूर, कारकून, वगैरेंचे मजुरी, पगार वगैरे जे ठरतात ते त्यांना जगांत निर्माण होऊन विक्रीस आलेला भोग्य माल खरेदी करतां यावा या धोरणानें ठरत नाहींत. मजुरास, कारकुनास कमींत कमी रोजगार देऊन त्याजकडून जास्तींत जास्त माल निर्मून घ्यावा हें भांडवलदाराचें ध्येय असतें. यंत्रें वगैरे अधिकाधिक सुधारलेल्या साधनांनीं माल निर्माण करणें शक्य होऊं लागल्यानें मजुरांची गरज लोकसंख्येच्या व मजूरसंख्येच्या प्रमाणांत कमी कमी होत असते. यामुळें मजुरांमजुरांत रोजगारीसाठीं चढाओढ लागून मजुरीचे भाव उतरतात व शिवाय बेकारीही वाढते; आणि म्हणून भांडवलवाल्यांचा सर्व माल खपत नाहीं, म्हणून पुन्हा निर्माण होत नाहीं व रोजगारी आणि मजुरी कमी होऊन बेकारी अधिक वाढत जाते. भांडवलशाहीच्या कारखानदारीची प्रगतिच यामुळें खुंटू

लागते. माल उत्पन्न करण्याच्या श्रमाच्या मोबदला म्हणून जी मजुरी वाटली जाते तीच खरेदीशक्तीच्या रूपानें माल खरेदी करूं शकते हें सामान्य तत्त्व ध्यानांत ठेवल्यास आणि भांडवलदारांची पद्धति जास्तींत जास्त माल मजुराकडून करून घेऊन कमींत कमी मजुरी त्यास द्यावयाची व मजुरीच्या किंमतीहून अधिक माल जो असेल तो नफ्यांत पाडावयाचा अशी आहे हेंही ध्यानांत ठेवल्यास, भांडवल-शाहीच्या आरंभींच न खपलेल्या मालाचे ढीग सांचून वर म्हटल्या-प्रमाणें भांडवलशाहीची प्रगति खुंटावयास हवी होती; पण एका विशेष कारणामुळें तें त्या वेळीं घडलें नाहीं. तें कारण असें:-भांडवलशाहीची यांत्रिक उत्पादनपद्धति इंग्लंडांत प्रथम सुरू झाली. तेथें यंत्रें वापरून माल काढणाऱ्या या भांडवलवाल्यांच्या स्वस्त व सुबक मालाला त्याच कारखान्यांतील मजुरांहून अधिक जें गिऱ्हाईक हवें होतें तें जुन्या हस्तव्यवसायाच्या मालाचें मिळालें. जुने हस्तव्यवसाय यामुळें पराभूत होऊन नष्ट झाले आणि या प्रकारें इंग्लंडांतले जुने हस्तव्यवसायी लोक कारखानदारांचे मजूर होत गेले. साऱ्या इंग्लंडांत याप्रमाणें एका बाजूस भांडवलदार व दुसऱ्या बाजूस मजूर अशी सामान्यतः वाटणी झाल्यावर तेथील मजुरांना खरेदी करतां न आलेला ब्रिटिश भांडवलदारांचा माल हिंदुस्थान, चीन, यांसारख्या मागसलेल्या देशांत येऊन व तेथील हस्तव्यवसायांचें गिऱ्हाईक आपणाकडे ओढून त्या हस्तव्यवसायांस ठार करता झाला. हे हस्तव्यवसायी कारागीर त्या त्या देशांत नवीन नवीन उत्पन्न होणाऱ्या भांडवलदारांचे मजूर बनले. याच क्रमानें जगांत इतर पुढार-लेल्या देशांत व मागसलेल्या देशांतही भांडवशाही माजली असून जवळ जवळ एका बाजूस धनोत्पादनसाधनांचे मालक ऊर्फ भांड-वलदार व दुसऱ्या बाजूस या भांडवलदारांचे रोजगारी अथवा बेकार

मजूर अशी जगाची वाटणी झाली आहे. पूर्वीं भांडवलदारीच्या बाहेरचें म्हणजे हस्तव्यवसायाचें नवें नवें गिऱ्हाईक भांडवलदारास मिळत होतें. पण आतां सर्व जगच भांडवलदारीचें झाल्यानें हस्त-व्यवसायाचें नवें नवें गिऱ्हाईक भांडवलशाहीस मिळणें अधिकाधिक अशक्य होत आहे. सगळेच हस्तव्यवसाय जगभर नष्ट झाले व सर्व हस्तव्यवसायी पूर्णपणें मजूर झाले म्हणजे भांडवलदारांस त्यांचे मजूर-कारकून यांच्या बाहेरचें नवें गिऱ्हाईक मिळणेंच बंद होईल. अथवा गांधीजींसारख्या एखाद्या हट्टी माणसानें जुने हस्तव्यवसाय चालूच ठेवण्याचें ठरविल्यास त्यांचें गिऱ्हाईक भांडवलदाराकडे येणारच नाहीं. एतावता भांडवलदाराचा माल न खपतां पडून राहण्याची प्रथा वाढत वाढत अखेर भांडवलशाही–कारखानदारीस कुलूप पडणें क्रमप्राप्तच आहे. असें कुलूप पडून भांडवलशाही पूर्णविराम पावण्यापूर्वीं अंतःस्पर्धा व अंतःकलह यापायीं जगाचा ऱ्हास व विध्वंस किती होणार आहे हें कुणास कळे.

## नफेबाजी बंद करणें हाच उपाय

जगांतील धनोत्पादनाचीं साधनें जीं भांडवलवाल्यांच्या हातीं आहेत त्यांवरील त्यांची खाजगी मालकी नष्ट करून हीं धनोत्पादन-साधनें एकंदर समाजानें आपल्या हातीं घ्यावीं व त्यांचा सामुदायिक हितासाठीं वापर करावा असें सोशॅलिस्टांचें म्हणणें आहे. खाजगी भांडवलदार मजुरांना उत्पन्न झालेल्या मालाच्या किमतीहून कमी मजुरी देऊन मजुरी वजा जातां राहणारा ‘नफा’ मिळविण्यासाठीं उत्पादनकार्य चालवीत असतो. आणि यामुळेंच वर सांगितल्याप्रमाणें अनर्थ उद्भवतो; पण ‘नफ्याचें धोरण न ठेवतां मजुरांना अधिक मजुरी दे’ म्हटलें तर भांडवलदार-कारखानदार कारखानेच

चालविणार नाहींत व जगाचें उत्पादनकार्यच बंद पडेल. यासाठीं समाजानें म्हणजे समाजाचें प्रतिनिधि अशा सामुदायिक सरकारनें आगगाड्या, कारखाने, बँका, शेती वगैरे सर्व धनोत्पादनसाधनें स्वतांच्या हातीं घेऊन एकंदर समाजास उपभोग्य धन एकसारखें मिळत राहील अशा प्रकारें समाजांत मजुरी, पगार वगैरेंची वाटणी करावी व त्याच धोरणानें उत्पादन चालू ठेवावें असें सोशॅलिस्टांचें म्हणणें आहे. याचेंच खाजगी मालकी नष्ट करणें, भांडवलशाही नष्ट करणें वगैरे अनेक प्रकारें वर्णन करण्यांत येतें.

---

## काटकसरीनें अनर्थ टळेल ? :

### गरीबांचा खर्चिकपणा

गरीब लोक हे उधळपट्टीनें खर्च करून त्यामुळें गरीबी स्वतांवर ओढवून घेतात असें कांहीं लोकांचें म्हणणें असतें. त्यांच्या मतें गरीब लोक आपल्याजवळ खर्च करण्याची ऐपत किती आहे हें पाहून खर्च करीत राहतील तर त्यांना गरीबी येण्याचें अथवा बाटण्याचें कारण नाहीं. उलट केवढाही मोठा धनिक असला व त्यानें आपली संपत्ति उधळून टाकावयाचें ठरविलें तर त्यावर क्षणार्धांत गरीबी कोसळल्यावांचून राहणार नाहीं. ऐपत नसतां गरीब लोक लग्न-कार्यासाठीं, मर्तिकासाठीं, मुलाबाळांच्या हौसेसाठीं इतका खर्च करतात कीं, एकेका प्रसंगानें त्यांची आयुष्याची मिळकत खलास होते. नाटकसिनेमाचीं थिएटरें गरीबांनीं भरलेलीं असतात. मोठमोठीं

क्षेत्रें, देवस्थानें हीं पुष्कळ अंशीं गरीबांच्याकडून होणाऱ्या खर्चांतूनच चालतात. आगगाड्या, मोटारी, यांची मिळकत सर्व गरीबांच्या जिवावर असते. अविचारानें वागून गरीब लोक स्वतःवर दुखणीं ओढवून घेतात व त्यामुळें डॉक्टर लोकांची चंगळ होते. दारूचें व इतर व्यसन-वस्तूंचे गुत्ते हे सर्व गरीब लोकांवरच पोसले जातात. गरीब लोक हा सर्व खर्च कमी करतील तर त्यांना गरीबी येण्याचें कारण नाहीं व मधून मधून येणाऱ्या बेकारीचें दुःख सुसह होईल, असें आक्षेपकांचें म्हणणें.

## व्यक्तीच्या खर्चानें समाज पोसतो

गरीबांवर हा आक्षेप घेणाऱ्यांमध्यें पुष्कळशीं समंजस म्हणविणारीं माणसेंही असतात. पण हा आक्षेप घेण्यानें त्यांचा असमंजसपणा मात्र जाहीर होतो. व्यसनें अथवा दुर्गुण यांवर होणाऱ्या खर्चाचें कोणीच समर्थन करीत नाहीं. पण लग्नकार्यासारख्या आनंदोत्सवास व्यसन अथवा दुर्गुण कसें म्हणावें? शिवाय त्यानें समाजास गरीबी तरी कां यावी? एका व्यक्तीजवळ १०० रुपये आहेत व ते त्या व्यक्तीनें लग्नकार्यांत 'उधळून' टाकले तर ती व्यक्ति गरीब झाली हें उघडच दिसतें. पण सामाजिक दृष्टीनें हेंच दृश्य अगदीं उलटें दिसूं लागतें. लग्नकार्यांत १०० रुपये खर्च केले याचा अर्थ काय? वाण्याकडचें धान्य, तूप, गूळ, कापडवाल्याचें कापड, वाजंत्र्याचा धंदा, मांडववाल्याचें कार्य, दारू-दुकानची दारू, भटजीची वेदविद्या, सोनाराचे दागिने वगैरे सर्वांना या व्यक्तीच्या १०० रुपये खर्चण्यानें गिऱ्हाइकी मिळाली; म्हणजे त्यांना रोजगारीच मिळाली असें नव्हे का? समजा, ही मूळ व्यक्ति शेतकरी आहे. तर ज्या या अनेक धंदेवाल्यांना

या शेतकऱ्याच्या खर्चानें रोजगारी मिळाली ते सर्व असेच लग्नांत खर्चूं लागले म्हणजे त्यांच्या पैशानें शेतकऱ्याला त्याच्या मालाला गिऱ्हाईक मिळालें असें होणार नाहीं काय? याच प्रकारें समाजांतील प्रत्येक व्यक्ति मिळेल तें खर्च करूं लागेल तर एकंदर समाजांत सर्वांनाच गिऱ्हाईक मिळेल म्हणजे सर्वांचीच रोजगारी वाढेल. उलट समाजानें म्हणजे समाजांत जे बहुसंख्य असतात त्या गरिबांनीं काटकसर करून पैसा जमिनींत पुरून ठेवण्याचें ठरविल्यास समाजांतील मालास व चाकरीस गिऱ्हाईक नाहींसें होऊन रोजगारी कमी होईल.

## अहो, बँकेंत पैसा ठेवा !

गरीबांनीं शिल्लक पैसा जमिनींत पुरून न ठेवतां तो बँकेंत ठेवावा म्हणजे त्यांना घरबसल्या व्याज मिळत राहून भांडवलदारास कारखाने वाढवितां येतील असेंही कांहीं लोकांस वाटतें. सुशिक्षित मध्यमवर्गाला, विशेषतः त्यांतील स्त्रियांना, बँकेंत पैसा ठेवून व्याज मिळविणें हा मोठा पराक्रम व भूषण असें वाटत असतें. नवऱ्यानें प्रोफेसर व बायकोनें मास्तरीण होऊन अहर्निश खपावें व रोज नवी कमाई करावी, समाजांत उच्च दर्जा मिळेल अशा प्रकारें नीटनेटकेपणें व नखरेलपणें राहावें, खर्च मात्र काटकसरीनें करावा, तुपांत काटकसर करून, तोंड निस्तेज झालें तर त्यावर कमी किमतीचा जपानी स्नो लावावा, सोन्याच्या दागिन्यांऐवजीं फुलांचे आणि कचकड्यांचे अलंकार घालावे, पाहुण्यांना खाणावळ दाखवावी, मुलें करूं नयेत, अगदीं 'दोघेंचि दोघें' राहावें, बँकेंतला पैसा व्याजाचें पुनःपुन्हा मुद्दल करीत राहून साचूं द्यावा व नव्या मिळकतींत काटकसर करून बँकेंत नवी नवी भर घालावी हा श्रीमंतीचा व

सुबत्तेचा राजमार्ग असतो असें पुष्कळ मध्यमवर्गीयांचें म्हणणें असतें. या वर्गांतील स्त्रिया पति घराबाहेर फार खर्च करील म्हणून अतिशय दक्ष असतात आणि तो बाहेर हिंडाफिरायला गेला तरी त्याचा पिच्छा सोडीत नाहींत. बँकेंतले हिशेब नवराबायकोच्या जोडसहीनें ठेवीत असतात आणि आपला बँक-अकाउंट गुप्त ठेवून शेजारणीचा किती वाढला, तो आपल्यापेक्षां जास्त आहे कीं कमी आहे, याची गुप्त बातमी काढीत असतात.

## चोराच्या मनोवृत्तीशीं साम्य

पण या वर्गाचा हा असमंजसपणा कमालीचाच आहे. ही कदाचित् अतिशय प्रामाणिक पण परिणामाच्या दृष्टीचें चोरासारखी मनोवृत्ति आहे. सगळ्या गांवांतले लोक दारें, खिडक्या, कपाटें, तिजोऱ्या उघड्या ठेवून निजतील तर आपण मुकाट्यानें सगळीकडे लुटालूट करून श्रीमंत होऊं व आपल्या घराचीं दारें, खिडक्या, कपाटें, तिजोऱ्या मात्र पक्क्या बंद करून ठेवूं असें १०-५ चोरांनीं म्हणण्यासारखें मध्यम वर्गांतल्या काटकसरवाल्यांचें हें म्हणणें असतें. खरोखर या दहा-पांच चोरांच्या इच्छेप्रमाणें गांवांतल्या लोकांनीं करायचें ठरविलें तर चोरांची ही योजना फलद्रूप झाल्यावांचून राहणार नाहीं. पण अचानक श्रीमंत होण्याचा चोरांचा हा मार्ग बाकीच्या गांवाच्या लक्षांत येण्यास फार काळ लागणार नाहीं. आणि मग गांवांतले सगळेच लोक एक दिवस आपल्या घराचीं कड्या-कुलपें व्यवस्थित करून इतरांच्या घरावर छापा घालण्यासाठीं रात्रीं टपून राहिले म्हणजे सारा गांव त्या दिवशीं जागा राहील, टपून बसेल, पण कोणासच चोरी करून एका रात्रींत श्रीमंत होण्याचे कामीं यश येणार नाहीं. बँकेंत पैसा ठेवून श्रीमंत होऊं इच्छिणाऱ्यांची गत हीच होणार.

### व्याज कोठून येतें ?

बँकेंत ठेवलेल्या पैशास व्याज येतें तें बागेंत झाडांना फळें येतात तसें अथवा कोंबडी अंडीं घालतें व त्यांतून पिलें बाहेर येतात तसें येत नाहीं. जमिनींत झाडाचें बीं पेरतात तसा बँकेंत पैसा पेरला जात नाहीं; अथवा कोंबडी अंड्यांवर बसून तीं उबवते व मग त्यांतून पिलें बाहेर येतात त्याप्रमाणें बँकेंतले लहान-मोठे कारकून पैशावर बसून व तो उबवून त्यापासून व्याज निर्माण करतात असें नाहीं. बँकेंत ठेव म्हणून, कर्ज म्हणून, भाग म्हणून आलेला सर्व पैसा हा धनोत्पादक वर्गांना कर्ज म्हणून देण्यांत येतो; त्याच्या साह्यानें श्रम करणारीं माणसें एकत्र आणून धन उत्पन्न केलें जातें आणि या धनांतून कर्जाची व्याजासुद्धां फेड करण्यांत आली म्हणजे बँकवाले आपला बँक चालविण्याचा खर्च, नफा वगैरे बाजूस ठेवून ठेवीदारांचें व्याज-मुद्दल वगैरे परत करतात. म्हणजे एका माणसानें बँकेंत पैसे ठेव म्हणून ठेविले तर दुसरा कोणी तरी ते कर्ज म्हणून घेऊन दहा माणसांना त्यांतून रोजगारी देतो, त्यांना श्रम करायला लावतो व त्यापासून उत्पन्न होणाऱ्या धनांतून मूळ ठेवीदारास व्याज व मुद्दल परत मिळतें. जो इसम धनोत्पादन करण्यासाठीं बँकेकडून कर्ज काढतो त्यालाहि उत्पन्न झालेला माल खपेल तरच बँकेच्या कर्जाची फेड करतां येईल आणि हा माल खपायचा म्हटलें तर लोकांनीं तो खरेदी केला पाहिजे. सारांश, समाजानें काटकसरीनें वागण्याऐवजीं खर्च करीत राहिलें तरच समाजांत धनास मागणी राहील आणि अंग मोडून माणसांनीं काम केलें तरच धन उत्पन्न होऊं शकेल. प्रत्येक माणसानें काटकसर केली व प्रत्येकानें आपण श्रम न करतां बँकेंत ठेवलेल्या पैशानें व्याज देत राहावें असें म्हटलें तर ती गोष्ट व्यवहारांत अशक्य आहे.

# धनिकांच्या धनाचा अपव्यय, अ-भोग व अ-व्यय : ६

## धनिकांचा खर्च

पण पैसा खर्च करण्यानेंच समाजांत धनोत्पादन होतें व त्या धनाची वाटणीही होऊं शकते हें मान्य केलें म्हणजे धनिक वर्गाजवळ जो पुष्कळ पैसा असतो व जो ते भरपूर खर्चहि करतात त्यामुळें समाजांत धनोत्पादन व धनाची वांटणीहि होत असेलच ना, असा एक प्रश्न उद्भवतो. श्रीमंत लोक खर्च खूप करतात हें खरेंच आहे. मोठमोठे वाडे, हवेल्या, चाळी ते बांधतात. यामुळें इमारत-धंदा वाढून इमारत-कामगारांना काम मिळतें. याचप्रमाणें कपडे, खेळ ऐषआराम, व्यसनें वगैरे धनिकांचे जे शेंकडों खर्च-प्रकार आहेत त्यामुळें समाजांत त्या त्या उत्पादक अथवा सेवकवर्गास रोजगारी मिळते हें खरें आहे.

## धनाचा अपव्यय

पण खर्चाच्या नांवानें होणारा हा व्यय पुष्कळदां अपव्यय असतो. धनिकांचा खर्च कसा होत असतो? अन्न-वस्त्र, घरदार, शिक्षण, औषधपाणी वगैरेसाठीं धनिक वर्गाचा खर्च होतोच व तो रास्तच आहे. पण नंतर धनोत्पादन व ऐषआराम या दोन कार्यांत जो खर्च होतो त्यांत अपव्यय पुष्कळ होतो. एखाद्या गांवांत नवीन वसाहत होऊं लागल्यानें घरभाड्याचें उत्पन्न वाढलें तर धनिकवर्ग चाळी बांधूं लागतात. चढाओढींत चाळींची संख्या वाढूं लागते; पण त्यांत राहूं शकणाऱ्या कित्येक गरीब लोकांजवळ नव्या चाळींचें

भाडें देण्याची ऐपत नसल्यानें कबुतराच्या खुराड्यासारख्या जुन्या घरांतून गरीब लोकांची गर्दी उसळलेली असते आणि नव्या बांधलेल्या चाळी ओस पडून राहतात. याऐवजीं धनिकवर्गानें चाळी बांधण्यांत जितका पैसा खर्च केला तितका त्यांजवळ नसता, निम्माच असता तर तेवढ्याच्याच चाळी बांधल्या गेल्या असत्या आणि बाकीचा निम्मा पैसा गरीबांना त्यांच्या धनोत्पादक श्रमाचा मोबदला म्हणून मिळाला असता तर त्या चाळींचें भाडें देणें त्यांना परवडून चाळी ओस पडण्याचें टळलें असतें.

## परतंत्र राष्ट्रांतील धनिकांचा खर्च

विशेषतः आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या अथवा राजकीय दृष्ट्या परतंत्र अशा देशांच्या दृष्टीनें श्रीमंतांकडून होणारा धनाचा अपव्यय फार महत्त्वाचा आहे. धनाचा व्यय करतांना राष्ट्रीय दृष्टि ठेवणें म्हणजे माल खरेदी करतांना त्या मालाची मजुरी स्वदेशांतल्याच मजुराला मिळावी अशा प्रकारें तो खरेदी करणें हें होय. याकरितां महाग पडला अथवा उणाख असला तरी स्वदेशीच माल घेणें युक्त असतें. तसेंच पैसा गुंतविणें, विमा उतरणें वगैरे बाबींत सुद्धां राष्ट्रीय धंद्यांना उत्तेजन देण्याची जरूरी असते. पण धनिकवर्ग ही दृष्टि सहसा घेत नाहीं. सुबक व स्वस्त माल हवा म्हणून तो परदेशीच खरेदी करील आणि नफा अधिक मिळावा म्हणून परदेशींच भांडवल गुंतवील. हिंदुस्तानांतले फार धनिक असे वर्ग—विशेषतः संस्थानिक विलायतेंत जो पैसा ऐषआरामांत, जुवेबाजींत, मालखरेदींत, खुशामतींत व धंद्यांत उधळतात तो हिंदुस्तानांतच ते खर्च करतील तर एकदम हिंदुस्तानच्या आर्थिक उन्नतीस ठळकपणें भरती येईल, इतका तो पैसा पुष्कळ असतो.

## भोगावांचून सडणारा माल

श्रीमंतांचे ऐषआराम, खेळ, षोक, व्यसनें वगैरेंची हीच तऱ्हा आहे. गाद्या, गिरद्या, खुर्च्या, पलंग, मोटारी, दिवाणखाने, क्रीडांगणें वगैरेंवर श्रीमंतांचा पैसा इतका खर्च होतो कीं, सगळ्या गाद्या-गिरद्यांचा झोपण्याकडे योग्य तितका वापर झालाच पाहिजे, खुर्च्या, टेबलें, पलंग नित्य वापरांत आलींच पाहिजेत, मोटारींनीं रोज योग्य इतका प्रवास केलाच पाहिजे, क्रीडांगणें खेळण्याच्या वापरांत राहिलींच पाहिजेत असें ठरविलें तर जगांतील श्रीमंतांना हे उपभोग घेण्यासाठीं आपल्या संख्येच्या शंभर-दोनशेंपट माणसें भाड्यानें आणावीं लागतील. पण तशीं तीं आणलीं जात नाहींत. मोटारी धुऊन-पुसून साफ ठेवणें, बागांची मशागत व सफाई चालू राहणें, दिवाणखान्यांची झाडलोट होणें, आणि गाद्यागिरद्यांची टापटीप राखणें एवढाच या पदार्थांचा नेहमींचा वापर असून, मोगल राजांच्या जनान-खान्यांतल्या असंख्य स्त्रिया आपल्या पतिराजांच्या पहिल्या भेटीचा योग येण्यासाठीं ज्याप्रमाणें जन्मभर वाट पाहून पाहून बेदादपणें मरून जात त्याप्रमाणें, धनिकांच्या या सर्व वस्तु मालकांची धूळभेट व्हावी म्हणून वर्षानुवर्षे वाट पाहून कंटाळत व जीर्ण होत असतात. आणि इकडे असंख्य गरीबांना या चैनीच्या वस्तु तर राहोतच, पण आवश्यक वस्तूंचीही ददात असते. कारण त्यांचेजवळ या आवश्यक वस्तु खरेदी करण्यासाठीं पुरेशी खरेदीशक्तिच नसते. आतां धनिक वर्गा-जवळ न उपभोगतां येण्याइतके ऐषआराम खरेदी करण्याइतका जो पैसा राहिला तो त्यांजजवळ न राहतां गरीब वर्गांना मजुरीच्या रूपानें अधिक पैसा मिळाला असता तर श्रीमंतांच्या ऐषआरामाच्या वस्तु मोगलांच्या राण्यांप्रमाणें वायां गेल्या नसत्या आणि गरीबांना आवश्यक वस्तु खरेदी करतां येऊन त्यांना सुखी होतां आलें असतें.

पण हल्लींच्या परिस्थितींत धनिकांना उपभोगणें अशक्य इतक्या ऐष-आरामाच्या वस्तु निर्माण होऊन वायां जात असतात, आणि गरीबांना आवश्यक वस्तुही खरेदी करण्याची शक्ति नसते. ते उपाशी राहत असतांही आवश्यक वस्तूंच्या राशीच्या राशी वायां जातात. शहारांतून शेंकडों एकर जागा केवळ धनिकांच्या नांवावर ओस पडून राहते; मोठमोठे बंगले, हवेल्या, त्यांतील गृह्यवस्तु यांना मालकाची भेटही होत नाहीं; धनिकांचें हें सर्व धन अभुक्तच राहतें. आणि गरीबांना राहण्यास घरेंच नसतात, त्यांच्या मुलांना सार्वजनिक रस्त्यावर खेळावें लागतें, फूटपाथवर निजावें लागतें आणि गरीबांच्या शाळांना, दवाखान्यांना शहरांत जागाही मिळत नाहीं.

## धनाचा अ-व्यय

श्रीमंतांच्या धनाचा अपव्यय व अ-भोग कसा होत असतो हें सांगितलें. पण याहीपेक्षां महत्त्वाची गोष्ट अशी आहे कीं, श्रीमंतांकडून त्यांच्या धनाचा अ-व्यय होतो; ऐपतीच्या प्रमाणांत व्हावा तसा खर्चच होत नाहीं. गरीबांचे डोळे दिपून जावे एवढा श्रीमंतांचा ऐषआरामाचा खर्च जगभर चालू असतां, वरील विधान थोडेंसें चमत्कारिक वाटण्याचा संभव आहे. पण तें अतिशय खरें आहे. जगभर व प्रत्येक देशांत धनिकवर्गाजवळ इतकें अफाट धन सांचलेलें आहे कीं, त्याचा उपभोग घेण्याच्या त्यांच्या सामर्थ्याहून तें फारच फार अधिक आहे. माणसाची उपभोगशक्ति कितीही वाढली तरी तिला मर्यादा असते; पण एकदां ज्याला पैसा मिळूं लागला त्याला भांडवलशाहींत तो किती मिळावा याला कांहींही मर्यादा नाहीं. यामुळें भोगशक्तीचें प्रमाण श्रीमंतीच्या वाढीच्या वेगाशीं टिकूं शकत नाहीं. एका माणसास रोज अच्छेरपासून शेर अन्न लागतें

असें मानलें व त्यास पन्नास रुपये पगार आहे असें गृहीत धरलें तर ज्या माणसास ५०० रुपये पगार आहे तो मनुष्य पहिल्या माणसाच्या १० पट खाऊं शकेल हें अशक्य आहे. त्याचा परिवारही पहिल्या माणसाच्या दहापट होईलच अथवा होतोच असें नाहीं. तो आपले ऐषआराम, मुलांचीं शिक्षणें वगैरेबाबत बऱ्याच अधिक प्रमाणांत खर्च करून व्यय वाढवील; पण इतकें सर्व करून-ही त्याजजवळ अफाट पैसा उरतो. ५०० रुपयेवाल्याची ही कथा, तर हजार, दहा हजार, लाख मिळविणाऱ्यांचा पैसा न भोगला जातां किती तरी पडून राहणारच. हा पैसा उपभोग्य वस्तूंच्या खरेदींत खर्च होऊं शकत नाहीं. कारण त्याच्या मालकाच्या भोगशक्तीच्या तो बाहेरचा असतो. हा पैसा पेवांत अथवा तिजोरींत पडून राहत नाहीं हें खरें, तो बँकेंत जातो व तेथून एखाद्या कारखान्यांत भांडवल म्हणूनही जात असेल. पण बाजारांत माल खपत नाहीं म्हणून ते तुंबून राहिले आहेत आणि माल खरेदी करण्याचें सामर्थ्य नाहीं म्हणून लक्षावधि माणसें थंडीवाऱ्यांत व उन्हापावसांत उपाशी मरत आहेत अशा आजच्या काळीं भांडवलांत पैशाची आणखी आणखी भर पडण्याचा उपयोग कांहींच नाहीं. उलट त्यापासून अपायही होतो. यंत्रांत सुधारणा करून नवीं यंत्रें व सुधारलेली शास्त्रीय पद्धति अंमलांत आणण्यास जें खूप भांडवल लागतें तें यामुळें एकदम मिळतें. हा एकदम पुष्कळ खर्च झाला तरी दीर्घ कालाचा हिशेब केल्यास यंत्रामुळें मजुरांची संख्या कमी होऊन, एकंदर मजुरीचा व यंत्राचा खर्च वट्टांत कमी होतो. यंत्रें प्रथम सुधारण्यासाठीं भांड-वल जें फारच फार लागतें, तें धनिकवर्गापासून पुष्कळ प्रमाणांत मिळालें म्हणजे ही यंत्राची वाढ होऊं लागते. पण यंत्रांची वाढ होऊन मजुरांची घट झाली म्हणजे बेकारी वाढतें व खरेदी-शक्ति कमी

होऊन यंत्रानें वाढविलेला माल खपेनासा होतो. म्हणजे धनिकवर्गानें न भोगल्यानें उर्वरित म्हणून राहिलेला पैसा भांडवलस्वरूप पावला तरी तो अशा प्रकारें समाजाच्या पीछेहाटीस व संकटास कारण होतो.

---

## व्यक्तिस्वातंत्र्य आणि भांडवलशाही : : : ७

### भांडवलशाहीपूर्वीची गुलामगिरी

धनोत्पादनसाधनांची खाजगी मालकी रद्द करावी आणि तीं साधनें सार्वजनिक मालकीनें वापरावीं, या सोशॅलिस्टांच्या म्हणण्यावर एक मोठा आक्षेप असा असतो कीं, भांडवलशाहीच्या पुरस्कर्त्यांनीं जें व्यक्तिस्वातंत्र्य पुरस्कारिलें व निर्माण केलें तें यामुळें नष्ट होईल याची वाट काय? भांडवलशाहीच्या आरंभीं राजकीय, सामाजिक व आर्थिक दृष्ट्या मनुष्यसमाज अगदीं परतंत्र होता. उद्योगधंद्यांचे जे संघ असत त्यांतील माणसांना बाहेरचे धंदे करण्यास रूढीनें व कायद्यानें बंदी असे. शेतकरी हे वंशपरंपरेनें सरदार-जमीनदारांच्या जमिनीशीं बांधलेले होते. सरदारांना वंशपरंपरेनें सैन्यांत नोकरी करून राष्ट्रीय युद्धासाठीं पिढ्यानुपिढ्या धारातीर्थीं प्राणार्पण करावें लागे. सर्वसत्ताधारी राजे उन्मत्त, बेवकूब, जुलमी, अनियंत्रित असत. स्त्री ही कन्या, पत्नी, माता या तिन्ही नात्यांत पुरुषाची गुलाम होतीच. तिला जुलूम व पाणउतारा अतिशय सहन करावा लागे. इतकेंच नव्हे तर कुटुंबपोषणाचे जास्तींत जास्त कष्ट

स्त्रीलाच करावे लागून उपासमारीची पाळी येई तेव्हां, स्त्रीलाच प्रथम त्याच्या यातना भोगाव्या लागत. गुलाम म्हणून एक स्वतंत्र वर्ग समाजांत असेच. पण एकंदर बहुसंख्य समाजच गुलामगिरींत होता असें म्हणावें लागतें. हिंदुस्तानसारख्या मागसलेल्या देशांत जातिभेद व जातिजातींतील उच्चनीच भाव, अस्पृश्यता, सगळ्या जगांत भांडवलशाहीपूर्वी दिसून येणाऱ्या धार्मिक तेढी या सर्व दृश्यांकडे मनश्चक्षूनें पाहिल्यास व्यक्तिस्वातंत्र्याचा मागमूसही भांडवलशाही-पूर्वी नव्हता, हें सहज समजूं शकतें.

## तत्त्वज्ञांकडून व्यक्ति-स्वातंत्र्याचा पुरस्कार

कित्येक हजार वर्षें मानवसमाजशरीरास जखडून बसलेल्या या गुलामगिरीच्या मुळावर भांडवलशाहीच्या तत्त्वज्ञांनींच प्रथम घाव घातला. गेल्या दोनशें वर्षांत राजकीय, आर्थिक व सामाजिक सर्व बाजूंनीं व्यक्तिस्वातंत्र्य प्राप्त करून घेण्यासाठीं भांडवलशाहीच्या तत्त्वज्ञांनीं जिवापाड मेहनत घेतली. फ्रेंच राज्यक्रांतीपूर्वींचा जगद्विख्यात तत्त्वज्ञ रूसो यानें सक्तीची राज्यसत्ता व राजा ही अनैसर्गिक सृष्टि आहे असें प्रतिपादून, एकाद्या सार्वजनिक संस्थेचा सभासद होणें न होणें हें जसें व्यक्तीच्या इच्छेवर अवलंबून असतें त्याप्रमाणें राज्यसंस्थेचा सभासद म्हणजे प्रजाजन व्हावें कीं न व्हावें ही गोष्ट ज्या त्या व्यक्तीच्या इच्छेवर अवलंबून आहे व माणसांनीं राज्यसंस्था आपसांत करार करून स्थापिली आहे असें मत प्रतिपादिलें. अर्थात् व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनेची ही परमावधि होती. राज्यसंस्थेच्या इतिहासांत या कल्पनेचा प्रभाव जनमनावर पडून युरोपांत व अमेरिकेंत लोकशाही स्वरूपाच्या प्रचंड चळवळी झाल्या व अनेक देशांत लोकशाही स्वरूपाच्या राज्यसंस्था

भांडवलशाहीच्या अमदानींत स्थापन झाल्या. फ्रान्स, अमेरिका यासारख्या देशांत राजा ही वस्तु औषधालाही मिळत नसून इंग्रज लोकांचा राजा हें त्यांचें खेळण्याचें बाहुलें झालें आहे. समाजांत कायद्याच्या व सामाजिक दर्जाच्या दृष्टीनें कोणीही जन्मतः श्रेष्ठ अथवा कनिष्ठ नसून सर्वांस सारखा दर्जा असल्याचें मान्य करण्यांत आलें आहे. स्त्रियांना राजकीय मतदानाचा हक्क सर्वत्र व सारखा मिळाला नसला तरी, सामाजिक बाबतींत स्त्रियांना कल्पनातीत स्वातंत्र्य व पुरुषाशीं समता प्राप्त झालेली आहे. धार्मिक अथवा जातीय उच्चनीचता कल्पनातीत प्रमाणांत नष्ट होत आहे. या सर्व बाबतींत जगभर अजून पुष्कळ कार्य व्हायचें आहे हें खरें; तथापि कित्येक हजार वर्षांत न झालेली प्रगति अवघ्या दोनशें वर्षांत झाली हा भांडवलशाहीचा प्रभाव कांहीं लहान नव्हे.

## माणसाची नैसर्गिक दुर्बलता

ही सर्व प्रगति होण्याचें मुख्य कारण म्हणजे भांडवलशाहीनें दिलेलें आर्थिक स्वातंत्र्य होय असें भांडवलशाहीच्या पुरस्कर्त्यांचें म्हणणें आहे. रूढि, कायदे, धर्मसमजुती वगैरे व्यक्तीच्या शारीरिक व मानसिक जीवनावर जीं बंधनें पडलीं होतीं त्यामुळें, जमिनींतून वर येऊं पाहणारा अंकुर वरील शिळेखालीं दडपला जावा त्याप्रमाणें माणसाच्या शारीरिक व मानसिक शक्तींना व्यक्त होण्यास वाव मिळत नव्हता. आणि हजारों वर्षें त्या शक्ति खुरटल्या राहून मनुष्य सृष्टि-शक्तीपुढें दुर्बल ठरला होता. मानवजातीच्या पारतंत्र्याचें एक प्रमुख कारण सृष्टीपुढें तो हताश झालेला असे हें होय. मागें लिहिल्याप्रमाणें जनावरें, पक्षी यांना सृष्टीपासून आपलें रक्षण करण्याची व स्वतांच्या पोषणास सृष्टीचा उपयोग करण्याचीं साधनें

त्यांच्या शरीरांवर उपजतच उगवलेलीं आहेत. पक्ष्यांना उडतां येतें. थंडीवाऱ्यापासून निवारण व्हावें यासाठीं त्यांना पिसें आहेत. नखें, चोंच वगैरेंच्या साह्यानें भक्ष्य फाडून खातां येतें. पशूंना जाड त्वचा, केस, दांत, प्रचंड सामर्थ्य वगैरे आयतें उपलब्ध आहे. एक जीव दुसऱ्याचें अन्न असल्यानें आयतें तयार अन्न पुष्कळ प्राण्यांना मिळतें. हें जिवंत अन्नही दुसऱ्या लहान जीवावर अथवा आयत्या वाढणाऱ्या गवत, फळें, मुळें, पाला यांवर पोसलें जातें. सारांश, मानवेतर सृष्टींत किती तरी आयतेपणा भरलेला आहे. पण माणसाचे बाबतींत हा आयतेपणा फार प्राचीन काळीं केव्हां असलाच तर कित्येक हजार वर्षांपूर्वींपासून तो नष्ट झालेला आहे. इतिहासाला मनुष्याचा परिचय आहे तेव्हांपासून दांत दुर्बल, नखें दुर्बल, हातपाय दुर्बल व एकंदरीनें सर्व पशूंहून कमी चपळ, कमी सामर्थ्यवान्, कमी पचनशक्तीचा, पक्ष्यांप्रमाणें हवेंत उडतां न येणारा, त्वचा नाजूक असलेला असाच तो आहे आणि मागें हेंही सांगितलें आहे कीं, इतर सर्व प्राणिसृष्टीपेक्षां माणसाचा दुबर्लपणा संततिसंगोपनाचे बाबतींत दिसून आलेला आहे. मनुष्येतर सृष्टींतील बहुधा कोणत्याही प्राण्याची संतति महिन्या-पंधरवड्याहून अधिक-काळ स्वपोषणार्थ आईबापावर अवलंबून राहत नाहीं. उलट मानवजातीची संतति स्वावलंबी होण्यास संततिसंगोपनाचें कार्य कित्येक वर्षे वडील माणसांना करावें लागतें. सूक्ष्म दृष्टीनें मानवी जगाच्या व्यवहारांकडे पाहिल्यास माणसांच्या खटाटोपांपैकीं निम्याहून अधिक खटाटोप संततिसंगोपनासाठींच होत असतो असें दिसून येईल.

## आर्थिक व्यक्तिस्वातंत्र्याचा महिमा

माणसाची ही सर्वांगीण नैसर्गिक दुर्बलता कमी होण्यास भांडवलशाहीनें निर्माण केलेल्या आर्थिक व्यक्तिस्वातंत्र्याचा फारच मोठा

उपयोग झाला आहे असें भांडवलशाहीच्या पुरस्कर्त्यांचें म्हणणें असतें. लहान मुलांच्या पळण्याच्या अथवा खेळण्याच्या शर्यती लावल्या म्हणजे त्यांचें जसें शरीरसामर्थ्य विकसत जातें, शाळेंत विद्यार्थ्यांची अभ्यासांत चढाओढ लावली म्हणजे ज्याप्रमाणें त्यांची बुद्धि कानसलेल्या हिऱ्यासारखी अधिकाधिक तेजस्वी होत जाते, तद्वत् समाजांत धनोत्पादनव्यवसायाचें स्वातंत्र्य सर्वांस सारखें ठेवून ज्याच्या अंगीं जितकी कुवत असेल तितकें धन त्यानें [illegible]वें असें स्वातंत्र्य ठेवल्यास समाजांत चढाओढ व चुरस निर्माण होऊन एकंदर मानवजातीचें धनोत्पादन-सामर्थ्य म्हणजे सृष्टीपासून स्वतःचें रक्षण करण्याचें– तिला स्वतःचे उपयोगास लावण्याचें सामर्थ्य वाढत जातें असें भांडवलशाहीच्या तत्त्वज्ञांचें म्हणणें असे; ज्या मानव-जगांत हजारों वर्षें मनुष्य सृष्टीच्या पुढें गुलाम होता, तिच्या कोपास व लहरीस बळी पडत होता, दुष्काळ व उपासमार हाच त्याचा भोगवटा होता तेथेंच आज तो सृष्टीवर रोज नवे नवे विक्रम गाजवीत आहे, तिची लगाम यशस्वितेनें खेचीत आहे आणि आपल्या पराक्रमानें माणसानें संपत्तीचे ढीगचे ढीग जगावर निर्माण केले आहेत. एकाद्या गरीब भिकाऱ्याला अथवा शेतकऱ्याला केवढेंही श्रीमंत होण्याची मुभा दिल[illegible] समाजांत कर्तबगारी गाजविण्याची चुरस माजली. यामुळें हजारों वर्षें दडपलेल्या सुप्त शक्ति विकसून फोफावल्या, अमेरिकेंत वर्तमानपत्रें विकणारीं पोरें राष्ट्राध्यक्ष झालीं आणि गिरणींतल्या साध्या मजुरांनीं आर्थिक दृष्ट्या जगदुद्धार करतां येईल असे मोठमोठे शोध लावले. आर्थिक व्यक्तिस्वातंत्र्याचें हें फळ नव्हे काय?

## पण आर्थिक स्वातंत्र्य मिळालेंच नाहीं

पण हें आर्थिक व्यक्तिस्वातंत्र्य कितीजणांना मिळालें व आज तें कुणाला मिळत आहे आणि यापुढें तें कितीजणांना कितीसें लाभणार आहे याचा विचार भांडवलशाहीचे पुरस्कर्ते करीत नाहींत.

खरोखर आर्थिक स्वातंत्र्य व्यक्तिमात्रास राहिलेलें नाहीं हीच खरी भांडवलशाही-समाजाविरुद्ध तक्रार आहे; इतकेंच नव्हे तर मानव जातीवर जें संकट आज येऊन कोसळल्याची हकीकत मागें दिली आहे तें संकट या व्यक्ति-स्वातंत्र्याच्या पूर्ण अभावाचाच एक परिणाम आहे. कोणीही कोणताही धंदा करावा व कायदेशीर मार्गानें खुशाल श्रीमंत व्हावें असें भांडवलशाही सरकारें सांगतात. पण याचा खरो-खर अर्थ काय? हें स्वातंत्र्य व्यवहारांत कसें पदरांत पाडून घ्यावें? हजारों वर्षांचे प्राचीन हस्तव्यवसाय भांडवशाहीच्या चढाओढींत नष्ट झाले. शत्रूचा किल्ला जसा पाडून जमीनदोस्त करतात तसा हा प्राचीन हस्तव्यवसायांचा किल्ला जमीनदोस्त करण्यास कोणत्याच सरकारनें फर्मान काढलें नव्हतें खरें. बाजारांत यंत्राचा सुबक, मुबलक व स्वस्त माल विक्रीस आला. अर्थात् हस्तव्यवसायाचा, उणाख, तुरळक व महाग माल गिऱ्हाइकांनीं घेतला नाहीं. हस्त-व्यवसायांचा माल न खपल्यानें हस्तव्यवसायी ठार झाले. 'पण त्यांना यंत्रें घेण्याला कांहीं सरकारनें मनाई केली नव्हती!' नव्हती खरींच. पण तीं घेणें त्यांना शक्य नव्हतें. कारण हे हस्तव्यवसायी दरिद्री होते व त्यांना महागडें यंत्र विकत घेणें शक्य नव्हतें. शिवाय ज्यानें आधीं यंत्र घेऊन त्याचा वापर सुरू केला त्याच्याशीं मागाहून यंत्र घेणाऱ्याला चढाओढ करणें शक्य नव्हतें. आणि सर्वांनाच यंत्रें खरेदी करण्याचें स्वातंत्र्य असलें तरी सर्वच जण व्यक्तिशः यंत्रांचे मालक झाल्यावर सर्वांना मजूर कोठून मिळणार?

तेव्हां सर्वांनीं व्यक्तिशः यंत्रांचे मालक व्हावे असें म्हणणें हें आचरटपणाचें अथवा लबाडीचें आहे. 'पण ज्यांचे हस्तव्यवसाय बुडाले त्यांना कारखान्यांतून रोजगारी मिळालीच ना?' होय; कांहींना मिळाली. इंग्लंडांत भांडवलशाहीच्या आरंभींच्या काळीं मजुरांना जरी नरकयातना भोगाव्या लागल्या असल्या तरी त्या कालांतरानें कमी झाल्या व तेथल्या मजुरांची परिस्थिति पुढें पुढें पुष्कळ सुधारली हें खरेंच आहे. पण यावरून मानवजातीस आर्थिक स्वातंत्र्य मिळालें असें नव्हे. इंग्लंडच्या मालांनीं हिंदुस्तानचे हस्त-व्यवसाय ठार होऊन लक्षावधि कुटुंबें येथें देशोधडीस लागलीं. हळू-हळू जगांतील इतर राष्ट्रांत भांडवलशाही वाढली तसतशी त्या त्या पुढारलेल्या अथवा मागसलेल्या देशांतील हस्तव्यवसायिकांच्या हातीं-ही उलटी अंबारी आलीच. जगाची लोकसंख्या वाढत होती, गरजा वाढत होत्या व श्रम करणारे हातपाय वाढत होते. पण यंत्र व शास्त्र यांचा उत्पादनवेग इतका जोरदार होत होता कीं धन अधिकाधिक वाढत राहून माणसें एकसारखीं काम करण्यास नकोनकोशीं झालीं आणि यामुळें मागें सांगितल्याप्रमाणें बेकारी वाढली व त्यामुळें आतां भांडवलशाहीचें गिऱ्हाईक नाहींसें होऊन भांडवलशाहीचीच प्रगति खुंटली आहे.

जगांत आज भांडवलवाल्यालाही आर्थिक व्यक्तिस्वातंत्र्य नाहीं आणि मजुरालाही नाहीं. भांडवलवाल्याला नुकसानीनें धंदा बुडवावा लागत आहे आणि मजुराला रोजगार नाहीं म्हणून फाके पडत आहेत. भांडवलदारांना अगदीं उपासमारीचा तरी प्रसंग नाहीं. पण जगांतील प्रचंड बहुसंख्य व असंख्य मजुरांना रोजगारीची रोजची अनिश्चिती असून बेकारांना सकाळच्या न्याहारीचीच ददात आहे. हें आर्थिक व्यक्तिस्वातंत्र्य म्हणजे टांचा घासून उपाशीपोटीं मरून

५८९८

जाण्याचें स्वातंत्र्य होय. खरें स्वातंत्र्य राज्यकर्त्यांनीं जनतेला द्यावयाचें तर वाटेल त्यानें वाटेल तो व्यवसाय करावा हें नव्हे. कारण कांहीं लोकांच्या हातीं एकदां जमिनी व कारखाने पडले कीं, लोकांना रोजगारी पुरविण्याची अथवा न पुरविण्याची सत्ता त्यांचेच हातीं राहते व ते फक्त आपल्या नफ्यासाठींच धंदा चालवीत असल्यामुळें क्रमाक्रमानें त्यांतून बेकारी हा रोग उद्भवतो व तो सतत वाढत राहून असाध्यही होतो. म्हणून जनतेला राज्यकर्त्यांकडून जें आर्थिक स्वातंत्र्य हवें आहे तें 'वाटेल तो धंदा करा' हें नसून 'सरकार रोजगारी देण्यास तयार आहे' अशा आश्वासनांत मिळणारें व्यक्तिस्वातंत्र्य हवें आहे. पण सरकार जर रोजगारीची हमी घेणार तर ज्याच्या साह्यानें रोजगारी द्यायची तीं जमीन, कारखाने, खाणी, आगगाड्या वगैरे धनोत्पादन-साधनें जीं आज खाजगी मालकींत आहेत तीं प्रातिनिधिक सरकारनें स्वतःच्या मालकींत आणलीं पाहिजेत.

## हाय! खाजगी मालकीवर कुऱ्हाड! (?)

पण यानें खाजगी मालकीवर घाला पडतो, असा आक्षेप भांडवलशाहीचे कैवारी घेतात. खरी गोष्ट वर सांगितल्याप्रमाणें अशी आहे कीं, जगभर पसरलेल्या लक्षावधि—कोट्यवधि हस्तव्यवसायिकांची खाजगी मालकी या भांडवलशाहीनेंच लुबाडून घेतली असून यामुळें जगांतले नऊदशांशाहून अधिक लोक कफल्लक बनले आहेत. समाजांतील व्यक्तींच्या खाजगी मालकीचें रक्षण करणें हें जर सरकारचें कर्तव्य असेल, जनतेला धनोत्पादनास व धनार्जनास संधि देणें हें जर सरकारचें कर्तव्य असेल, तर भांडवलशाहीनें ज्यांच्या हस्तव्यवसायावर म्हणजे धनोत्पादन-साधनांवर घाला घातला त्यांना त्याऐवजीं धनार्जनाची कांहीं तरी सोय सरकारनें करून देणें भाग

आहे. शाळेंतील विद्यार्थ्यांत अभ्यासाची चढाओढ असावी म्हणजे मुलांचा बुद्धिविकास होतो, मुलांना चुरशीनें धावण्यास लावण्यानें त्यांचा शक्तिविकास होतो, तसाच धनार्जनाचे कामीं चढाओढ लावली असतां कर्तृत्वविकास होईल हें सकृद्दर्शनीं खरें दिसतें; पण या चढाओढींत न्याय व समता राहावी यासाठीं तिचें नियंत्रण होणें जरूर आहे. धावणाऱ्या दोन मुलांत एक दांडगा असला व त्यानें दुसरा लहान पण चपळ मुलगा आपल्या पुढें जाऊं नये म्हणून चालतां चालतां त्याचें तंगडें मोडलें तर ही शर्यत अथवा चढाओढ न्याय्य व शक्तिविकासकारी होऊं शकत नाहीं. भांडवलशाहीनें निर्माण केलेली चढाओढ आरंभापासून आतांपर्यंत अशीच होती. एकादा लांडगा भला गलेलठ्ठ मातलेला दिसला तर त्यानें खूप कोंकरें पिरगाळून पचविलीं असलीं पाहिजेत ही गोष्ट जशी गृहीत धरावी लागते त्याप्रमाणें डोळे दिपवून टाकणारें जें जें वैभव दृष्टीस पडतें तें तें असंख्य मानवजातीच्या निर्दय पिळणुकीवर उभारलें आहे ही गोष्ट लक्षांत ठेवावी लागते. भांडवलशाहींत मानवसमाजाचें कर्तृत्व बरेंच वाढलें खरें; पण तें वाढत असण्याच्या काळांत न्याय्य चढाओढ चालत आली नसून मोठा मासा लहान माशास खातो या जड सृष्टींतील निष्ठुर अनुभवाच्या कोट्यवधि आवृत्त्या घडून आल्या आणि आजही अधिकाधिक निष्ठुरपणानें हाच क्रम पुढें चालू असून मानवी कर्तृत्व मात्र आतां वाढण्याऐवजीं ओहोटीस लागलें आहे, आणि शेंकडा नव्वदांची खाजगी मालकी आधींच नष्ट झाली आहे.

---

## 'बळी तो कान पिळी' हा रूढ न्याय : : : ८

### भांडवलशाहीचा प्रतिज्ञाभंग

ज्या एका प्रतिज्ञेवर भांडवलशाहीचा पुरस्कार तिच्या तत्त्वज्ञांनीं केला ती प्रतिज्ञा पुरी करण्याचें भांडवलशाहीनें कधींच मनावर घेतलें नाहीं. भांडवलशाहीपूर्वीं मानवी स्वातंत्र्य मुळींच अस्तित्वांत नसून 'बळी तो कान पिळी' हा न्याय होता. भांडवलशाहीचे आरंभीं 'वाटेल त्यानें वाटेल तो धंदा करावा आणि ज्याला त्याला आपल्या श्रमाचें फळ बिनहरकत उपभोगण्यास मिळावें, यासाठीं दुर्बलाचें बलिष्ठापासून रक्षण करणें हें राज्यसंस्थेचें कर्तव्य आहे' हा जो व्यक्तिस्वातंत्र्यवाद्यांचा सिद्धांत त्याचे बळावर भांडवलवाल्यांनीं धंदे उभारले; पण त्यामुळें जुने हस्तव्यवसाय मोडले. भांडवलवाल्यांच्या वाढत्या बलापासून बहुसंख्य पण दरिद्री व त्यामुळें दुर्बल अशा समाजास राज्यसंस्थेनें संरक्षण दिलेलें नाहीं. कृष्णानें गोविंदावर पिस्तूल रोखून त्याची पैशाची थैली त्याज-जवळून मागून घेतली अथवा प्रॉमिसरी नोट लिहून घेतली तर कृष्णाला जी रक्कम मिळेल अथवा जो दस्तैवज मिळेल त्यावर त्याचा स्थापित होणारा हक्क हा 'जेतृत्वाचा हक्क' म्हणजे 'बळी तो कान पिळी' या न्यायाचा हक्क होय. अनियंत्रित सुलतानी राज्य-व्यवस्थेंत असे हक्क अनेकदां बजावले जातात. एक राज्य दुसऱ्यावर आक्रमण करून व त्यास पराभूत करून हा जेतृत्वाचा हक्क स्थापित करतें. लोकशाही स्वरूपाच्या राज्यव्यवस्थेंत हा प्रकार न्याय्य मानूं नये व मानला जाणार नाहीं असें भांडवलशाहीच्या

तत्त्वज्ञांचें म्हणणें होतें. भांडवलशाहीच्या आयुष्यांत पोलीस, सैन्य, आरमार, कायदे व कोर्टें हा सर्व सरंजाम याच एका कार्यासाठीं निर्माण झाला. तथापि हा जेतृत्वाचा हक्क मात्र अजूनही अमर्यादपणें धुमाकूळ घालीतच आहे.

### श्रमजन्य मालकी विरुद्ध जेतृत्वजन्य मालकी

कसें तें पहा. एक काळ असा होता कीं, एकानें स्वश्रमानें संपत्ति निर्माण केल्यामुळें तीवर त्याची मालकी स्थापणें योग्य असतांही उघड उघड त्या मालकावर हल्ला करून बलात्कारानें मालकी मिळविणें हें न्याय्यच मानलें जाई. 'जेतृत्वाचा हक्क' ( राइट ऑफ कॉंक्वेस्ट ) या नांवानें तो हक्क रूढ असे. स्वतः श्रम करून निर्मिलेल्या संपत्तीवर मालकी हक्क सांगणें हा 'श्रमजन्य मालकी हक्का'चा प्रकार व आतांच सांगितलेला 'जेतृत्वजन्य मालकी हक्का'चा प्रकार या दोहोंत फार प्राचीन काळापासून झगडा चालू आहे. गुलामगिरीच्या काळीं मजूर स्वतांच्या श्रमानें जें धन मिळवीत तें धन गुलामांना मालकांनीं जिंकलेलें असल्यानें 'जेतृत्वजन्य मालकी हक्का'नेंच मालकांकडे जाई. आज़ही एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रास जिंकून हा हक्क सांगतें असें मागें म्हटलेंच आहे. हा 'जेतृत्वजन्य हक्क' अन्याय्य आहे, त्यामुळें समाजांत धनोत्पादनास उत्तेजन राहणार नाहीं व समाजाचा नाश होईल असें मत भांडवलशाहीच्या आरंभकालाच्या तत्त्वज्ञांनीं प्रतिपादिलें. त्यांच्या मतें ज़मीन अथवा अस्ताव्यस्त पसरलेलें जंगल हें कांहीं स्वयंसिद्ध धन होऊं शकत नाहीं. जळणाला लाकूड हवें असलें तर झाडावरून तें तोडून आणावें लागतें तेव्हां तें धन होतें. म्हणजे 'तोडून आणण्याच्या श्रमामुळें' तें 'धन' झालें. असे श्रम समाजांत घडल्यावांचून समाजधारणा होणारच नाहीं. असे श्रम कोण करील ?

ज्याला आपण श्रमानें मिळविलेलें धन पूर्ण मालकी हक्कानें वापरण्यास वाव व स्वातंत्र्य आहे अशी खात्री पटेल तोच धनोत्पादनाचे श्रम करील. म्हणून लुबाडणुकीपासून म्हणजे 'जेतृत्वजन्य मालकी-' पासून व्यक्तिमात्राच्या 'श्रमजन्य मालकी हक्का'चें संरक्षण राज्यसंस्थेनें केलें पाहिजे असें मत प्रतिपादण्यांत येऊं लागलें. श्रमजन्य म्हणून न्याय्य अशा या मालकी हक्काच्या पोटींच 'देऊन टाकणें, विकून टाकणें, उसनें देणें, स्वतः भोगणें, राखून ठेवणें, नाश करणें, दुसऱ्यांस प्रतिबंध करणें', इतके धनासंबंधींचे हक्क अंतर्भूत होतात. पैकीं 'देऊन टाकणें, विकून टाकणें, उसनवार देणें' या हक्कांपासून एकानें आपला मालकी हक्क दुसऱ्यास देऊन टाकण्याचा व दुसऱ्यानें तो मालकी हक्क घेण्याचा हक्क निर्माण होत असून या व्यवहारास उभयतांचीं संमति अथवा करार अवश्य असल्यामुळें यास 'करारानें उत्पन्न होणारी मालकी' असें म्हटलें जातें. यांत उभयपक्षांच्या संमतीनें मालकी हक्काची देवघेव होत असल्यानें यांत जेतृत्वजन्य हक्काचा अंशसुद्धां नाहीं असें मानलें जातें. 'अमुक वेळेपासून माझी अमुक धनावरची मालकी संपली व तुझी सुरू झाली' असा अभिप्राय यांत व्यक्त होत असतो. या तत्त्वाच्या सिद्ध्यर्थ गुलामगिरी नष्ट करण्यांत येऊन प्रत्येक व्यक्तीस आपल्या श्रमानें निर्माण झालेल्या धनांबाबत करार करण्याचें पूर्ण स्वातंत्र्य प्राप्त झालें. भांडवलशाही समाजव्यवस्था याच करारस्वातंत्र्यावर आधारलेली आहे असें भांडवलशाहीच्या तत्त्वज्ञांचें म्हणणें असून उत्तरोत्तर आंतरराष्ट्रीय व्यवहारांतही हें तत्त्व स्थापन होईल व आंतरराष्ट्रीय युद्धें कायमचीं थांबतील असें या तत्त्वज्ञांचें भाकित आहे. पण आंतरराष्ट्रीय व्यवहाराचें राहोच, राष्ट्रीय व्यवहारांत तरी हा जेतृत्वजन्य हक्क नष्ट झाला आहे काय ?

## यंत्रयुगांतील संपत्तीचें स्वरूप

यंत्रयुगापूर्वी हत्याराचा मालक त्या हत्यारांच्या साह्यानें कष्ट करून धन निर्माण करी व ती संपत्ति त्याच्या श्रमजन्य मालकीची आहे असें सहजच मानलें जाई. अशा धनोत्पादनांत आरंभापासून अखेरपर्यंत एका माणसाचे अथवा कुटुंबाचे श्रम एकवटून संपत्ति निर्मिली जात असल्यानें एका माणसाची अथवा एका कुटुंबाची श्रमजन्य मालकीची संपत्ति अमकी व अमुक इतकी असें बऱ्याच निश्चयानें बोट दाखवून, मोजून सांगतां येई. पण हल्लींच्या या यंत्रयुगांत हें शक्य आहे काय? कल्पना करा कीं एका गिरणींत एक हजार मजूर राबत आहेत. गिरणीस कच्चा माल पुरविणारी परदेशांत जी कंपनी आहे तींत कांहीं तरी १००।२०० माणसें राबत आहेत. तसेंच गिरणींत तयार झालेल्या मालाचे प्रसारक देशोदेशीं असून ते कांहीं तरी दोनतीनशें आहेत. शिवाय ज्यांनीं गिरणींत भांडवल गुंतविलें असे देशोदेशीं पसरलेले भागीदार व चालक मिळून पांचशें आहेत. एकूण हीं दोन हजार माणसें झालीं असें आपण धरूं. हे सर्वजण आपापले श्रम या गिरणींत या ना त्या रूपानें ओततात; अर्थात् गिरणीच्या एकंदर व्यवहारांत सालोसाल जो नफा उरणार तो या दोन हजारांनाच मिळावा इतरांना मिळूं नये हें श्रमजन्य मालकीच्या तत्त्वास अनुसरून असेंच आहे. पण या दोन हजार माणसांच्या या सर्व नफ्यांत व्यक्तिशः प्रत्येकाचा श्रमजन्य मालकीचा वाटा किती हें कसें ठरवावयाचें?

## यंत्रपूर्वकालांतील संपत्तीचें स्वरूप

एका खेड्यांतल्या संपत्तीपैकीं एका कुंभाराच्या आव्यांत होणारीं गाडगीं, मडकीं त्याच्या कुटुंबीयांच्या श्रमजन्य मालकीचीं आहेत,

खेड्यांतील इतर कुटुंबांचीं नाहींत असें सहज म्हणतां येतें. कारण त्या कुंभाराच्या कुटुंबाचेच श्रम त्या मडक्यांचे कारणीं लागले; इतर कुटुंबांचे लागले नाहींत. यंत्रयुगापूर्वी सर्वत्र संपत्तीचें हेंच स्वरूप होतें. पण आजच्या यांत्रिक गिरणींत तयार होणाऱ्या हजारों रुपयांच्या मालांत वर उल्लेखिलेल्या दोन हजार श्रम करणाऱ्यांपैकीं कोणाचा किती व कोणता हिस्सा हें कसें ठरवावयाचें? त्यास आपणाजवळ काय साधन आहे? कारण सर्व धन हें सर्वांच्या संयुक्त व अविभाज्य श्रमांचें अखंड फळ आहे. यांपैकीं अमक्याच्या श्रमाचें फळ अमुक असें म्हणून तें त्यास विभागून देतां येणार नाहीं. भांडवलशाहींत निर्माण होणाऱ्या प्रचंड धंद्यांच्या सर्वच धनाची ही परिस्थिति अशी आहे.

## धमकीनें धनार्जन

मग आज श्रम करणाऱ्या मजुरांना रोजगारी मिळते, भांडवलदारांना नफा मिळतो, जमीनदारांना खंड मिळतो, हीं त्या त्या धनावर त्या त्या धन्यांची जी मालकी स्थापन होते तिचें तत्त्व काय? भांडवलशाहीचा इतिहास पाहिला असतां याचें उत्तर मिळूं शकतें. यंत्राचा जेव्हां प्रथम उपयोग होऊं लागला त्या वेळीं कमींत कमी मजुरी देऊन जास्तींत जास्त नफा मिळविण्याचा कारखानदारांनीं प्रयत्न केला. यंत्रामुळें खाजगी धंदे बुडून बेकार झालेले लोक यंत्रवाल्यांच्या दाराशीं उभे राहिले. रोजगारी मिळविण्यासाठीं त्यांच्यांत चढाओढ लागली. कारण आतां धनार्जनाचें साधन असें त्यांच्या हातापायावांचून त्यांजजवळ कांहींच नव्हतें. मजुरांच्या या अडलेल्या स्थितीचा फायदा घेऊन भांडवलदारांनीं त्यांना कमींत कमी मजुरीवर राबविलें व जास्तींत जास्त नफा मिळविला,

बाकीचे कित्येक मजूर बेकार राहिले व जुने हस्तव्यवसायी नव्यानें बेकार होत गेले. एकाद्या धनिकास खुनाचा धाक दाखवून त्यापासून दरोडेखोरानें त्याचें धन लुटावें त्याप्रमाणें धनार्जनसाधनाभावीं कफल्लक झालेल्या मजुरांना बेकारीचा म्हणजे उपाशी मारण्याचा धाक घालून कारखानदारानें त्यांच्या श्रमावर जास्तींत जास्त नफा मिळविला. ही दरोडेखोरीच नव्हे काय? खून होईल या भीतीनें धनिकानें वाटेल तेवढें धन दरोडेखोरांस दिलें, त्याचप्रमाणें आपण व आपलीं बायका-पोरें उपाशी मरतील या भीतीनें मजुरानें कमींत कमी मजुरी घेऊन व जास्तींत जास्त श्रम करून जास्तींत जास्त नफा कारखानदारांस उपटूं दिला, असें नव्हे काय? पिस्तूल दाखवून पैसे उपटणें व मजुरांना उपाशी मारण्याचा धाक दाखवून व त्यांना कमींत कमी मजुरीवर राबवून त्यांच्या श्रमावर नफा उपटणें यांत नैतिक दृष्ट्या फरक तो कोणता? वर सांगितलेला जेतृत्वाचा हक्क म्हणजेच 'बळी तो कान पिळी' हा न्यायच येथें प्रभावी ठरला असें नव्हे काय? दरोडेखोर हा धनिकास कांहींच न देतां धनिकाची संपत्ति हिरावून घेतो; पण येथें भांडवल-दार मजुरास निदान कमींत कमी मजुरी देतो असा थोडासा फरक यांत दाखवितां येईल. तथापि 'बळी तो कान पिळी' हा न्याय येथें नाहीं असें म्हणतां येणार नाहीं. कारण म्हशीला आंबोण घालून आपण दूध काढतों यांत म्हशीला आपण धन देतों त्याहून आपण अधिक धन तिजपासून घेतों व त्यासाठीं तिचे पाय बांधतों अथवा तिला धाक दाखवितोंच. मांसाहारी लोक जें बकरें अथवा कोंबडें खातात त्याला प्रथम खाऊं-पिऊं घालून पुष्ट करतात आणि पुढें त्या बकऱ्यास अथवा कोंबड्यास ते ठार मारून खातात, तेव्हां तो कांहीं खुषीचा सौदा असूं शकत नाहीं. तसेंच मजुरास

पोटभर ज़ेवून कष्ट करण्याचें सामर्थ्य राहावें लागतें म्हणूनच त्यास मजुरी द्यावी लागते. पण ही मजुरी आपण करूं त्या श्रमाच्या किंमतीच्या मानानें अमुक इतकीच घेऊं, कमी घेणार नाहीं असें म्हणण्याचें सामर्थ्य मजुरांना असत नाहीं. कारण त्यांस धनार्जनाचें स्वतंत्र साधन कांहींच नसल्यानें रोजगारी मिळविण्यासाठीं आपसांत चढाओढ करावी लागते व याच चढाओढींत त्यांना उपासमारी-रूपी पिस्तुलाच्या धाकानें कमींत कमी मजुरी पत्करावी लागते. मजुरांचे श्रम अशा प्रकारें भांडवलदार खुषीच्या करारावर खरेदी करीत नसून 'बळी तो कान पिळी' याच न्यायानें—जेतृत्वाच्या हक्कानेंच मिळवितो हें लक्षांत ठेवलें पाहिजे. दरोडेखोराचें धनार्जन व भांडवलदाराचें धनार्जन यांत येथें फरक दिसत नाहीं.

## संप विरुद्ध कुलूप

भांडवलशाहीच्या विकासकालांत इंग्लंड वगैरे सुधारलेल्या राष्ट्रांत मजुरांची मजुरी उत्तरोत्तर वाढत गेली तेव्हां तरी 'बळी तो कान पिळी' हा न्याय कमी झाला असेल काय ? मुळींच नाहीं. भांडवलवाल्यांचा नफा जसजसा वाढत गेला तसतसा त्यांतला अधिकाधिक वाटा मजुरीच्या रूपानें आपणांस अधिकाधिक मिळत जावा म्हणून मजुरांनीं संघटित होऊन व संप करून कारखाने बंद पाडण्याचा धाक कारखानदारांना घातला व कित्येकदां तसे कारखाने बंद पाडलेही. यामुळें नफा बुडण्याच्या भीतीनें कारखानदारांनीं मजुरांचे पगार वाढविले. उलट मजूर ज्या ज्या वेळीं पगारवाढीसाठीं फार हट्टास पेटले त्या त्या वेळीं कारखानदारांनीं कारखान्यांस कुलपें ठोकून मजुरांना बेकारीचा धाक घातला व पगारवाढीचा हट्ट सोडायला त्यांना भाग पाडलें. सारांश, मजुरांनीं संपाचा धाक दाखवून व कारखानदारांनीं कुलपाचा

धाक दाखवून उभयपक्षीं हा मजुरीवाढीचा लढा लढला गेला. त्यांत कारखानदार थोडेसे मागें हटले असले व मजुरांची मजुरी वाढली असली तर उभयपक्षीं 'बळी तो कान पिळी' हा न्याय वापरला गेला ही गोष्ट शिल्लक राहतेच.

आज जगभर राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक वगैरे सर्वच बाबतींत जो अनर्थ घडून आलेला दिसतो त्याचें कारण हा 'बळी तो कान पिळी' हा न्याय हेंच होय. एकंदर जग एक, ही दृष्टि घेतल्यास आज संपत्ति निर्माण करण्याची शक्ति इतकी प्रचंड वाढली आहे व ती वापरून माल इतका निर्माण होत आहे कीं कोणाही व्यक्तीस दरिद्री राहण्याचें कारण नाहीं; पण प्रत्यक्ष व्यवहारांत वेगळाच प्रकार घडतो. धनोत्पादनाचीं साधनें कांहीं थोड्या लोकांच्या हातींच असल्यानें बहुसंख्य समाजास आपसांत चढाओढ करून धनिकांजवळून कमींत कमी मजुरीवर रोजगारी मिळवावी लागते. पुष्कळांस नोकरी न मिळाल्यामुळें ते बेकारच होतात. आणि माल खपेना म्हणून धंदा बुडाल्यानें अथवा नवें एकादें यंत्र निघाल्यानें हजारों रोजगारदारांचे डोकीवर बेकारीची तरवार अहर्निश लटकत राहते.

## ही चढाओढ कीं यादवी ?

माणसाचें कर्तृत्व वाढविण्यास चढाओढीच्या तत्त्वाची जरूरी आहे हें सामान्य तत्त्व कबूल केलें तरी भांडवलशाही समाजांतील चढाओढीस प्रत्यक्ष युद्धाचें स्वरूप आलें आहे हें लक्षांत घेतलें पाहिजे. एकाद्या देशांत यादवी माजली असतां जशी बेबंदशाही माजते त्याप्रमाणें भांडवलशाहींत जें आर्थिक युद्ध माजलें आहे त्यामुळें बेबंदशाहीच माजली असून कोणाचें जीवित, वित्त व अब्रू सुरक्षित

राहण्याची कांहीं आशा राहिलेली नाहीं. 'येथें कोणाचेंही जीवित, कोणाचीही पत्नी अथवा कोणाचीही मालमत्ता सुरक्षित नाहीं' असें एका दक्षिणी संस्थानाचें वर्णन एका प्रसिद्ध पुढाऱ्यानें केलें होतें. भांडवलशाहीस हें वर्णन शब्दशः लागू आहे. धनाचे ढीगच्या ढीग वायां जात असतां दारिद्र्य व बेकारी यांनीं लक्षावधि माणसें मरत आहेत; आगगाड्या, कारखाने, मोटारी, खाणी, जमिनी वगैरे सर्व धनोत्पादन-साधनें जगांतील मूठभर लोकांच्या हातीं राहिल्यानें बहुसंख्य लोकांच्या मालकीचें कोणत्याच प्रकारचें धन नाहींसें होऊन सर्व कफल्लक होत आहेत. खरोखर जे सधन आहेत त्यांची परिस्थिति निर्धनाहून-ही एकपरीं वाईट झाली आहे. धनलाभ झाल्यानें त्यांची राहणी सुधारतें व अधिक खर्चाची होते. पण एकदां मिळत गेलें तसें धन पुन्हा मिळत नाहींसें होऊन आदा व खर्च यांची तोंडमिळवणी होत नाहीं व त्यांचीं दिवाळीं वाजूं लागतात. भांडवलावरील व्याज व नफा कमी कमी होत जाऊन भविष्यकालाची चिंता वाढते आणि यासाठीं पैसा साठवून ठेवून तो साठण्याच्या प्रमाणांत खर्च करूं नये अशी प्रवृत्ति धनिकांत होत जाते. ऐदीपणानें किती पिढ्या बसून खातां येईल याचेच हिशेब होऊं लागतात. आणि हा ऐदी समाज अधिकाधिक कर्तृत्वशून्य व भेकड होत जातो. डॉक्टर, वकील, मास्तर, कारकून, भिक्षुक, कथेकरी, पुराणीक, अगदीं लहान प्रमाणावर व्यापार कर-णारा व्यापारीवर्ग, यांत जे थोडेसे सधन आहेत ते अधिकाधिक कर्तृत्वशून्य व भेकड होत जाऊन बाकीचा वर्ग बेकारीच्या धाकापुढें थरथरत उभा असतो. शस्त्र-यादवीच्या काळांत दिसून येणारी जनतेची भौतिक व मानसिक भयंकर परिस्थिति साधारणपणें याच मासल्याची असतें हें सूक्ष्मपणें पाहणारास सहज कळून येईल.

## समाजाचा नैतिक अध:पात

भांडवलशाही समाजांतील या बेबंदशाहीचा व अनिश्चितीचा परिणाम स्त्रीवर्गावर कसा होतो हें पाहिलें असतां एकंदर समाजाच्या नैतिक अध:पाताची सीमा किती खोलवर गेली आहे हें लक्षांत येतें. भांडवलदारी कारखान्यांत स्त्रिया कामें करूं लागल्यापासून प्रथम पुरुषाच्या रोजगारीशीं त्यांची चढाओढ होऊं लागून पुरुषांची मजुरी कमी होऊं लागली. पतीच्या, बापाच्या अथवा मुलाच्या मिळकतींत केवढीही थोडी भर घालतां आली तरी तेवढीच गरिबी कमी होईल या साध्या व सरळ विचारसरणीनें स्त्रियांनीं पुरुषांहून कमी पगारावर रोजगारी मिळविण्यास सुरुवात केली व त्यांच्याशीं पुरुष-रोजगाऱ्यांची चढाओढ होऊन दोघांची-ही मजुरी कमी होत गेली. विवाहित पण मुलेंबाळें नसलेल्या स्त्रियांनीं नवऱ्यांच्या मिळकतींत भर घातली व इतर पुरुषांची मजुरी कमी केली; पण अशा कमी मजुरी झालेल्या दुसऱ्या मजुराची लेकुरवाळी बायको रोजगारी करूं न शकल्यानें सगळ्या कुटुंबाची उपासमार झाली.

अशा लेकुरवाळ्या बाईचा पति मेला तर तिच्या अध:पातास एका वेगळ्याच प्रकारानें सुरुवात होते. मुंबई, कलकत्ता, लंडन अशा शहरांतून मिळकत फारशी नाहीं अथवा रोजगारी निश्चित नाहीं असे अनेक तरुण अविवाहित राहतात. आणि रोज-गारधंद्यास फारशी सवड नसणाऱ्या अशा लेकुरवाळ्या निमतरुण स्त्रिया नाइलाजानें अविवाहित राहणाऱ्या या तरुणांची गरज अल्प कालांत निवारून सगळ्या दिवसाच्या श्रमाइतकी अथवा त्याहूनही अधिक रोजगारीची मजुरी कमावितात. विवाह करून पुरुषाच्या कायम बंधनापेक्षां अथवा पोराबाळांच्या लेंढारापेक्षां वर सांगितलेल्या

अविवाहित तरुणांची मधूनमधून गुप्तपणें संगत करून पण वेश्ये-प्रमाणें अप्रतिष्ठा न होतां मोठ्या प्रतिष्ठेनें समाजांत वावरणाऱ्या सुशिक्षित तरुणींची संख्या अमेरिका, फ्रान्स, इंग्लंड यांसारख्या भांडवलप्रधान देशांच्या शहरांत अफाट वाढूं लागली आहे असें संशोधकांचें मत आहे. अशा जीवनांत मनोवृत्ति शांत राहूं शकतात असें मानणें मूर्खपणाचें आहे. अनुभवास तें अनुसरून नाहीं. स्थिर वैवाहिक जीवनांतलें सुख यांत नाहीं. पण दरिद्री व अनिश्चित मिळकतीच्या वैवाहिक जबाबदारीपेक्षां कमी जबाबदारीचे ( मानसिक स्वास्थ्याचे दृष्टीनें कांहींसें वाईट ) पण आर्थिक सुबत्तेच्या दृष्टीनें बरेंच सुखकर असें हें जीवन पत्करणें तरुणींना सोइस्कर वाटतें. हा व्यवसाय नेमस्तपणेंच करीत गेल्यास कारखान्यांतील रोजगारीपेक्षांही अधिक मिळकतीचा, अधिक फुरसतीचा व कमी श्रमाचा होतो. काड्याच्या पेट्यांच्या कारखान्यांत एकाद्या सुंदर मुलीनें ८ तास कष्ट करून व गंधकानें इजा होण्याचा धोका पत्करून रोज १ रुपया मिळविण्यापेक्षां आठवड्यांतून दोन दिवस निरनिराळया तरुणांच्या संगतींत सिनेमा, मेजवानी, कौमुदी-विहार वगैरे करून आठवड्यास दहा अथवा वीस रुपये मिळविणें तिला सोइस्कर वाटेल व तरुणांसही मिळकतीच्या अनिश्चितींत हेंच जीवन कमी खर्चाचें व सुखाचेंही वाटेल हें स्वाभाविक होय. संतति-नियमनाच्या पद्धति वास्तविक विवाहित दांपत्याचें जीवन सुखानें घालविण्यासाठीं फार चांगल्या उपयोगी पडतील. पण अविवाहित बेजबाबदारीचें जीवन घालविणारेच स्त्री-पुरुष त्यांचा उपयोग सर्रास करीत आहेत आणि विवाहित स्त्रियांना धार्मिक समजुती व भित्रे-पणा यामुळें संततिनियमनाचें धाडस (!) करवत नाहीं.

पण ही वेश्येगिरी केवळ स्त्रियांतच नाहीं. पैशाची अनिश्चिती व त्यामुळें तो मिळविण्याचा व सांठविण्याचा दुष्ट लोभ यामुळें डॉक्टर, वकील, मास्तर, भिक्षुक, वृत्तपत्रकार, कलावंत, सर्वज़ण आपापल्या व्यवसायाचा व्यभिचार इतक्या कमालीचा करतात कीं, स्त्रियांनीं शरीरविक्रय करणें एवढ्याच क्रियेस वेश्याव्यवसाय म्हणून निंदण्यापेक्षां वरील सर्व व्यवसाय हे कांहीं मर्यादेपलीकडे वेश्याव्यवसायाचें रूपच धारण करतात असें म्हणावें लागतें. अगदीं संक्षिप्तपणें सांगायचें तर व्यभिचार हा भांडवलशाही वातावरणांतला एक भयंकर रोग असून आर्थिक अनिश्चिती व बेकारी हें त्याचें कारण आहे असें म्हणतां येईल. 'बळी तो कान पिळी' अथवा 'जेतृत्वजन्य मालकी हक्क' हा जो रूढ न्याय, त्यामुळें समाजांत आर्थिक यादवी माजून ही अराजकता म्हणजे आर्थिक अनिश्चिती व बेकारी उत्पन्न होते हें कोणासही समजून येईल. व्यक्तिस्वातंत्र्यवाद्यांचा जो मूळ हेतु तो या समाज़व्यवस्थेंत सिद्धीस गेला नाहीं. व्यक्तिस्वातंत्र्य बहुसंख्य समाजास प्राप्त न होऊन अखेर 'बळी तो कान पिळी' हाच न्याय प्रभावी झाला. जोंवर धनोत्पादनसाधनें थोड्या व्यक्तींच्या हातीं आहेत तोंवर हा अन्याय दूर होणार नाहीं. म्हणून खाणी, कारखाने, आगगाड्या, बँका वगैरे धनार्जनाचीं साधनें खाजगी मालकींतून सार्वजनिक मालकींत आणलीं तरच व्यक्तिमात्रास व्यक्तिस्वातंत्र्याचा उपभोग घेतां येईल असें मागें म्हटलें असून त्याची सयुक्तिकता आतांपर्यंतच्या विवेचनावरून लक्षांत येईल.

---

वास्तविक धनार्जनाचीं साधनें खाजगी मालकींत न ठेवतां सार्वजनिक म्हणजे सरकारी मालकींत ठेवणें, धनोत्पादन-साधनांचें राष्ट्रीकरण करणें यांत अपूर्व असें मुळींच कांहीं नाहीं. व्यक्तिस्वातंत्र्याचें रक्षण करणें व व्यक्तिमात्रास प्रगतीसाठीं झटण्यास संधि देणें हें राज्यसंस्थेचें कर्तव्य आहे असें व्यक्तिस्वातंत्र्यवादी तत्त्ववेत्ते म्हणत आले असून भांडवलशाहीच्या इतिहासांत राज्यकर्त्यांनीं एकंदर जनतेच्या हितासाठीं अनेक व्यवसाय केले आहेत; आणि हे व्यवसाय करतांना व्यक्तिस्वातंत्र्याचे अथवा करार-स्वातंत्र्याचे बाबतींत दुर्बलांना बलिष्ठांविरुद्ध संरक्षण देण्याचा हेतुच राज्यसंस्थेनें मनांत ठेवला आहे. याचें अगदीं ठळक पण लक्षांत न येणारें उदाहरण म्हणजे राज्यकर्त्यांचें शस्त्रास्त्रबल. एक काल असा होता कीं, सार्वभौम राजा म्हणून वेगळा राज्यकर्ता असूनही सरदारवर्ग आपल्या धनदौलतीचें रक्षण करण्यासाठीं सैन्यें ठेवीत. पण या खाजगी सैन्यांनीं समाजांत 'बळी तो कान पिळी' हा न्याय माजून राही, दुर्बळांचें संरक्षण होत नसे आणि एकंदरीनें अंदाधुंदी माजून समाजाचा विध्वंस होई. म्हणून राज्यकर्त्यांनीं उत्तरोत्तर हीं खाजगी सैन्यें रद्द ठरवून सैन्य व इतर सर्व प्रकारचें संघटित शस्त्रास्त्रबल ठेवण्याचा हक्क फक्त आपणाकडेच ठेवला. सार्वजनिक रस्ते, पाणीपुरवठा वगैरे गोष्टी सरकारी मालकींत कित्येक वर्षांपूर्वींपासून आहेत. पुढें उत्तरोत्तर समाज सुशिक्षित करण्याची गरज जशी उत्पन्न होत गेली तसें समाजास शिक्षण देण्याचें कार्यही राज्यसंस्थेनें कमी-अधिक प्रमाणांत

आपल्या हातीं घेतलें. यामुळें समाजांतील धनिकांप्रमाणें निर्धनांनाही शिक्षण घेण्याची संधि मिळूं लागली.

कोणतेंही एकादें समाजांतील कार्य राज्यसंस्थेनें स्वतः हातीं घेण्यांत दोन हेतु असतात. (१) एक हा कीं त्या कार्याचें फल समाजांतील दुर्बलांस, अज्ञांस व निर्धनांसही मिळावें. (२) दुसरा हेतु हा कीं जी खाजगी व्यक्ति बलिष्ठ, चतुर व सधन असेल तिला दुर्बल, अज्ञ व दरिद्री व्यक्तींवर आक्रमण करतां येऊं नये. लोकांचीं राहण्याचीं घरें हीं खाजगी मालकींत असतात. समजा, त्याप्रमाणें सार्वजनिक रस्तेही खाजगी मालकींत ठेवले—कांहीं लोकांनीं कांहीं रस्ते आपल्या आपल्या मालकींत आणले तर काय होईल ? घरमालक जसें घरभाडें घेतात तसे रस्ते-मालक रस्ताभाडें घेतील. नाक्यानाक्यावर हल्लीं जशी गाडीपट्टी, मालपट्टी वसूल करतात तशीच पायपट्टी निरनिराळे रस्तेमालक वसूल करूं लागतील आणि गरीब लोकांना जशी आज सायकल, मोटार, आगगाडी वापरणें अशक्य होतें त्याप्रमाणें दरवाजाबाहेरची सडकही वापरणें अशक्य होईल. पण यामुळें एकंदर सार्वजनिक व्यवहारच बंद होईल हें ओळखून राज्यकर्त्यांनीं सडका सरकारी मालकीच्या ठेवल्या आहेत. पाणीपुरवठ्याचेंही उदाहरण लक्षांत ठेवण्यासारखें आहे. पुणें शहरास पाणी पुरविणारा खडकवासले तलाव सरकारी मालकीचा आहे. हा खाजगी मालकीचा केला तर काय होईल ? खडकवासल्याचा मालक आपल्या हातीं साऱ्या पुण्याची वेसण घेऊं शकेल. तो पाण्याचे दर वाढवील. रोगट पाणी लोकांना पाजून बेसुमार रोग गांवांत उत्पन्न करील. चोहोंकडे भराभर आगी लागतील. गांवाचा नाश लवकरच होईल हें सांगणें नकोच. फक्त आगी लागून लवकर नाश होईल कीं रोगराईमुळें त्यापेक्षां अधिक लवकर होईल एवढाच प्रश्न आहे. त्याचें उत्तर कदाचित

प्रत्यक्ष प्रयोगानेंच द्यावें लागेल तें असो. विजेची शक्ति सरकारी मालकीची करून आणि गोरगरीबांस आर्थिक, शारीरिक व सांस्कृतिक प्रगति करून घेण्यासाठीं विजेचा उजेड, उष्णता व यंत्रचलनशक्ति ही स्वस्तांत द्यावी अशा योजना पुष्कळ भांडवली राष्ट्रें आंखीत आहेत. खाणी, रेल्वे वगैरे सरकारी मालकीचीं करावीं अशी मागणी निरनिराळ्या देशांत ऐकूं येते. विशिष्ट धंद्यांचे मालक नफ्याच्या लालचीनें एकंदर जनसमाजाचा नैतिक अथवा शारीरिक अधःपात करतात तो टाळण्यासाठीं असे धंदे सार्वजनिक मालकींत आणावे अशी कांहीं भांडवलशाहीच्या पुरस्कर्त्यांचीही मागणी असते. सिनेमाचा धंदा खाजगी असला तरी सरकारनें तो घेऊन शिक्षण व नीतिवर्धन यासाठीं चालवावा अशी मागणी हल्लीं केली जाते. कांहीं विशिष्ट विषें, औषधें व मद्यें खाजगी न ठेवतां सरकारीच ठेवण्यांत यावीं असें व्यसनास आळा घालण्याचें दृष्टीनेंही प्रतिपादण्यांत येतें.

ही सर्व विचारसरणी सद्यःस्थिति लक्षांत घेऊन व्यापक केली तर आपणांस काय आढळून येईल ? आज समाजांत अफाट धन निर्माण करण्याचें सामर्थ्य उत्पन्न झालें असूनही समाजांतील बहुसंख्य जनतेस त्याचा भोगवटा मिळूं शकत नाहीं. म्हणून हें उत्पन्न होणारें धन सर्व लोकांना वाटलें जाईल अशी व्यवस्था करणें राज्यकर्त्यांचें कर्तव्य आहे. पण त्यासाठीं सर्व समाजांत पैसा म्हणजे खरेदीशक्ति वाटली गेली पाहिजे. म्हणजेच बेकारी अथवा नोकरीची अनिश्चिती नाहींशी करून सर्व समाजास रोजगारी मिळेल अशी व्यवस्था सरकारला करतां आली पाहिजे. कारखानदारी धंदे हेच आज रोजगारी देण्याचीं साधनें आहेत आणि हीं साधनें खाजगी आहेत तोंवर त्यांचा नफ्यासाठींच वापर होणार; अर्थात् कांहीं कालानंतर नफा उत्तरोत्तर अशक्य होत जाऊन बेकारी वाढत

जाणार. म्हणून नफ्याचें तत्त्व बंद करून जनतेला धनाचा भोगवटा मिळावा व त्यासाठीं रोजगारी मिळावी म्हणून जमीन व सर्व धंदे सरकारनें आपल्या मालकीचें करणें अवश्य आहे, असें सोशॅलिस्टांचें म्हणणें असतें.

---

## सर्वांस सारखी संपत्ति : : : १०

### सर्वांच्या गरजा सारख्याच

एकदां धनोत्पादनसाधनें सरकारी म्हणजे सार्वजनिक मालकीचीं असें ठरलें म्हणजे समाजांत संपत्तीची विभागणी करण्याचें धोरण कोणतें तें ठरवावें लागतें. आजच्या भांडवलशाही समाजव्यवस्थेंत याचें कांहींच धोरण नसून आजच्या समाजव्यवस्थेंत संपत्तीच्या वाटणीबाबत अराजक पसरलें आहे. त्यामुळें अफाट श्रीमंती व अफाट गरिबी माजली आहे. हें अराजक मोडून संपत्तीच्या वाटणीचें कांहीं तरी न्याय्य तत्त्व ठरविलें पाहिजे. हें तत्त्व ठरवितांना श्रीमंत अथवा गरीब यांच्या गरजांत फारसा कमीअधिकपणा नसतो हें ध्यानांत घ्यावें लागेल. मागें एकदां म्हटल्याप्रमाणें माणसाची भोगशक्ति त्याच्या धनार्जनाच्या प्रमाणांत वाढतेच असें नाहीं. १ शेर शिधा रोज खाणाऱ्या माणसास हल्लीं दरमहा १०० रुपये मिळत असले व त्यासच उद्यां १ हजार मिळूं लागले तर तो कांहीं १० शेराचा शिधा खाऊं शकणार नाहीं, १० पट कपडा अंगावर घालणार नाहीं, १० अंथरुणांवर निजणार नाहीं, १० पट सिगारेट ओढणार नाहीं अथवा १० लग्नें करणार नाहीं.

म्हणून सामान्यतः माणसाची जी भोगशक्ति असेल त्याहून अधिक धन त्याजजवळ रहाणें म्हणजे त्याची नासाडी होणेंच होय. उलट १ शेर शिधा खाणारा व १०० रुपये मिळविणारा माणूस बेकार झाला तर अन्न, कपडा, अंथरूण, सिगारेट, बायको वगैरे सर्व त्यास पहिल्याइतकेंच हवें असतें; पण समाजांत आर्थिक विषमता असल्यानें एकाजवळ भोगण्यास धन नाहीं आणि दुसऱ्याजवळ धन असून तें भोगवत नाहीं अशी अनवस्था उत्पन्न होते.

## विषमतेला मर्यादाच राहात नाहीं.

ही आर्थिक विषमता कधीं थोड्या प्रमाणांत राहूं शकतच नाहीं. उत्पादन-साधनें प्रचंड होऊन तीं खाजगी मालकींत असलीं कीं, त्यांचा व्यवहार चालू राहण्यास व चढाओढींत तीं विजयी होण्यास धनाचें अधिकाधिक केन्द्रीकरण चालू राहतें आणि भयंकर अनर्थकारक विषमता अपरिहार्यच होते. ही आर्थिक चढाओढ एकसारखी भयंकरपणें वाढत असते. एकदां युद्ध हें अपरिहार्य ठरलें म्हणजे विमानांतून बॉंब टाकूं नयेत आणि विषारी वायु वापरूं नये असें म्हणणें ज्याप्रमाणें हास्यास्पद ठरतें त्याप्रमाणें आर्थिक चढाओढीवर आधारलेल्या समाजव्यवस्थेंत मर्यादित व बेताची विषमता राहावी म्हणणें हें हास्यास्पदच होय. लांडग्यानें कोंकरास खातांना त्यास फारसें दुखवूं नये असें म्हणण्यासारखें हें आहे.

## भंग्याला व गव्हर्नराला सारखा पगार!!!

म्हणून धनोत्पादन-साधनें एकदां सार्वजनिक म्हणजे सरकारी मालकींत गेलीं म्हणजे आर्थिक विषमता अजीबात नाहींशी करून सर्वांना अगदीं सारखेंच वेतन द्यावें असें सोशॅलिस्टांच्या एका पोट-पंथाचें म्हणणें आहे. हें म्हणणें सकृद्दर्शनीं अगदींच चमत्कारिक

वाटतें. एखाद्या भंग्याला, कारकुनाला, न्हाव्याला, परटाला, कलेक्टराला आणि गव्हर्नराला सारखाच पगार द्यावा, पत्नीला गृहकृत्यासाठीं तितकाच पगार द्यावा आणि कांहींच न करणाऱ्या लहान मुलांना, वृद्धांना, अपंगांना आणि वेड्यांना— सारांश, सरसकट दर डोई सारखाच पगार द्यावा अशी ही योजना असून "त्यामुळें कोणालाही विशेष कौशल्य दाखविण्याचा, विशेष कष्ट करण्याचा हुरूप राहणार नाहीं, उत्तरोत्तर समाज कर्तृत्वशून्य होत जाईल" असा एक यावर आक्षेप येत असतो. वर वर पाहतां हा आक्षेप खराही वाटतो.

**आज मोठ्या गुणाला मोठें वेतन मिळतें ?**

मोठ्या दर्जाच्या अथवा गुणाच्या कामगिरीला मोठें वेतन मिळतें म्हणूनच आज समाजांत दिसून येणारें विविध कर्तृत्व निर्माण झालें आहे, हा समज लोकांत अतिशय दृढ असून 'सर्वांना सारखी मिळकत' देण्याच्या योजनेस आक्षेप येतो या समजामुळेंच. पण विद्यमान समाजरचनेंत 'मोठ्या गुणाला मोठी मिळकत' हें तत्त्व अमलांत आहे काय ? हिंदुस्तानांत ब्रिटिश अंमल सुरू झाल्यानंतर इंग्रजी शिक्षणाला भाव आला व जे थोडें-फार इंग्रजी शिकले त्यांना अधिक पगार मिळून ते समाजांत श्रेष्ठ दर्जा पावले. उत्तरोत्तर निव्वळ बौद्धिक शिक्षणाची मिळकत कमी होऊन इंजिनियरिंग, यंत्रकला वगैरेंना भाव आला व या शाखेंत तज्ज्ञ झालेलीं माणसें खोऱ्यांनीं पैसा ओढूं लागलीं. पण आतां पहावें तों वाङ्मय-पदवीधर, एंजिनियर, यंत्रज्ञ या सर्वांचे बाजारभाव लज्जास्पद वाटण्याइतके उतरले असून पुष्कळांना तर बेकारीच्या निखाऱ्यांत होरपळावें लागत आहे. हे सर्वजण आज गुणानें कमी झाले असें म्हणतां येणार नाहीं.

पण 'गुणावरून मिळकत' हें तत्त्व आजच्या समाजांत रूढ नाहींच मुळीं. रूढ आहे तें 'मागणी व पुरवठा' हें तत्त्व. समाजाला

४ ग्रॅज्युएट, ४ एंजिनियर, ४ यंत्रज्ञ हवे असले व ३।३ च मिळत असले तर त्यांचा पगार वाढतो आणि ५।५, १०।१० उपलब्ध झाले म्हणजे सर्वांचेच पगार चढाओढीनें कमी होऊन शिवाय पुष्कळसे बेकारही होतात. आज हेंच घडत आहे.

बरें, ज्या प्रकारचा जितका माल हवा त्या प्रकारचा तितका माल काढावा हें सयुक्तिक मानलें तर समाजाला जितके ग्रॅज्युएट, एंजिनियर, यंत्रज्ञ हवेत तेवढेच तयार करणें हें योग्य ठरेल. व मग कोणाचेच भाव उतरणार नाहींत. पण शाळा-कॉलेजें या धोरणानें चालविण्यांत येत नाहींत. कोणास संस्था चालविण्याची ईर्षा असते. कोणास वाया चाललेला पैसा 'शिक्षणकार्यांत' खर्चल्याचें समाधान व नांवलौकिकाची, पदवीची वगैरे हाव पुरवून घ्यावयाची असते. सुशिक्षितांना मास्तरकीच्या नोकऱ्या हव्या असतात, इमारत-कंत्राटदारांना शाळांच्या इमारतींचीं कंत्राटें हवीं असतात, पुस्तकें लिहिणारांना गिऱ्हाईक हवें असतें आणि ज्या अर्थी पूर्वीच्या सुशिक्षितांना मोठ्या नोकऱ्या मिळाल्या आणि समाजोन्नतीकरितां 'स्वार्थत्यागपूर्वक' नव्या नव्या शिक्षणसंस्था काढण्यांत येत आहेत त्या अर्थी आपल्याही मुलांना शिक्षण मिळून त्यांची उन्नति होईल व त्यांना बडा पगार मिळेल असें आईबापांना वाटून ते आपल्या मुलांना तिजोऱ्या खलास करून शिकवीत असतात. पुढें ही तिजोरी परत भरण्याची कला मुलाच्या अंगीं नाहीं हें फार उशीरा त्यांच्या लक्षांत येतें. आज बेकारीचा राक्षस समोर दिसत असल्यामुळें विद्यार्थ्यांची मनोवृत्ति केवळ भयंकर झाली आहे. पास होणारे विद्यार्थी नापास होणाऱ्यां-पेक्षां अधिक दुःखी असतात. कारण नापास होणारा पुन्हा डोळ्यांस झापड बांधून परीक्षेच्या घाण्याभोंवतीं फिरत राहूं शकतो. उलट पास होणाऱ्याला परीक्षा नाहीं, उद्योग नाहीं, कांहींच नाहीं. यामुळें

घरच्या माणसांच्या व समाजाच्या दृष्टीनेंही तो अडगळीसारखा दिसूं लागतो. अशा परिस्थितींत बेकाराच्या मनाची व शरीराची इतकी हानि होते कीं, चांगले हुशार व कर्तबगार तरुण कांहीं दिवसांच्या बेकारीनंतर मनानें व शरीरानें सडलेले व कुचकामी होतात असा अनुभव आहे.

## गुणाच्या श्रेष्ठ-कनिष्ठतेची कसोटी कोणती?

'पण धनोत्पादन-साधनें सार्वजनिक मालकीचीं करून व नफेबाजी बंद करून बेकारीचा नायनाट केल्यावर तरी मोठ्या व श्रेष्ठ गुणाच्या कार्याला मोठा पगार आणि लहान व कमी गुणाच्या कार्याला कमी पगार असें नीतितत्त्व अमलांत कां आणूं नये?' या प्रश्नास प्रतिप्रश्न आहे तो हा कीं, अमुक कार्य मोठें अथवा श्रेष्ठ दर्जाचें व दुसरें अमुक कमी दर्जाचें असें ठरविण्याची कसोटी तरी कोणती? हा प्रतिप्रश्न अगदींच साधा आहे आणि त्याचें उत्तर चुटकीसरशीं देतां येईल असें वाटतें. पण थोडा विचार केला तर ती गोष्ट इतकी सोपी नाहीं असें दिसून येईल. डॉक्टराचें काम श्रेष्ठ दर्जाचें व लोहाराचें कमी दर्जाचें असें मानावें म्हटलें तर ही तुलना कशी करावयाची? लोहाराला डॉक्टराचें काम करतां येत नाहीं, तर डॉक्टरालाही लोहाराचें काम करतां येत नाहीं; डॉक्टराला पुष्कळ दिवस आपली विद्या शिकावी लागते व लाहोराला ती शिकण्यास फार दिवस शिकावें लागत नाहीं हें खरें; पण लोहार धंदा करीत राहतो व डॉक्टर शिकत राहतो. या दोहोंत प्रत्येकजण केवळ आपल्या शारीरिक व मानसिक शक्ति खर्च करीत असतो ही गोष्ट दोघांत एकाच प्रकारची नाहीं काय? विद्या शिकत काळ घालविणें आणि मागून धंद्यांत काळ घालविणें हें डॉक्टर करतो आणि लोहार सर्व

आयुष्य लोहारीचा धंदा करण्यांतच घालवितो. पण एकाचा काल-व्यय श्रेष्ठ दर्जाचा व दुसऱ्याचा कमी दर्जाचा हें कसें ठरवावयाचें? शिकत असतांना डॉक्टराला खर्च पडला व लोहार सर्व काळ मिळवीतच राहिला, असा फरक काढतां येईल; व म्हणून डॉक्टराच्या शिक्षण-खर्चाच्या भरपाईसाठीं त्यास लोहारापेक्षां अधिक पगार द्यावा असें कोणी म्हणेल. पण धनोत्पादन-साधनें व त्याबरोबरच शिक्षणकार्यही सरकारनें आपणाकडे घेतलें व डॉक्टराला सरकारी खर्चानें शिकविण्यांत आलें तर मग लोहारा-पेक्षां डॉक्टरला अधिक पगार देण्याची जरूर काय?

ज्याच्यावांचून जेवढें अडेल तेवढी त्याची योग्यता असें म्हणण्या-चीही सोय नाहीं; कारण समाजाला लोहार व डॉक्टर या दोघांचीही सारखीच गरज आहे. गरजेहून डॉक्टर जास्त झाले तर तेही कचऱ्यावारी विकले जातात आणि गरजेहून लोहार कमी असले म्हणजे त्यांना डॉक्टरपेक्षांही भाव अधिक येतो. पण तेवढ्यावरून डॉक्टरपेक्षां लोहार श्रेष्ठ असें कोणी म्हणेल काय? आणि कोणावांचून किती अडेल याला कांहींच सुमार नसतो. आगगाडीचा स्टेशनमास्तर हा श्रेष्ठ व रुळांचे सांधे बदलणारा हमाल हीन दर्जाचा असें मानण्यांत येतें. पण सांधे बदलणाऱ्या हमालानें एक दिवस गाडी येण्याच्या वेळीं रुळांचे सांधे व्यवस्थित न बदलले तर गाडी उलथून लाखों रुपयांची संपत्ति व शेंकडों लोकांचें जीवित यांचा चक्काचूर होईल. म्हणून त्या हमालाची किंमत अथवा योग्यता लाखों रुपयांइतकी व शेंकडों लोकांइतकी समजावयाची कीं काय? सारांश (१) आजच्या समाजांत गुणांच्या श्रेष्ठ-कनिष्ठपणावर मिळकतीचें मान अवलंबून नाहीं व (२) अमुक गुण इतर गुणांपेक्षां श्रेष्ठ असें समजण्यास कोणतेंही साधन उपलब्ध नाहीं या दोन गोष्टी वरील

विवेचनावरून मान्य कराव्या लागतात. शिवाय आर्थिक विषमता एकाद्या भयंकर रोगाप्रमाणें फोफावत जाऊन समाजावर सध्यांसारखा भयंकर अनर्थ ओढवून आणते, हेंही लक्षांत घेतां सर्वांना सारखी मिळकत असावी हें तत्त्वच सयुक्तिक आहे असें वाटूं लागतें.

## कर्तृत्वास हुरूप कोठून मिळेल ?

पण धनोत्पादनसाधनें खाजगी मालकींतून काढून सार्वजनिक मालकींत आणल्यानंतर व सर्व माणसें निवळ नक्त पगारी झाल्यानंतर व्यक्तिमात्रास कर्तृत्वास हुरूप कोठून येणार ? या प्रश्नाचें उत्तर भांडवलशाहीनेंच देऊन ठेवलें आहे. आजच्या भांडवलशाहींत नव्वद टक्के जनतेला मालकीचें धनोत्पादक साधन मुळींच नाहीं, तरी एवढे जगड्व्याळ धंदे नक्त पगारी कारकून, अधिकारी, मजूर हेच चालवीत आहेत. भांडवलशाहीच्या उत्पादनपद्धतींत उत्पादनसाधनेंच अशीं बनविण्यांत आलीं आहेत कीं, त्यांत उद्योगास हुरूप राहूं शकतो, उद्योगांत आनंद होतो व प्रत्येकाचें काम अचूकपणें गुणांत व परिमाणांत हिशेब करून त्याचें मोजमाप करतां येतें. आधुनिक धंद्यांच्या अवाढव्य स्वरूपामुळें त्यांतील अंगोपांगांचें शिक्षण अनेक वर्षें घ्यावें लागतें. हा जो शिक्षणाचा काल त्यांत शरीर व मन उद्योगक्षम व उद्योगशील बनविलें जात असून कर्तव्यनिष्ठा शिकविली व बिंबविली जाते. आजच्या भांडवलशाही काळापेक्षां समाजवादाच्या काळीं हें शिक्षणकार्य विशेषच चांगल्या प्रकारें करण्यांत येईल. विद्यार्थिदशेंत उद्योगाची लागलेली संवय व बाणलेली कर्तव्यनिष्ठा बेकारीसारखी नैतिक भावनेचा ऱ्हास करणारी परिस्थिति नसल्यास, नष्ट होणार नाहीं. समाजस्वास्थ्य व समाजाची प्रगति परस्परसहकार्यावर आधारलेली आहे याची जाणीव व्यक्तिमात्रास होऊन

इतरांच्या श्रमाचें जें फळ आपण उपभोगतों त्याची परतफेड आपण आपल्या श्रमानें करीत आहों व त्या योगें अनृणी होत आहों या-बद्दल प्रत्येकास कृतार्थता वाटूं लागेल. सोशॉलिस्ट समाजांत सर्वांचा दर्जा सारखा राहून बंधुभावनेचें शिक्षण दिलें गेल्यानें ही भावना खास दृढावत जाईल.

## अचूक देखरेखीची शक्यता

सर्व लोकांचा स्वभाव इतका उच्च होण्यास कालावधि लागेल हें खरें, पण तोंवर थांबून राहण्याचेंच कारण आहे असें नाहीं. प्रत्येकजण अचूकपणें पुरे इतक्या चांगुलपणें आपला उद्योग करतो कीं नाहीं हें पाहण्याचीं देखरेखीचीं भरपूर साधनें आज उपलब्ध झालीं आहेत. यंत्राचे साहाय्यानें होणारें काम ठराविक गुणाचें व मापाचें होतें आणि धंद्याच्या मोठ्या स्वरूपामुळें प्रत्येक बाबींत यंत्राचा उपयोग होऊं लागला असून नव्या नव्या यंत्रांचे शोध प्रत्यहीं लावले जात आहेत. सर्व प्रकारच्या मालाचे गुण व परिमाण मोजण्याचीं साधनें इतकीं प्रमाणबद्ध झालीं आहेत, कीं खडक-वासल्यांत पाणी किती, कोणी आपल्या बागेंत रात्रीं किती पाणी सोडलें, लक्षावधि दिव्यांना शेंकडों यार्डांवरून पुरविण्यांत येणारी वीज प्रत्येक दिव्यानें किती खाल्ली आणि दहा मजुरांपैकीं कोणी किती मिनिटें कुचराई केली हें सर्व आतां बिनचूक कळूं शकतें. सारांश, नफ्याची अथवा मालकीच्या भावनेची लालूच नसतांही ठराविक गुणपरिमाणाचें काम घडवून आणणें भांडवल-शाहींतच शक्य झालें आहे.

## कलाकृतीचें भवितव्य

कांहीं कामें अशीं असतात कीं, तीं सक्ती करवून चांगलीं होत नाहींत आणि त्यांचे गुण आणि परिमाण कोणत्याही शास्त्रीय अथवा

यांत्रिक कसोटीच्या चौकटींत बसूं शकत नाहीं. सर्व प्रकारचें शास्त्रीय संशोधन या सदरांत मोडतें. कोणत्याही व्यवसायांतील उत्तम गुण-प्रदर्शन या सदरांत पडतें. गवयाचें गायन, मूर्तिकाराचें कसब, चित्रकाराचें रेखन हीं सर्व अत्युत्कृष्ट व्हावयाचीं तर त्यास सक्ती अथवा अचूक मोजमापाचा कांहींच उपयोग होत नाहीं. गुरावासरांची जोपासना, मुलाबाळांचें संगोपन, झाडाझुडपांची मशागत अशीं सर्व कामें सक्तीच्या व मोजमापाच्या उपायानें उत्तम गुणाचीं करून घेतां येणार नाहींत. अर्थात् अधिक धनाची लालूच दाखविल्या-वांचून हीं कामें उत्तम प्रकारचीं कशीं होतील ? असाही एक आक्षेप येणें शक्य आहे.

वस्तुस्थिति अशी आहे कीं, आज भांडवलशाहींत या कार्यांच्या उत्तम गुणांस अधिक बाजारभाव आहे असें मुळींच नाहीं. कांहीं कलावंत आज खूप पैसे मिळवितांना दिसतात; पण त्याचा अर्थ सर्वच कलावंतांची परिस्थिति तशी आहे असें नव्हे. ज्यांच्या अंगीं उपजत कलेचें अंग आहे अशीं लक्षावधि माणसें गरीबींत जन्मल्या-मुळें त्यांच्या कलाविकासाला कधींच संधि मिळालेली नाहीं. भांडवल-शाहीचें वैभव वाढलें व भांडवलवाल्यांची संख्या वाढली त्या प्रमाणांत कलेला मानणाऱ्या लोकांची संख्या वाढलेली नाहीं. यामुळें भांडवल-शाहींत कलावंतांची कुचंबणाच होत आहे. एकंदर भांडवलशाहींत ज्याप्रमाणें थोड्यांच्या हातीं खूप संपत्ति आणि बाकी सर्व कफल्लकांचा बाजार अशी स्थिति झाली तीच स्थिति कलावंतांच्याही जगांत झाली आहे. ज्याला एकदां चलती मिळाली तो आपल्या कलेचा सर्व धंदा आपणाकडेच खेचून कुबेराचा महाकुबेर होतो, उत्कृष्ट पण गरीब कला-वंतांना त्यांच्या-त्यांच्यांतील चढाओढीचा फायदा घेऊन कमींत कमी मजुरीवर नोकरीस ठेवतो व त्यांच्या कलेवर आपण नफा आणि

कीर्ति मिळवितो. कलेच्या खऱ्या गुणज्ञांची संख्या न वाढल्यामुळें उत्तम गायकांची आबाळ होऊन 'कला थोडी व ढंग फार' अशा गवयांना भाव आला आहे. पोक्त व उत्कृष्ट गवयांपेक्षां सुंदर, तरुण व छाट पोरींच्या, कला थोडी व मोहन जास्त, अशा गायनांचीं रेकॉर्डे झडत आहेत आणि या पोरींचे बंगले उठत आहेत. उत्तम तैलचित्र हातानें काढणाऱ्यापेक्षां पाट्या रंगविणाऱ्यांनीं मोठ्या दौलती उठविल्या आणि फोटोग्राफरांनीं थोडचाशा घासण्यापुसण्याच्या अकलेवर चित्रकारांना बेकार करून टाकलें आहे. उत्तम कला-विकासाला भांडवलशाहींत वाव आहे व उत्तेजन मिळतें असें शेंकडा ९० कलावंतांना अनुभवावरून म्हणतां येणार नाहीं.

उलट, सर्वांना सारखें वेतन मिळालें म्हणजे मात्र कलाविकासाला भरपूर वाव आहे. सांपत्तिक स्थिति सर्वांना सारखी असल्यानें उपजत अंगीं असणारा अथवा लहानपणीं भोंवतालच्या परिस्थितीमुळें अंगीं उत्पन्न झालेला कलागुण दारिद्र्याग्नींत जळून जाईल ही भीति राहणार नाहीं. अत्युत्कृष्ट गुणप्रदर्शनाला अधिक वेतन मिळणार नाहीं हें खरें; पण भांडवलशाहींत कलावंताला न मिळणारा सामाजिक श्रेष्ठ दर्जा सोशॅलिझममध्येंच मिळूं शकेल. भांडवलशाहींत अंगीं काडीचीही अक्कल अथवा लायकी नसतां केवळ दैवयोगानें प्राप्त झालेल्या संपत्तीमुळें मानमरातब मिळतो व पैसा नसल्यानें कला-वंताला मात्र असा मानमरातब मिळूं शकत नाहीं; पण सर्वांना सारखी मिळकत झाल्यानें पैशानें कोणालाही मानमरातब मिळणें बंद होईल आणि निसर्गतःच समाजांत उत्तम गुणाबद्दल जी चहा असते व कलावंताबद्दल जें प्रेम असतें तें कलावंतांस व गुणवंतांस मिळूं लागेल. खरे कलावंत व खरे गुणवंत यांच्या कला व गुण—

आर्थिक परिस्थितीबद्दल तें निश्चिंत असतील तर— इतरांच्या प्रशंसेनें तेजस्वी होत जातात.

याशिवाय कलाविकास व गुणप्रकर्ष यांपासून ज्याचा त्यासही एक प्रकारचा उच्च आनंद मिळत असतो ही गोष्ट आज पुष्कळशा कलावंतांसही माहीत नसते. मिराबाईचीं गोड गाणीं सुंदर गळ्यावर खडया आवाजांत गात जाणाऱ्या भिकारणीला छातीस लटकलेल्या अर्भकास घालण्यास दूध मिळत नाहीं आणि स्वतांच्या पोटांत घालण्यास अन्नाचा कण मिळत नाहीं तोंवर तिच्या गाण्यापासून तिला स्वतांला आनंद कसा होणार ? आपण मात्र तिला भाकरी घालावी लागूं नये म्हणून माडीच्या खिडकीचें दार सगळें न उघडतां किलकिलें करून तिच्या गोड गायनाची आणि भिकारी पोषाखांतही तिला न कळत चमकणाऱ्या तिच्या सौंदर्याची माधुरी कानांनीं आणि डोळ्यांनीं चाखत लपून उभे असतों. सोशॅलिस्ट समाजांत या भिकारणीस गिरणींत काम मिळून इतर कोणाहीइतका रोजगार मिळेल आणि मग विसाव्याचे वेळीं ती जेव्हां आपल्या पहाडी आवाजांत माडीच्या खिडकींत बसून गाऊं लागेल तेव्हांच तिला आपल्या संगीताचा आनंदमय अनुभव चाखतां येईल.

अर्थात् अंतःकरणांत उचंबळून येणाऱ्या कलावृत्तीला व गुण-प्रकर्षाला वाव देऊं इच्छिणारे जे थोडे लोक असतील त्यांची कला चंद्रापासून चांदणें जसें आपोआप स्रवत असतें त्याप्रमाणें स्रवत राहील हें खरें असलें तरी जात्याच ज्यांना श्रमाची हौस नाहीं आणि सामाजिक परस्परावलंबनाची भावना नाहीं अशांवर श्रम करण्याची सक्ती करावी लागेल हें खरें आहे. भांडवल-शाहींत व्यक्तिस्वातंत्र्य होतें आणि या सोशॅलिझम्‌मध्यें सर्वां-वरच श्रम करण्याची सक्ती ऊर्फ 'गुलामगिरी' येणार हा याबर येणारा आक्षेप सकृद्दर्शनीं खरा वाटतो. पण तो भ्रममूलक आहे. श्रमावांचून संपत्ति निर्माण होतच नाहीं हें रोकडें सत्य आहे. झाडा-वर आयतें पिकलेलें फळ झाडावर चढून काढून हातावर घ्यावें तेव्हां तें उपयुक्त धन होतें. अस्ताव्यस्त पडलेल्या काटक्या एकत्र करून मग विस्तव तयार करतां येतो आणि त्यावर अन्न कोणी तरी श्रम करून शिजवावें लागतें. वाघाला पांघरण्यास वस्त्र लागत नसलें तरी नदी भरली म्हणजे तरून जातां येत नाहीं. माणसाला नाव करतां येते, पण ती श्रमांनीं करावी लागते व श्रमांनीं वल्हवावी लागते. भांडवलशाहींत श्रम न करण्याचें स्वातंत्र्य आहे, पण उपाशी मरण्याची पाळी आली तरी त्याची जबाबदारीही ज्याची त्यास घ्यावी लागते. आणि उपाशी मरावें लागूं नये म्हणून श्रम करून पोट भर-ण्याची तयारी ठेविली तरी श्रम करण्यालाही संधि मिळत नाहीं. आजच्या समाजस्थितींत श्रम न करण्याचें जें स्वातंत्र्य आहे त्याचा

खरा अर्थ श्रम करून पोट न भरतां उपाशी मरण्याची सक्ती समाजावर लादण्यांत आली असा आहे. हें मरणें सुद्धां उपासानें झिजून, कुमार्गास लागून, गुन्हे करून, तुरुंगांत जाऊन, अंगांतली माणुसकी नष्ट करून व उरलें सुरलें नरकमय आयुष्य पूर्णपणें भोगून मग मरतां येतें. इतका अधःपात चुकविण्यासाठीं आत्महत्या करून आयुष्याची दोरी तोडून टाकूं असें कोणी म्हणेल तर पिनलकोडांत तो गुन्हा आहे.

श्रम करण्याची सक्ति नसल्यानें कांहीं गादीपदस्थ धनिकांना आरामशीर जगायला मिळतें खरें; पण ते श्रम करीत नाहींत म्हणून त्यांच्यासाठीं इतरांना श्रम करावे लागतातच. समाजांतलीं लहान मुलें, थकलेले म्हातारे, अपंग, वेडे हे सर्व लोक उत्पादक श्रम करीत नाहींत. या प्रत्येकाचा शेर शेतकऱ्याला स्वतःचा शेर पिकवून शिवाय उर्वरित म्हणून पिकवावा लागतो. राजे, सेनापति, सैनिक, कारकून, वकील, डॉक्टर, भिक्षुक यांचेही शेर शेतकरी स्वतःच्या श्रमानें पिकवितो. इतकेंच काय पण चोर, डाकू, गुन्हेगार यांचेही शेर शेतकऱ्याला, इच्छा असो नसो, पिकवावे लागतात. यांतच धनसंचय पुष्कळ असल्यामुळें जे ऐदीपणानें घरीं बसतात त्या धनिकांचेही शेर शेतकऱ्यास पिकवावे लागतातच. आपण अथवा आपल्या वाडवडिलांनीं मिळवून ठेवलेल्या धनावर आपण जगतों असा हे धनिक लोक स्वतःचा समज करून घेत असतात. हा समज भांडवलशाहींतला मोठ्यांत मोठा असा भ्रम आहे. सरसकट सगळ्याच धनाचे बाबतींत नव्हे तरी पण जीवनाला अत्यवश्य अशा धनाचे बाबतींत असा सामान्य नियम सांगतां येईल कीं जीवनाला अवश्य धन अत्यंत विनाशी असें असल्यानें तें फार

काळ सांठविणें शक्यच नसतें आणि फार काळ टिकणारें धन जीव जगविण्याला निरुपयोगी असतें. नॉर्वेतल्या कीं कोठल्याशा 'भाकरीच्या झाडा'ची भाकरी चाळीस वर्षें टिकते म्हणतात. पण जगांतल्या एक लक्षांश लोकांना कांहीं ही भाकरी उपलब्ध झालेली नाहीं. बाकीच्या सर्व जगाची भाकरी गरम खायची असेल तर ताबडतोब खावी लागते, दुपारची संध्याकाळीं खायची तर गार पडते, दुसरें दिवशीं शिळी होते आणि तिसरे दिवशीं बुरशी येऊन कुत्रेंही खात नाहीं. या भाकरीचे जोंधळे, बाजरी, गहूं, मका वर्ष दोन वर्षें फार तर टिकतात, पुढें कुजूं सडूं लागून अडचण होतात. ओला भाजीपाला चारदोन दिवसांचा सोबती. फळें चार आठ दिवस टिकतील, त्यांचीं झाडें वीस-पंचवीस वर्षें टिकतील; बाकें, खुर्च्या, पुस्तकें, घरें पंचवीस-चाळीस वर्षें टिकतील. पण जीवनाला अत्यवश्य अशीं अन्नद्रव्यें सालेसाल श्रम करून ताजीं पिकवावीं लागतात. श्रीमंत श्रम करून पिकवीत नाहींत तर गरीब त्यांच्यासाठीं पिकवितात. मग श्रीमंतांचा धनसंचय तो कोणता? त्याच्याजवळचा पैसा चावून फार तर दात पडतील पण कांहीं पोट भरणार नाहीं. माझ्या विसाव्या पिढीला पुरेल इतकें धन मजजवळ आहे म्हणणारा धनिक काय बोलत असतो? माझ्या वीस पिढ्यांपर्यंतच्या वंशजांसाठीं हल्लींच्या श्रमजीवी माणसांनीं आणि त्यांच्या वीस पिढ्यांनीं श्रम करून त्यांना पोसलें पाहिजे असा माझा हक्क आहे, एवढेंच तो सांगत असतो. पैसा हा या हक्काची खूण. दुसऱ्याच्या जीवितास राबविण्याचा संचित हक्क म्हणजे संचित धन. अर्थात् श्रम न करतां जगण्याचा जो हक्क आजच्या भांडवलशाहींत कांहीं थोड्या धनिकांस भोगतां येतो तो बाकीच्या पुष्कळांना त्यांच्या स्वतःच्या पोटासाठीं व ऐदी धनिकांच्या पोटासाठींही राबवूनच

भोगतां येतो. भांडवलशाहींत बहुसंख्य समाजाला बेकार होऊन उपासानें मरावें अथवा स्वतःसाठीं व इतर ऐदी लोकांसाठींहि श्रम करावे व मग जेवावें अशी सक्ति आहे. कांहीं मूठभर धनिकांना मात्र इतरांच्या श्रमावर चैन करतां येते, स्वतः श्रम करावे लागत नाहींत. धनिकांचा धनसंचय म्हणजे भावी काळांतील श्रमजीवी वर्गाचे अव्यक्त श्रमच होत. सुंदरीच्या 'चमकींतला' लाखाचा 'हिरा' पाहून 'मन' मोडून जातें असें 'यशवंत' कवी सांगतो. पण जिवापाड कष्ट करून रोज एक रुपया मिळविणाऱ्या लाख कष्टी जीवांच्या कष्टाचें फल त्यांना स्वतःला भोगूं न देतां त्या चमकींत कोंडून ठेवलें आहे, हें कवीच्या लक्षांत येईल तर त्या चमकीच्या जागीं लक्षावधी गरिबांच्या पिळणुकीचें भेसूर चित्र तेथें दिसूं लागून दुःखावेगानें कवी किंचाळी फोडेल.

सोशॅलिस्ट समाजांत समाज हा परस्परसहकार्यानेंच श्रम करून जगूं शकेल ही गोष्ट प्रत्येकाच्या मनावर बिंबविण्यांत येईल. श्रम करण्याची सक्ति ही एका माणसाची दुसऱ्यावर लादलेली गुलामगिरी नसून सृष्टिक्रमामुळें उत्पन्न झालेली आवश्यकता आहे असें लोकांना पटवून दिलें जाईल आणि शास्त्रीय व यांत्रिक शोधांनीं शिक्षणानें व संवयीनें श्रम करण्यांत सौख्य व प्रेम निर्माण केलें जाईल.

## कामाच्या वाटणींतील विषमता

निरनिराळ्या कामांत विषमता राहणार हें खरें आहे. लोहाराचें काम, खाटकाचें काम, भंग्याचें काम, सुंदर चित्रांच्या प्रदर्शनांतील रखवालीचें काम, सुंदर नर्तकींच्या महालांतील परिचारिकेचें काम हीं सर्व सारखीं कोणीच मानीत नाहीं. याबाबतही कोणावर सक्ति करावी लागेलही; पण एका विषमतेवर दुसऱ्या विषमतेचा तोडगा देतां येईल. लोहारास अगदीं थोडा वेळ काम लावलें व नर्तकीच्या परिचारकास अधिक वेळ काम लावलें तर लोहारास नर्तकींचें नर्तन पाहण्यास पुरेसा वेळ मिळूं शकेल आणि नर्तकीचा परिचारक कामपालट हवा म्हणून थोडा वेळ तरी लोहाराचा भाता हालवूं का, म्हणून विचारील. भंग्याचें, खाटकाचें वगैरे कामें काहींशी ओंगळ आहेत. पण शास्त्रीय शोधांनीं ओंगळपणा कमी होत आहे. साखळी ओढून भंगीपणा करण्यास आज कोणीच संकोच बाळगीत नाहीं. आणि गटारें साफ करण्याच्या घाणेरड्या कामाचे तास रोज ३।४च ठेवल्यास तात्या बापट, आचार्य भागवत, बाळूकाका कानिटकर, बर्ट्रंड रसेल, आप्पा पटवर्धन अशीं माणसें समाजसेवेच्या बुद्धीनें आणि बौद्धिक आनंदास फार वेळ मिळेल या आशेनें गटारें उपसण्याचें काम फार सुरेख करतील व त्यांची बाकीच्या वेळची बौद्धिक सेवा समाजास फुकट वापरावयास सांपडेल. सैनिक, सेनापति, शिपाई, शिक्षक, मंत्री, न्यायाधीश वगैरे सर्व कामास त्या त्या आवडीचे लोक मिळ-

तीलच आणि सगळ्यांत कमी आवडीच्या कामाचा वेळ कमी करून त्याबद्दल आकर्षण उत्पन्न करतां येईल.

### आंखीव योजनेची शक्यता

सर्वांना सारखाच पगार देऊन चढाओढीचें तत्त्व बंद केलें व समाजास कोणती वस्तु किती हवी याची अटकळ बांधून, योजना आंखून उत्पादन घडविलें तर आज गरज नसलेल्या अनेक वस्तूंवर जो वेळ वायां जातो तो न जाऊन जरूर त्या सर्व वस्तु उत्पन्न करतां येतील व कामाचे तासही कमी करतां येतील. आणि मग आधिभौतिक करमणूक व आध्यात्मिक उन्नति यांचा सर्व समाजास आज मिळणारा लाभ देतां यावा यासाठीं योजना आंखाव्या लागतील व त्या आंखल्याहि जातील.

### पुन्हा विषमता येईलच ?

'सर्वांना सारखे पगार वाटले तरी कांहींजण गुप्तपणें धन हळूहळू सांठवून ठेवून इतर उधळपट्टी करणाऱ्यापेक्षां अधिक श्रीमंत होतील. मग पुन्हां विषमता निर्माण होईल कीं नाहीं ?' धनसंचय करण्याची आजची खोड एकदम नाहींशी होणार नाहीं, या दृष्टीनें हा आक्षेप कांहींसा खरा दिसतो. पण थोडें खोल पाहिल्यास काय दिसेल ? जरी एकादा मनुष्य धनसंचय करूं लागला तरी धनोत्पादनसाधन त्याच्या हातीं न राहून तें सरकारजवळ राहील. यामुळें रोजगारी देण्याच्या नांवानें कोणाच्याही जीवितावर त्यास अंमल चालवितां येणार नाहीं. आजच्या समाजांतलें दुःख थोड्याशा भांडवलवाल्यांच्या हातीं जगास पिळण्याची अथवा उपाशी मारण्याची सत्ता असण्यानें उत्पन्न झालेलें आहे. पण रोजगारी देणें, धनोत्पादन करणें व समाजांतील प्रत्येकास सारखी मजूरी देणें या गोष्टी

## कामाच्या वाटणींतील विषमता

निरनिराळ्या कामांत विषमता राहणार हें खरें आहे. लोहाराचें काम, खाटकाचें काम, भंग्याचें काम, सुंदर चित्रांच्या प्रदर्शनांतील रखवालीचें काम, सुंदर नर्तकींच्या महालांतील परिचारिकेचें काम हीं सर्व सारखीं कोणीच मानीत नाहीं. याबाबतही कोणावर सक्ति करावी लागेलही; पण एका विषमतेवर दुसऱ्या विषमतेचा तोडगा देतां येईल. लोहारास अगदीं थोडा वेळ काम लावलें व नर्तकीच्या परिचारकास अधिक वेळ काम लावलें तर लोहारास नर्तकीचें नर्तन पाहण्यास पुरेसा वेळ मिळूं शकेल आणि नर्तकीचा परिचारक कामपालट हवा म्हणून थोडा वेळ तरी लोहाराचा भाता हालवूं का, म्हणून विचारील. भंग्याचें, खाटकाचें वगैरे कामें काहींशी ओंगळ आहेत. पण शास्त्रीय शोधांनीं ओंगळपणा कमी होत आहे. साखळी ओढून भंगीपणा करण्यास आज कोणीच संकोच बाळगीत नाहीं. आणि गटारें साफ करण्याच्या घाणेरड्या कामाचे तास रोज ३।४च ठेवल्यास तात्या बापट, आचार्य भागवत, बाळूकाका कानिटकर, बर्ट्रंड रसेल, आप्पा पटवर्धन अशीं माणसें समाजसेवेच्या बुद्धीनें आणि बौद्धिक आनंदास फार वेळ मिळेल या आशेनें गटारें उपसण्याचें काम फार सुरेख करतील व त्यांची बाकीच्या वेळची बौद्धिक सेवा समाजास फुकट वापरावयास सांपडेल. सैनिक, सेनापति, शिपाई, शिक्षक, मंत्री, न्यायाधीश वगैरे सर्व कामास त्या त्या आवडीचे लोक मिळ-

तीलच आणि सगळ्यांत कमी आवडीच्या कामाचा वेळ कमी करून त्याबद्दल आकर्षण उत्पन्न करतां येईल.

## आंखीव योजनेची शक्यता

सर्वांना सारखाच पगार देऊन चढाओढीचें तत्त्व बंद केलें व समाजास कोणती वस्तु किती हवी याची अटकळ बांधून, योजना आंखून उत्पादन घडविलें तर आज गरज नसलेल्या अनेक वस्तूंवर जो वेळ वायां जातो तो न जाऊन जरूर त्या सर्व वस्तु उत्पन्न करतां येतील व कामाचे तासही कमी करतां येतील. आणि मग आधिभौतिक करमणूक व आध्यात्मिक उन्नति यांचा सर्व समाजास आज मिळणारा लाभ देतां यावा यासाठीं योजना आंखाव्या लागतील व त्या आंखल्याहि जातील.

## पुन्हा विषमता येईलच ?

'सर्वांना सारखे पगार वाटले तरी कांहींजण गुप्तपणें धन हळूहळू सांठवून ठेवून इतर उधळपट्टी करणाऱ्यापेक्षां अधिक श्रीमंत होतील. मग पुन्हां विषमता निर्माण होईल कीं नाहीं ?' धनसंचय करण्याची आजची खोड एकदम नाहींशी होणार नाहीं, या दृष्टीनें हा आक्षेप कांहींसा खरा दिसतो. पण थोडें खोल पाहिल्यास काय दिसेल ? जरी एकादा मनुष्य धनसंचय करूं लागला तरी धनोत्पादनसाधन त्याच्या हातीं न राहून तें सरकारजवळ राहील. यामुळें रोजगारी देण्याच्या नांवानें कोणाच्याही जीवितावर त्यास अंमल चालवितां येणार नाहीं. आजच्या समाजांतलें दु:ख थोडक्याशा भांडवलवाल्यांच्या हातीं जगास पिळण्याची अथवा उपाशी मारण्याची सत्ता असण्यानें उत्पन्न झालेलें आहे. पण रोजगारी देणें, धनोत्पादन करणें व समाजांतील प्रत्येकास सारखी मजूरी देणें या गोष्टी

प्रातिनिधिक अशा सरकारनें केल्यावर दांत कोरून अथवा पोटास चिमटा लावून शिल्लक टाकीत राहणारा मनुष्य वेडा गणला जाईल यांत संशय नाहीं. यांत त्याचा सुखोपभोग कमी होईल, पण समाजास अपाय कांहींच होऊं शकणार नाहीं.

## भोग्य धनावरील मालकी कायम

धनोत्पादन साधनें सार्वजनिक अथवा सरकारी मालकीचीं करणें या सोशॅलिस्टांच्या मागणींस 'खाजगी मालकी रद्द करणें' असेंही म्हणतात. या रूढ वाक्प्रचारावरून 'सोशॅलिस्टांना सर्वच खाजगी मालकी रद्द करावयाची आहे, बायकाही सार्वजनिक मालकीच्या करावयाच्या आहेत, एकाचें अंथरूण-पांघरूण, सदरा, जेवणाचें ताट, निजण्या-बसण्याची खोली हीं सर्वांनीं वापरावीं हें सोशॅलिस्टांना हवें' अशी सोशॅलिस्टांवर एक टीका केली जाते. कांहीं मूर्ख व दुष्ट लोकांचा या टीकाकारांत समावेश होत असतो. या टीकेचें उत्तर सोपें आहे. खाजगी मालकी जी रद्द करावयाची ती अंथरूण-पांघरूण, जेवणाचें ताट, सदरा, निजण्या-बसण्याची खोली वगैरे भोग्य धनाची करावयाची नसून जमिनी, कारखाने वगैरे धनोत्पादन साधनांची खाजगी मालकी नष्ट करावयाची आहे. हीं साधनें खाजगी मालकींत असल्यानें शेंकडा ९० लोकांना आजच भोग्य संपत्तीवर खाजगी मालकी नाहीं, भोग्य संपत्ति मिळतच नाहीं. ती भोग्य संपत्ति सर्व जनतेला भरपूर मिळावी हाच सोशॅलिझम्‌चा हेतु आहे. प्रत्येकास राहण्यास, निजण्या-बसण्यास स्वतंत्र खोली, पुरेसा स्वतःचा चांगला कपडा वगैरे भोग्य धन आज मिळत नाहीं तें द्यावें हेंच सोशॅलिझम्‌चें ध्येय आहे. तसेंच स्त्रिया या 'धन' आहेत असें सोशॅलिस्ट मानीत नसून त्यांना पुरुषांबरोबरीनें सामाजिक

दर्जा व हक्क द्यावेत हेंच सोशॅलिस्टांना साधावयाचें आहे. आजच्या समाजांत स्त्रीवर्गाचा जो अधःपात होत आहे तो सोशॅलिझम्‌मध्येंच टळेल, व कुटुंबसंस्था सुखी होईल. पण सोशॅलिस्ट समाजांतील कौटुंबिक जीवन हा स्वतंत्र पुस्तकाचा विषय होऊं शकणार असल्यानें त्याची चर्चा येथें करीत नाहीं.

× × ×

'संपत्तिसाधनें सरकारी मालकीचीं करणें' हाही जो सोशॅलिझम्‌संबंधीं वाक्प्रचार रूढ आहे त्याबद्दलही पुष्कळदां गैरसमज होतो. हिंदी संस्थानांत किती तरी धंदे सरकारी मालकीचे आहेत; पण तो सोशॅलिझम् नव्हे. सरकार हें सर्व समाजाचें पूर्ण प्रातिनिधिक असून त्यानें जनतेच्यातर्फे सर्व धंदे आपल्या मालकींत घेणें याचें नांव सोशॅलिझम्.

× × ×

इंग्लंडसारख्या देशांत खाणी, वीज, पोलाद वगैरे कांहीं धंदे प्रातिनिधिक सरकारनें आपल्या मालकीचे करावे अशी मागणी कांहीं भांडवलवालेही करीत असतात. मागें एकदां म्हटल्याप्रमाणें आजही सार्वजनिक जलसंचय, सडका, सैन्य, आरमार, हें सर्व प्रातिनिधिक सरकारच्या मालकींत आहेतही; पण तोही सोशॅलिझम् नव्हे. या सरकारी मालकीचा हेतु भांडवलवाल्यांतील आत्मघातकी चढाओढ थांबवून श्रमजीवी वर्गाची पद्धतशीर पिळवणूक करतां यावी हा असतो. सोशॅलिस्टांना धनोत्पादन साधनांवर जी सार्वजनिक मालकी हवी आहे तिचा हेतु पिळवणूक थांबवून सर्व श्रम करूं शकणारांना रोजगारी पुरविणें व समाजांत सर्वांना सारखी संपत्ति, संधि व शिक्षण देणें हा आहे.

× × ×

हें सर्व घडवून कसें आणावयाचें, धनोत्पादन साधनें सरकारी मालकींत कशीं आणावयाचीं हा विषय वादग्रस्त असून त्याची चर्चा हा एक स्वतंत्र विषय होईल. भांडवलशाहींत अनर्थ कसा माजला आहे, भांडवलशाहींतल्या कोणत्या दोषामुळें हा अनर्थ उत्पन्न झाला व सोशॅलिस्टांच्या आर्थिक उपायानें हा अनर्थ कसा टळेल इतक्या विषयाची सामान्य रूपरेखा सयुक्तिकपणें मांडण्याचा प्रयत्न येथें केला आहे.

REFBK-0005698

संग्रहालय ठाणे
दा. क्र. ५६९८

## कांहीं नवीं प्रकाशनें

| | | | |
|---|---|---|---|
| १ | **गगनाला गवसणी** ले. वि. ग. भिडे | (कथासंग्रह) | किं. १॥ रु. |
| २ | **गप्पा-गोष्टी** ले. पां. गो. लेहोकरे | ,, | किं. १॥ रु. |
| ३ | **खांचखळगे** ले. रा. द. ब्रह्मे | ,, | किं. १॥ रु. |
| ४ | **साखरझोप** ले. गं. भा. निरंतर | (लघुनिबंध) | किं. १॥ रु. |
| ५ | **एरंडाचें गुऱ्हाळ** ले. चिं. वि. जोशी | (द्वितीयावृत्ति) | किं. १॥ रु. |
| ६ | **पुनर्भेट** भाग ४ था | | किं. १। रु. |
| ७ | **प्रतारणा** प्रो० वि. पां. दांडेकर | (कादंबरी) | किं. १।॥ रु. |
| ८ | **रांका** सौ. संजीवनी मराठे | (काव्य) | किं. १ रु. |
| ९ | **सहारा** ले. श्रीधर देशपांडे | (कादंबरी) | किं. १ रु. |
| १० | **नरम-गरम** ले. वा. वि. जोशी | (कथासंग्रह) | किं. १॥ रु. |

---

दरमहा नियमित प्रसिद्ध होणारी—

# चित्तरंजन माला

मालेचें प्रत्येक पुष्प म्हणजे एक संपूर्ण रहस्यमय कादंबरी असते.

**वार्षिक वर्गणी २८१२ मनी ऑर्डरीनें पाठवावी.**

पहिल्या वर्षी प्रसिद्ध झालेल्या मालेच्या १५०० पानांच्या संपूर्ण १२ कादंबऱ्या तीन रुपये मनी ऑर्डरीनें पाठविले असतां घरपोंच मिळतील.

**प्रकाशक:**— यशवंत गोपाळ जोशी,
६२३।१५ सदाशिव, पुणें २.

वादविवेचन-मालेचें २ रें पुष्प

# फॅसीझम

१५ जानेवारी १९३९ रोजीं प्रसिद्ध होईल.

लेखक

**पां. वा. गाडगीळ**

मालेंत एंकदर दहा पुस्तकें प्रसिद्ध व्हावयाचीं आहेत.

मालेच्या लेखकांत श्री. शं. द. जावडेकर, आचार्य भागवत, श्री. ना. ग. गोरे, कॉ. फडके इत्यादि असून प्रत्येक पुष्पाची किंमत फक्त ८ आणे राहील.

मालेची आगाऊ वर्गणी पोस्टेजसह फक्त ४ रुपये

एका पुस्तकाकरितां १० आण्यांचीं तिकिटें पाठवावींत

प्रकाशक : यशवंत गोपाळ जोशी,

६२३/१५ सदाशिव पेठ, पुणें २.

# दि कॉमनवेल्थ

## ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड,

**बुधवार पेठ, पुणें शहर.**

विमा उतरवितांना म्हातारपणची तरतूद व अपमृत्यूमुळें ओढवणाऱ्या आपत्तीपासून स्वकीयांचें संरक्षण करणें ह्या दोनच गोष्टींचा प्रामुख्यानें विचार केला जातो. परंतु ह्याबरोबरच प्रत्येक व्यक्तीनें खालील तीन गोष्टींचाही सूक्ष्म विचार करणें अवश्य आहे.

**(१) कंपनीची आर्थिक स्थिति.**
**(२) विमाकराराचें स्वरूप.**
**(३) हप्त्याचे दर.**

## कॉमनवेल्थ विमा कंपनी लि०, पुणें.

ही संस्था वरील तीन कसोटींच्या आधारें सर्वोत्कृष्ट विमा-संस्था आहे, असें आढळून येईल.

विशेष माहितीकरितां खालील ठिकाणीं पत्रव्यवहार करा.

**श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एल्एल्. बी.**

मॅनेजिंग एजंट.

पां. वा. गाडगीळ यांचीं समाजवादावरील पुस्तकें

# सोशॅलिझम्
# अथवा
# समाजवादाचा ओनामा
## आवृत्ति २ री, किं. १ रु.

कार्ल मार्क्सच्या शास्त्रशुद्ध समाजसत्तावादाचें सोपपत्तिक विवेचन करणारा मराठींतील हा ग्रंथ या विषयाचे बाबतींत अद्वितीय असा आहे. भांडवलशाही अर्थशास्त्रज्ञांचीं नीतितत्त्वें काय होतीं? पण या नीतितत्त्वांचा भांडवलशाहीच्या इतिहासांत कसा बोजवारा उडाला, भांडवलशाहीची वाढ गेल्या २।३ शतकांत कशी झाली आणि तिला साम्राज्यशाहीचें रूप कसें आलें, याचें विवेचन अनेक ग्रंथांच्या आधारें या पुस्तकांत केलेलें आहे.

भांडवलशाहीच्या तडाक्यापुढें प्राचीन व अर्वाचीन हिंदु-मुसलमान राज्य व हिंदी समाजघटना या मोडून कां पडल्या यासंबंधीं या पुस्तकांतील विवेचन कांहींसें अपूर्व असें आहे.

शेवटच्या प्रकरणांत हिंदुस्थानच्या दृष्टीनें समाजवादाचा विचार केला असून त्या प्रकरणांत ४ वर्षांपूर्वीं व्यक्त केलेलीं कांहीं मतें गेल्या ४ वर्षांत अनुभवानें खरीं ठरलीं असल्याचें वाचकांस आढळून येईल.

## रशियांतील राज्यक्रांति—[पृष्ठें ३६६, किं. २॥ रु.]

रशियांतील राज्यक्रांति ही मानवी इतिहासांतील अपूर्व अशी घटना होय. भूकंपासारखी अकल्पित अशी घडलेली ही घटना वास्तविक अगदीं इतिहासक्रमानें कशी घडून आली हें दाखविणें हा या पुस्तकाचा हेतु आहे. त्यासाठीं रशियन इतिहासाची पार्श्वभूमि या पुस्तकांत दिलेली असून १९०५ व १९१७ या दोनही राज्यक्रांत्यांचा संक्षिप्त पण संगतवार व तात्त्विक विवेचनासह इतिहास यांत देण्यांत आला आहे.

शेवटीं रशियांत राज्यक्रांतीनंतर झालेल्या समाजक्रांतीचें स्वरूप यांत संक्षिप्तपणें देण्यांत आलें असून 'जागतिक कम्युनिस्ट क्रांतीचें भवितव्य' या प्रकरणांत फॅसिझमचें केलेलें स्वरूपाविष्करण, फॅसिस्ट चळवळीचें स्वरूप लक्षांत आणण्यास अत्यंत उपयुक्त आहे.

प्रकाशक:—य. गो. जोशी, सदाशिव पेठ, पुणें २.